जळगाव
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
प्रारंभ:१९९६
आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६
पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएएल/८८/२०२४-२०२६
जळगाव, सोमवार, १३ एप्रिल २०२६। युगाब्द ५१२७ । वर्ष : ३३ । अंक : २४५। मूल्य ४ रुपये। पृष्ठे ८ + ४ = १२ । जळगाव, धुळे, नंदुरबार येथे उपलब्ध

**शेतमाल निर्यातीसाठी जळगावातून कार्गो विमान**

वाचा पान ८ वर

# अलवार सुरांची ‘आशा’ निमाली

● बहुआयामी प्रतिभेने घडवली पार्श्वगायनाची नवी व्याख्या ● ब्रीच कॅण्डी रुग्णालयात घेतला अखेरचा श्वास



◆ **मुंबई, १२ एप्रिल**

आपल्यान बहिणीच्या महानतेच्या सावलीत केवळ टिकूनच न राहता, आपल्या अलवार सुरांच्या बळावर त्या सावलीतून बाहेर पडून हिंदी पार्श्वगायनाच्या क्षेत्रात स्वतःचे स्वतंत्र विश्व निर्माण करणाऱ्या महान गायिका आशा भोसले यांचे रविवारी निधन झाले. त्या ९२ वर्षांच्या होत्या. आशा भोसले यांना छातीचा संसर्ग आणि थकव्यामुळे शनिवारी सायंकाळी ब्रीच कॅण्डी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, असे त्यांची नात जनाई भोसलेने सांगितले.

१९४९ मध्ये वयाच्या सोळाव्या वर्षी गणपतराव भोसले यांच्याशी विवाह करणाऱ्या आणि पुढे जाऊन आपले सहकारी आणि संगीतकार आर. डी. बर्मन यांच्या लग्न करणाऱ्या आशा यांच्या पश्चात त्यांचा मुलगा आनंद आणि नातवंडे असा परिवार आहे.

**पान ७ वर**

### मीनाकुमारी ते उर्मिला मातोंडकर

**आशा भोसले यांनी आपला आवाज आघाडीच्या अभिनेत्री मीनाकुमारी, मधुबाला, झीनत अमान, काजोल ते उर्मिला मातोंडकर आणि दक्षिणेतील अभिनेत्री पद्मिनी आणि वैजयंतीमाला यांना दिला होता.**

### दुबईतील ‘आशा ॲट रेट ९०’ कॉन्सर्ट

**आशा भोसले या चैतन्याचा वाहता झरा होत्या. त्यांनी २०२३ मध्ये वयाच्या ९० व्या वर्षी दुबईत लाईव्ह कॉन्सर्ट केला होता. ९० व्या वाढदिवसानिमित्त केलेल्या या विशेष कार्यक्रमाचे नाव ‘आशा ॲट रेट ९० : लाईव्ह कॉन्सर्ट’ असे होते.** ■

**मेरा कुछ सामान तुम्हारे पास पडा हैं... (अग्रलेख)**

**‘जिंदगी इत्तेफाक हैं...’ (विशेष पान)** *(पान ३ वर ▸*

भारताच्या ख्यातनाम गायिका आशा भोसले यांच्या निधनामुळे देशाच्या संगीत क्षेत्राचे अतोनात नुकसान झाले आहे. अनेक दशकांपर्यंत, आपल्या समर्पणशक्तीच्या आणि चित्रपट माध्यमाच्या जोरावर त्यांनी आपल्या कालातीत गीतांच्या माध्यमातून जनमनोरंजन क्षेत्रावर एक अमिट छाप उमटवली आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ त्यांच्या स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. भारताचा सांस्कृतिक वारसा आणि देशाचे देशभक्त यांच्याप्रती असलेली त्यांची निष्ठा सातत्याने आणि स्पष्टपणे दिसून येत असे. या अतुलनीय योगदानासाठी त्यांना सदैव अत्यंत आदराने स्मरले जाईल. ॐ शांती.

**- डॉ. मोहनजी भागवत,** रा. स्व. संघाचे सरसंघचालक

# ‘शांती’ची झोळी रिकामीच

इराण-अमेरिका चर्चा ठरली निष्फळ



### अण्वस्त्र, होर्मुझवरून मतभेद कायम

◆ **इस्लामाबाद, १२ एप्रिल**

संघर्षविरामानंतर शनिवारी पाकिस्तानच्या इस्लामाबाद येथे सुरू झालेली अमेरिका-इराणमध्ये २१ तासांपेक्षा अधिक वेळपर्यंत झालेली शांतता चर्चा अपेक्षेप्रमाणे निष्फळ ठरली. कोणत्याही निष्कर्षापर्यंत न पोहोचलेले अमेरिका आणि इराणचे शिष्टमंडळ रविवारी मायदेशी परतले. दोन्ही देशांनी यासाठी एकमेकांवर दोषारोपण केले. पर्यायाने मध्यपूर्वेत पुन्हा संघर्ष पेटण्याची स्थिती निर्माण झाली आहे.

अण्वस्त्र विकास कार्यक्रम सुरू ठेवणे आणि होर्मुझ सामुद्रधुनीवर पूर्णपणे नियंत्रण या **पान ७ वर**

### हितसंबंधाशी तडजोड नाही

**» इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते इस्माईल बघाई यांनी निवेदनात म्हटले की, संघर्षाविरामानंतर झालेली चर्चा अविश्वास आणि संशयाच्या वातावरणात पार पडली. आम्ही अनेक मुद्यांवर सहमत झालो, परंतु दोन-तीन महत्त्वाच्या अटींवर मतभेद आहेत. कोणत्याही परिस्थितीत इराणी लोकांचे हक्क आणि हितसंबंधाशी तडजोड केली जाणार नाही. होर्मुझवर उपस्थित केलेले मुद्दे गुंतागुंतीचे आहे.** ■

## विचारपुष्प



संघाला आग्रही हिंदू घडवायचा आहे, जो आपल्या हिंदुपणाबद्दल कोणत्याही प्रकारचा न्यूनगंड बाळगणार नाही, उलट हिंदुत्वाबद्दल अभिमान बाळगेल.

**- शंकरराव तत्त्ववादी**
रा. स्व. संघाचे भूतपूर्व विश्व विभाग प्रमुख

## महत्त्वाचे

### भारतीय शेअर बाजारात घसरणीचा धोका वाढला

**मुंबई** : अमेरिका आणि इराण यांच्यातील शांतता चर्चेचा शेवट कोणत्याही ठोस निष्कर्षाविना झाल्याने जागतिक बाजारात अनिश्चितता वाढली आहे. या घडामोडींचा थेट परिणाम भारतीय शेअर बाजारावरही होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तज्ज्ञांच्या मते, दोन्ही देशांतील तणाव कायम राहिल्यास कच्च्या तेलाच्या किंमतीत वाढ होऊ शकते, ज्यामुळे गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास कमी होण्याची शक्यता आहे. याचा परिणाम म्हणून देशांतर्गत शेअर बाजारात पुन्हा घसरणीचे वातावरण निर्माण होऊ शकते. जागतिक स्तरावर भू-राजकीय तणाव वाढला की त्याचा परिणाम सर्वच प्रमुख बाजारांवर दिसून येतो. विश्लेषकांच्या मते, जर पुढील काळात अमेरिका-इराण संबंध अधिक ताणले गेले तर क्रूड ऑइलचे दर आणखी वाढू शकतात. ■

## अमरनाथ यात्रा ३ जुलैपासून सुरू

◆ **श्रीनगर, १२ एप्रिल**

अमरनाथ यात्रेच्या तारखा जाहीर करण्यात आल्या आहेत. जम्मू-काश्मीरचे उपराज्यपाल मनोज सिन्हा यांनी यासंदर्भात माहिती देताना सांगितले की, यावर्षी यात्रा ३ जुलै ते २८ ऑगस्टपर्यंत चालणार असून, १५ एप्रिलपासून नोंदणी करता येणार आहे.

५७ दिवस चालणाऱ्या यात्रेसाठी जम्मू येथील भगवती नगर बेस कॅम्पमधून पहिली तुकडी रवाना होईल. सिन्हा यांनी यात्रेची माहिती देताना प्रसार माध्यमांना सांगितले की, गुहेत पहिली पूजा १९ जून रोजी ज्येष्ठ पौर्णिमेला केली जाईल.

यात्रेसाठी अनंतनाग येथून पारंपरिक ४८ किमी लांबीचा नुनवान-पहलगाम मार्ग आणि गांदरबल येथून १४ किमी लांबीचा बालटाल मार्ग खुला राहणार आहे.

# महिला आरक्षण विधेयकासाठी भाजपाचा व्हीप जारी

◆ **नवी दिल्ली, १२ एप्रिल**

संसदेचे १६ ते १८ एप्रिल दरम्यान विशेष अधिवेशन होणार असून, त्यात महिला आरक्षण सुधारणा विधेयकावर चर्चा केली जाईल. भाजपाने आपल्या खासदारांसाठी व्हीप जारी केला आहे. त्यानुसार अधिवेशनाला सर्व खासदारांना उपस्थित राहणे अनिवार्य असेल.

संसदेच्या विशेष अधिवेशन काळात कोणत्याही खासदाराला किंवा केंद्रीय मंत्र्याला रजा दिली जाणार नाही, असे पक्षाने स्पष्टपणे निर्देश दिले आहेत. सर्व सदस्यांना सभागृहात सतत उपस्थित राहून संसदेच्या कामकाजात सक्रिय सहभागी होण्यास सांगितले आहे. महिला आरक्षण सुधारणा विधेयकावर चर्चा करण्यासाठी हे विशेष संसद अधिवेशन बोलावण्यात आले आहे. या ऐतिहासिक विधेयकावरील व्यापक चर्चेची प्रक्रिया आणि पुढील प्रगतीला गती देणे, हे सरकारचे उद्दिष्ट आहे.

दरम्यान, विरोधी पक्षांनी सरकारकडे अधिवेशनापूर्वी सर्वपक्षीय बैठक बोलावून मतदारसंघ पुनर्रचनेसारख्या मुद्द्यांवर स्पष्ट माहिती देण्याची मागणी केली आहे. विरोधी पक्षांना विश्वासात न घेता विशेष संसदीय अधिवेशन बोलावण्यात आले आणि चर्चेसाठी आवश्यक असलेले महत्त्वाचा तपशील अद्याप अस्पष्ट असल्याचा आरोप काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनी केला.

तृणमूल काँग्रेसचे राज्यसभा खासदार डेरेक ओब्रायन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांनी संसदेची थट्टा केल्याचा आरोप करत जोरदार हल्ला चढवला.



## थोडक्यात महत्त्वाचे...



### शिक्षक आमदार किशोर दराडे यांच्यातर्फे माळी विद्यालयास प्रोजेक्टर संच भेट

**शिरपूर** : येथील पीएमश्री पांडू बापू माळी म्युनिसिपल हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय येथे शिक्षक आमदार किशोर दराडे यांच्यातर्फे आमदार निधीव्दारे प्रोजेक्टर संच भेट देण्यात आला. यावेळी न.प.शिक्षण समिती सभापती शामकांत ईशी, नगरसेवक राज सिसोदिया, डी.पी. महाले, तालुका समन्वयक संतोष आव्हाड, विकास बोरसे पर्यवेक्षक आर.सी. पावरा,के.के.पावरा अधीक्षक जितेंद्र जाधव, उत्सव समिती प्रमुख एस. डी.माळी उपस्थित होते.



### पीएमश्री पां.बा.माळी महाविद्यालयात महात्मा फुले जयंती

**शिरपूर** : येथील पीएमश्री पांडू बापू माळी म्युनिसिपल हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंती निमित्ताने प्रतिमा पूजन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य एस. आर. गवळी, उप मुख्याध्यापिका जे. एस.सोनवणे, पर्यवेक्षक आर.सी. पावरा, के. के.पावरा आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन उत्सव समिती प्रमुख एस.डी. माळी यांनी केले. विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.



### विजयी विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण उत्साहात निःस्वार्थ जनसेवा प्रतिष्ठानचा उपक्रम

**जळगाव** : जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित निंबध, चित्रकला, सुंदर हस्ताक्षर स्पर्धेतील विजयी विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण सोहळा शहरातील बालविश्व प्राथमिक विद्यालयात उत्साहात पार पडला. येथील निःस्वार्थ जनसेवा प्रतिष्ठानतर्फे हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माधवी चव्हाण होते. प्रमुख अतिथी म्हणून रेखा कोळंबे (मुख्याध्यापिका, रायसोनी प्राथमिक विद्यालय), निता पाटील, निता विसावे,अजित चौधरी, नाना पाटील, ज्योती पाटील, रुखसाना खान उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते स्पर्धेत विजयी ठरलेल्या विद्यार्थ्यांना बक्षीस व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी प्रेरणा व शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक धीरज जावळे यांनी सूत्रसंचालन अविनाश जावळे यांनी केले. शारदा सोनवणे यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी धनंजय सोनवणे, भैया पाटील, उज्ज्वला महाजन, प्रतिभा सपकाले, नलिनी पाटील, वैशाली चव्हाण, संगीता बाहेती, प्रियांका पाटील, दिशा ताडे, टीना महाजन, प्रगती खोंडे, स्वाती कोळी, विठ्ठल चौधरी, भास्कर काका व संस्थेच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

### एकलव्य विद्यालयात महात्मा फुले जयंती साजरी

**नंदुरबार** : एकलव्य विद्यालयात महात्मा फुले जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध बालरोग तज्ञ व भाजपा महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष डॉ. समिधा नटावदकर होत्या. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते अनिल खलाणे यांनी आपल्या संबोधनात महात्मा फुले यांच्या जीवनकार्याचा आढावा घेत असे समाज सुधारक शतकातून एकदाच जन्म घेतात व समाज परिवर्तनाचे अनमोल कार्य करतात. महात्मा फुले यांनी केवळ विचार न मांडता आपल्या कृतीद्वारे समाज परिवर्तन घडविले. समाजातील दुर्बल, शोषित, वंचित घटकांना मूळ प्रवाहात आणण्याचे काम केले. आजही महात्मा फुले यांच्या विचारांची समाजाला आवश्यकता आहे असे प्रतिपादन त्यांनी केले. याप्रसंगी व्यासपीठावर एकलव्य विद्यालयाचे मुख्याध्यापक धर्मेंद्र मराठे उप मुख्याध्यापक डॉ. गिरीश पवार, पर्यवेक्षक टिका पाडवी, प्राथमिक विद्या मंदिराचे मुख्याध्यापक सुनील खैरनार, ज्येष्ठ शिक्षक मिलिंद वडनगरे वसंत वसईकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रणाली बोरकर यांनी केले.




### सामाजिक क्रांतीचे अग्रदूत महात्मा फुले यांना अभिवादन

**नंदुरबार** : येथील इस्माईल दगू जनसेवा फाऊंडेशनच्या तर्फे सालाबाद प्रमाणे यावर्षी दिनांक ११ एप्रिल २०२६ शनिवारी रोजी सकाळी साडेनऊ वाजता महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्यास माळीवाडा अति उत्साहाने सामाजिक क्रांतीचे अग्रदूत महात्मा ज्योतिबा फुले यांच्या १९९ वी जयंती निमित्त अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी महात्मा ज्योतिरावजी फुले यांच्या जयंतीनिमित्त यांच्या अर्ध पुतळ्यास पुष्प अर्पण करून अभिवादन करताना इस्माईल दगू जनसेवा फाउंडेशनचे संस्थापक राज्य अध्यक्ष एजाज बागवान, महात्मा ज्योतिराव फुले फाउंडेशनचे अध्यक्ष मधुकर माळी, महात्मा ज्योतिराव फुले समता परिषदचे नंदुरबार जिल्हा सरचिटणीस इंजिनियर रामकृष्ण मोरे, शिवसेना जिल्हाप्रमुख पंडित माळी, निंबा महाजन, नगरसेवक हिरालाल चौधरी, आनंद माळी, जगन माळी, संभाजी महाजन, फारूक कुरेशी, शब्बीर ठेकेदार आदींची उपस्थिती होती

### ऊसाच्या थकित पैशांसाठी शेतकऱ्यांचा आत्मदहनाचा इशारा

**धुळे** : साक्री तालुक्यातील शेतकऱ्यांनी दिलेल्या उसाचे पैसे गेल्या पाच महिन्यांपासून मिळाले नसल्याने संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी आता आत्मदहनाचा इशारा दिला आहे. याबाबत साक्री येथील धनंजय अहिरराव यांनी तहसीलदारांना निवेदन दिले. त्यानुसार एस.एन. शुगर रावळगाव या साखर कारखान्याला नोव्हेंबर २०२५ पासून तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी ऊस पुरवठा केला होता. शासनाच्या नियमानुसार १४ दिवसांत उसाचे पेमेंट देणे बंधनकारक असताना, संबंधित कारखान्याचे प्रमुख बबनराव गायकवाड यांनी अद्यापपर्यंत शेतकऱ्यांचे पैसे दिलेले नाहीत. या संदर्भात शेतकऱ्यांनी अनेक वेळा संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, तसेच १८ मार्च २०२६ रोजी तहसीलदार साक्री यांना आणि प्रादेशिक सहसंचालक साखर, अहिल्या नगर यांना निवेदन देऊन कारवाईची मागणी केली होती. अद्यापही पैसे देण्यात आलेले नाहीत. संतप्त शेतकऱ्यांनी १३ एप्रिल रोजी सकाळी ११ ते १२ वाजेदरम्यान साक्री तहसील कार्यालयाच्या आवारात आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे.

# दिल्ली येथे मागवुन केळीची परस्पर विक्री

## यावलच्या व्यापाऱ्याची साडेतीन लाखात फसवणूक

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव,१२ एप्रिल**

शुभम केला एजन्सीमधून बोलत असल्याची बतावणी करत संशयिताने दिल्ली येथे केळीचा माल पाठविण्याचे वारंवार व्यापाऱ्याला सांगितले. त्यानुसार ट्रक तसेच ट्राला भरुन केळीचा माल यावल बाजार समिती येथुन पाठविला. मात्र हा माल दिल्ली येथे न उतरविता. अन्यत्र खाली केला. मालाचे पैसे ठेवुन घेत संशयिताने सुमारे तीन लाख ५७ हजार ५२१ रुपयांची फसवणूक केली. याप्रकरणी यावल पोलीस ठाण्यात शनिवारी (११ एप्रिल) गुन्हा दाखल करण्यात आला.

ज्ञानेश्वर नामदेव महाजन (वय ५८, रा. निमगाव टेंभी,ता.यावल) हे केळी व्यापारी आहेत. २३ मार्च २०२६ रोजी शुभम केला एजन्सी असे नाव धारण करणाऱ्या एकाने मोबाईलवरुन यावल येथील ज्ञानेश्वर महाजन यांच्याशी वारंवार संपर्क साधला. केळीचा माल दिल्ली येथे पाठवा,असे सांगुन त्याने व्यापाऱ्याचा विश्वास संपादन केला. महाजन यांच्याकडून ट्रक आयशर (आरजे ११ जीडी ३७३६) मधून रुपये १ लाख ६२ हजार ५०० रुपयांचा केळीचा १५८.५० क्विंटल वजनाचा माल तसेच ट्रॉला ट्रक ( आरजे ११ जीडी ३८४७) मधुन रुपये १९५०२१ किमतीचा १६४.२० क्विंटल वजनाचा केळीचा माल दिल्ली येथे मागविला. महाजन यांनी हा माल ऑर्डर दिल्यानुसार शुभम केला एजन्सीला शिवनारायण भाईजी केला स्टोर दिल्ली पंजाबी बाग मे रोड एफ सी ३१२ पिलर या पत्त्यावर पाठविला. मात्र संशयिताने हा माल या ठिकाणी न खाली करता वेगळ्याच ठिकाणी खाली केला.

व्यापारी महाजन यांना या मालाचे पैसे पाठवतो, असे वेळोवेळी सांगितले.तसेच एसबीआय बँकेच्या मशीनमध्ये चेक टाकल्याचे बनावट ट्रांजेक्शन बनावट ट्रांजेक्शनचे स्कीन शॉट मोबाईलवर पाठविले. संशयिताने तीन लाख ५७ हजार ५२१ रुपयांची दिशाभुल करुन फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस नाईक वसीम तडवी हे तपास करीत आहेत.

### पिंपळनेर पोलीस ठाणे आवारातून वाळू डंपर चोरी

**धुळे** : पिंपळनेर पोलीस ठाण्याच्या आवारातून चोरट्यांनी तीस लाख रुपये किमतीचे वाळूचे डंपर चोरून नेल्याची घटना घडली. यासंदर्भात पिंपळनेर पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस पिंपळनेर पोलीस ठाण्याच्या आवारात वाळूने भरलेला विना पासिंगचा डंपर जप्त करण्यात आलेला होता. आठ एप्रिल रोजी मध्यरात्रीनंतर तीस लाख रुपये किमतीचा डंपर चोरट्यांनी चोरून नेला. दुसऱ्या दिवशी सकाळी डंपर चोरीचा प्रकार उघडकीस आला. पोलिसांनी शोध घेऊनही डंपर मिळू शकला नाही. हवालदार हेमंत पाटोळे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार पिंपळनेर पोलीस ठाण्यात डंपर चोरीचा गुन्हा दाखल झाला. सहाय्यक निरीक्षक किरण बर्गे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

# पारोळा तालुक्यात शार्टसर्किटमुळे आग शेतकऱ्यांचे साडेसहा लाखाचे नुकसान

**जळगाव** : दोन वेगवेगळ्या ठिकाणी विद्युत तारेत शॉर्टसर्किट होऊन आग लागली. यामध्ये मका, ज्वारी, ठिबक नळ्या असे शेतकऱ्यांचे तब्बल सहा लाख ५० हजार रुपयांचे नुकसान झाले.

कैलास भगवान पाटील (वय ५२,रा. कन्हेर ता.पारोळा) यांचे कन्हेर शेत शिवारात गट नंबर १५४/२ योजनाबाई माधव पाटील यांच्या नावे असलेल्या शेतात मका लावलेला होता. या ठिकाणी शार्ट सर्कीट होऊन अचानक आग लागली यात मका, चारा, ठिबकच्या नळ्या असे जळुन खाक झाले. यात शेतकऱ्याचे सुमारे दीड लाखाचे नुकसान झाले. ही घटना शनिवारी (११ एप्रिल) दुपारी अडीच वाजेच्या सुमारास घडली. याप्रकरणी तक्रारीनुसार पारोळा पोलीस ठाण्यात अकस्मात आगीची नोंद करण्यात आली. हवालदार डॉ. शरद पाटील हे तपास करीत आहेत.

आगीच्या दुसरी घटना बोदर्डे शिवारात घडली. पांडुरंग पुंडलिक पाटील (वय ६२,रार. बोदर्डे,ता. पारोळा) गट नंबर १७०/३/१ यांचे शेत आहे. याठिकाणी शनिवारी ११ वाजेच्या सुमारास शार्ट सर्किट होऊन आग लागली. यामध्ये मका पीक, चारा, ज्वारीचे पीक तसेच ठिबक नळ्या असे एकुण अंदाजे पाच लाख रुपयांचे नुकसान झाले. या प्रकरणी पोलिसात अकस्मात आगीची नोंद करण्यात आली. हवालदार कैलास साळुंखे हे तपास करीत आहेत.

# धर्माच्या नावाखाली फसवणूकीने समाजाचे नुकसान

## भोंदू बाबांपासून सावक राहा- महामंडलेश्वर जनार्दन हरीजी महाराज

**जळगाव, १२ एप्रिल** : धर्माच्या नावाखाली सामान्यांची फसवणूक करणाऱ्या प्रवृत्तीमुळे समाजाचे नुकसान होत आहे. अशोक खरात सारख्या भोंदू बाबांपासून सावध राहावे, असा इशारा महामंडलेश्वर जनार्दन हरिजी महाराज यांनी दिला.

धानोरा (ता.चोपडा) येथे सतपंथ ज्योत मंदिराच्या जीर्णोध्दार निमित्त आयोजित गोपी गीत कथेचा शुभारंभप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाला पंचकोशीतील भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

'परमेश्वराकडे जाताना प्रपंच किंवा भौतिक सुखाची मागणी करण्यापेक्षा प्रत्यक्ष देवच मागायला शिका. ज्या दिवशी तुमच्या शरीरातील षडरिपू आणि दोष बाहेर पडतील, त्याच क्षणी तुम्ही देवाच्या दर्शनासाठी पात्र ठराल,'' खऱ्या अध्यात्माची ओढ असेल तरच मनुष्याचा उध्दार शक्य आहे, असे ते म्हणाले.

या कथेचे वैशिष्ट्य म्हणजे केवळ हिंदूच नव्हे, तर पंचक्रोशीतील सर्व जाती-धर्माचे नागरिक एकत्र येऊन या भक्ती सोहळ्यात सहभागी झाले



आहेत.हा एकप्रकारे समरसतेचा महाकुंभ असून सर्वधर्मीयांचा यात सहभाग असल्याचे महामंडलेश्वर यांनी सांगितले.

मठ आणि मंदिरे ही केवळ उपासनेची केंद्रे नसून ती गरिबांच्या चिंतेची ठिकाणे आहेत. कोरोनाच्या कठीण काळात या केंद्रांनी केलेले अन्नदान हे त्याचेच प्रतीक आहे. गावात निर्माण झालेली ही समरसता आणि हिंदूंचे संघटन पाहून अभिमान वाटतो, असेही महाराज म्हणाले.

**बदलत्या परंपरांवर चिंता**

आजकाल विवाहाच्या पद्धती आणि मुहूर्तांकडे होणाऱ्या दुर्लक्षावर महाराजांनी भाष्य केले. ''आज लग्नाच्या वेळा बदलत चालल्या आहेत. शास्त्राने सांगितलेले मुहूर्त आता केवळ नावापुरतेच उरले आहेत,'' अशी खंत त्यांनी व्यक्त केली. भारतीय संस्कृती टिकवण्यासाठी परंपरांचे पालन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले.

'ज्यांना खरोखर ईश्वराची प्राप्ती करून घ्यायची आहे, त्यांनी गोपी गीतातील प्रेमभाव समजून घ्यावा. महादेवाला प्रसन्न करण्यापूर्वी स्वतः ला त्या भक्तीसाठी पात्र बनवा.'' असे महामंडलेश्वर जनार्दन हरिजी महाराज यांनी उपस्थित भावीक भक्तांना सांगितले.

कथेत श्रीकृष्णच्या बाल लीला यावर सजीव आरास देखील साकारल्या जात आहेत. सोहळ्यामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय झाल्याचे दिसत आहे.



# एस.व्ही.के.एम. अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे जपानी भाषेत प्राविण्य

**धुळे** : धुळे येथील एस.व्ही.के.एम. अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मेकॅनिकल विभागाच्या (एनबीए मान्यताप्राप्त) विद्यार्थ्यांनी जपानी भाषेत प्राविण्य संपादन केले आहे.

गेल्या काही वर्षात जपानी भाषा शिकण्याचा कल वाढत चालला आहे. उच्च शिक्षणाबरोबरच भारतात आणि जपानमध्येही नोकरीच्या चांगल्या संधी उपलब्ध आहेत. अशात जपानी आणि इंग्रजी या दोन्ही भाषा येणाऱ्यांना सर्वाधिक मागणी आहे. आज जपानमध्ये नोकरी करू शकणाऱ्या इच्छुक तरुण उमेदवारांची कमतरता जाणवत आहे आणि ती दिवसेंदिवस अधिकाधिक जाणवणार आहे. त्यामुळे सर्व पेशांतील चांगल्या मनुष्यबळाला मागणी आहे. सध्याची हिच गरज ओळखून महाविद्यालयाने विद्यार्थ्यांसाठी जपानी भाषा प्रशिक्षण आयोजित केले होते. त्यात मेकॅनिकल अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थी रोहित हिरे, प्रथम बडगुजर, भूमिका पाटील, अक्षदा देशमुख, नेहा माळी, यज्ञेश पाटील, प्रणव शिंदे, हर्षाली मोरे, सिद्धी पगारे, श्रुती यादव, तनिश शर्मा, तेजस अमृतकर, कुलश्री वराडे यांनी जपानी भाषा प्राविण्य स्तर एन ५ यशस्वीरीत्या पूर्ण केले. या प्रशिक्षणासाठी प्राचार्य डॉ. निलेश साळुंके, विभागप्रमुख डॉ. हितेश ठाकरे यांच्यासह प्लेसमेंट ऑफिसर प्रा. करण शर्मा व प्रा. सतीश पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल विद्यार्थ्यांचे एस.व्ही. के.एम. अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, सहअध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष चिंतनभाई पटेल, एसव्हीकेएम एनएमआयएमएस ग्लोबल युनिव्हर्सिटी चान्सलर स्नेहा पारेख, व्यवस्थापन समिती सदस्य राजगोपाल भंडारी, धुळे कॅम्पस चेअरमन संजय अग्रवाल, मार्गदर्शक डॉ.अजय पसारी, प्राचार्य डॉ. निलेश साळुंखे यांनी कौतुक केले.



# नटावद जिल्हा परिषद गटात डॉ. हिना गावितांच्या गटनिहाय बैठका

**नंदुरबार** : भारतीय जनता पक्षाचे संघटन आणि आगामी काळात येणाऱ्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवरमाजी आदिवासी विकास मंत्री आमदार डॉ विजयकुमार गावित यांच्या मार्गदर्शनाखाली माजी खासदार डॉ. हिना गावित यांनी जिल्हा परिषदेच्या गटनिहाय बैठका घेणे सुरू केले असून प्रत्येक जिल्हा परिषद गटातील पक्षीय कार्यकर्ते पदाधिकारी आणि सरपंच उपसरपंच व सदस्य यांच्यामध्ये नवा उत्साह संचारला आहे. नंदुरबार तालुक्यातील नटावद येथे महत्त्वाची आढावा बैठक पार पडली. नटावद येथील सामाजिक सभागृहात पार पडलेल्या या बैठकीत भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते तसेच सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य माजी जिल्हा परिषद सदस्य यांना माजी आदिवासी विकास मंत्री आमदार डॉ विजयकुमार गावित यांच्या मार्गदर्शनाखाली माजी खासदार डॉ हिना गावित यांनी विविध विषयांवर मार्गदर्शनपर महत्त्वाचा संवाद साधला. सरपंच जयश्री गावित, माजी सरपंच पंकज गावित, सरपंच महेंद्र वळवी, पंचायत समिती सदस्य जयंत वळवी, माजी सरपंच ईसाराम वळवी, सरपंच अशोक वळवी, उपसरपंच अविनाश गावित, सरपंच सोनाली वळवी, उपसरपंच दीपक वळवी, इंद्रसिंग महाराज यांच्यासह विविध गावातील सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# कास्ट्राईब महासंघाची जिल्हा प्रशासनासोबत चर्चा

## विभागवार बैठक घेण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आश्वासन

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १२ एप्रिल**

कास्ट्राईब कर्मचारी महासंघाची जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या समवेत विविध प्रश्नांसंदर्भात बैठकीच्या माध्यमातून चर्चा करण्यात आली. यात विभागवार बैठका घेऊन प्रश्न सोडविण्याचे आश्वासन जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी महासंघाला दिले.



कास्ट्राइब कर्मचारी महासंघ जिल्हा जळगावची कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांसंदर्भात जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. बैठकीत अप्पर जिल्हाधिकारी श्रीमंत हारकर, निवासी उपजिल्हाधिकारी वैशाली चव्हाण तसेच आस्थापना तहसीलदार ज्योती गुंजाळ यांच्या समवेत कास्ट्राईब कर्मचारी महासंघाचे नाशिक विभागीय अध्यक्ष रवींद्र तायडे यांच्या नेतृत्वात तसेच कास्ट्राईब शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष बापू साळुंके, वनविभाग कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष विकास सोनवणे, मनपाचे अध्यक्ष सुरेश भालेराव, महासंघाचे जिल्हा कार्याध्यक्ष योगेश अडकमोल, जिल्हा उपाध्यक्ष आनंदकुमार मानकर, जिल्हा संघटक महेश सपकाळे, राहुल सोनवणे, रवींद्र गायकवाड, नंदकुमार गायकवाड, सुभाष तायडे यांची उपस्थिती होती. बैठकीत बिंदू नामावली व सरळ सेवा भरतीबाबत, मागासवर्गीय कक्षास प्राप्त तक्रारींचा निपटारा करणेबाबत, दिव्यांग बिंदू नामावली तसेच यूआयडी कार्ड तपासणी बाबत, विशाखा समिती तक्रार निवारण बाबत, प्रतिनियुक्ती कर्मचारी, वनविभाग परिपत्रक, वर्ग चार कर्मचारी ड श्रेणी आकृतिबंध, आश्वासित योजना लाभ, सेवानिवृत्ती कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रकरण, सेवानिवृत्ती धारकांच्या विधवा, परितक्त्या, विकलांग दुर्बल अपत्य, झालेल्या पदोन्नती यादी, निलंबित व बडतर्फ केलेल्या कर्मचारी, मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना महत्त्वाच्या जागी नेमणुकीबाबत चर्चा करण्यात आली. या सर्व विषयातील अडचणी लवकरात लवकर सोडवण्याची ग्वाही जिल्हाधिकाऱ्यांनी दिली. तसेच पुढील बैठक जिल्ह्यातील सर्व विभागांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात येईल व सर्व विभाग प्रमुखांना वैयक्तिक बैठकीही घेण्याबाबत तात्काळ पत्र देण्यात येईल असे आश्वासन जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

### गावठी कट्टे, तलवार बाळगणारा तरुण गजाआड

**जळगाव** : जनमाणसात दहशत माजविण्याच्या उद्देशाने गावठी कट्टे, तलवार मिरविणाऱ्या तरुणाला पोलिसांनी मुद्देमालासह ताब्यात घेत अटक केली. काहुरखेडा शिवारातील मानपुर रस्त्यावरील सोलर प्लाँट जवळ तलावाच्या काठावर ही कारवाई शनिवारी वरणगाव पोलिसांनी केली. अशोक जगन्नाथ कोळी (वय ६८,रा. मांगलवाडी ता.रावेर हमु. काहुरखेडे ता.भुसावळ) असे संशयिताचे नाव आहे. मानपुर रोडवर संशयित शस्त्र घेऊन वावरत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. संशयिताची अंगझडती घेतली असता त्याच्या कब्ज्यात प्रत्येकी ४० हजार रुपये किमतीचे दोन गावठी कट्टे मॅगझीनसह, आठ रुपये किमतीचे चार जिवंत काडतुस, पाच हजार रुपये किमतीच एक स्टिलची तलवार असा एकुण ९३ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल मिळुन आला. याप्रकरणी वरणगाव पोलीस ठाण्यात आर्म अ‍ॅक्ट नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. घटनास्थळी सहायक पोलीस निरीक्षक अमितकुमार बागुल यांच्यासह अंमलदार यांनी केली. हवालदार यासिन पिंजारी करीत आहेत.

# बचत गटांच्या महिलांसाठी 'मर्जिन मनी' कार्यशाळा उत्साहात

**जळगाव** : समता सप्ताहानिमित्त समाज कल्याण विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'मर्जिन मनी' कार्यशाळा व महिला मेळावा उत्साहात झाला. क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता सप्ताहाच्या औचित्याने हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाला बचत गटातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमात बँक ऑफ महाराष्ट्रच्या प्रोबेशनरी ऑफिसर वृषाली चौरे यांनी अत्यंत सामान्य परिस्थितीतून अधिकारी पदापर्यंतचा प्रेरणादायी प्रवास उलगडत महिलांना आत्मविश्वासाचा संदेश दिला. सेंट्रल बँक ऑफ इंडिया, जळगावचे धीरज श्रीनिवास पाटील यांनी 'स्टँड अप इंडिया' योजनेची सविस्तर माहिती देत कर्ज प्रक्रियेतील सुलभता स्पष्ट केली. 'बँक सखी' रंजना सोनवणे यांनी आपल्या अनुभवातून महिलांना



होणाऱ्या फायद्यांवर प्रकाश टाकला. तसेच जिल्हा उद्योग केंद्राचे उद्योग निरीक्षक ल. गो. तावडे यांनी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम व नवउद्योगांच्या संधींबाबत मार्गदर्शन केले.

यावेळी सहाय्यक आयुक्त योगेश पाटील यांच्या हस्ते बचत गटातील महिलांना भारतीय संविधानाची उद्देशिका व 'महात्मा फुले यांचे समग्र वाङ्मय' पुस्तके भेट देऊन गौरविण्यात आले. महिलांची केवळ आर्थिक नव्हे तर वैचारिक प्रगती व्हावी, हा या उपक्रमामागील उदात्त हेतू असल्याचे त्यांनी नमूद केले. ''महिलांचे आर्थिक सक्षमीकरण ही काळाची गरज असून, समाज कल्याण विभाग त्यासाठी कटिबद्ध आहे,'' असे प्रतिपादन करून 'मर्जिन मनी' योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

मेळाव्यात सहभागी झालेल्या महिलांनी शिलाई, खानावळ, शेतीपूरक व्यवसाय व लघुउद्योगांच्या माध्यमातून साधलेली प्रगती मांडली. स्वावलंबनाच्या वाटेवर आत्मविश्वासाने वाटचाल करत असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी विशेष अधिकारी समाज कल्याण अमोल कुलकर्णी, इतर मागास बहुजन कल्याण अधिकारीविशाल राठोड, कार्यालय अधिक्षक राजेंद्र कांबळे, वरिष्ठ समाज कल्याण निरिक्षक अजय ठाकूर यांचेसह समाज कल्याण विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

# पर्यावरण संवर्धनासाठी नन्नवरे, डॉ. महाजन, वाणी, राणे, फालक यांचा गौरव

## रोटरी क्लब जळगावतर्फे उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना सन्मानचिन्ह प्रदान

**जळगाव** : येथील रोटरी क्लब जळगावतर्फे पर्यावरण संवर्धनासाठी सातत्याने उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शहरातील पाच मान्यवरांचा सन्मानचिन्ह प्रदान करून गौरव करण्यात आला.

गणपती नगरातील रोटरी हॉलमध्ये झालेल्या कार्यक्रमप्रसंगी व्यासपीठावर रोटरी क्लब बडोदा ग्रीनचे प्रेसिडेंट इलेक्ट कौस्तुभ गोखले यांची प्रमुख अतिथी व वक्ते म्हणून तर सहप्रांतपाल डॉ. अपर्णा भट- कासार, प्रेसिडेंट एन्क्लेव्ह जितेंद्र ढाके, अध्यक्ष गिरीश कुलकर्णी, मानद सचिव सुभाष अमळनेरकर यांची विशेष उपस्थिती होती. रोटरी कॅलेंडरप्रमाणे असलेल्या पर्यावरण महिन्यानिमित्त समर्पण संस्था व पर्यावरण शाळेचे संस्थापक राजेंद्र नन्नवरे, आर्यन फाऊंडेशनच्या डॉ. रेखा महाजन, ग्रीन सिटी फाऊंडेशनचे विजय वाणी, वनविभागाचे सेवानिवृत्त अधिकारी राजेंद्र राणे, वन्यजीव संरक्षक संस्थेचे अध्यक्ष रवींद्र फालक यांचा कौस्तुभ



गोखले यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यावेळी प्रमुख वक्ते कौस्तुभ गोखले यांनी रोटरी क्लब बडोदा ग्रीन या पर्यावरणाला समर्पित असलेल्या क्लबने केलेल्या उपक्रमांची माहिती दिली. क्लबने गावे दत्तक घेऊन सीएसआरच्या माध्यमातून पर्यावरण व वेस्ट मॅनेजमेंट विषयी ग्रामस्थांना प्रशिक्षण देत सहभागी करून घेतल्याचे सांगितले. मीयावाकी जंगल, चौपाल कॅफे, इको फर्निचर या नवीन संकल्पनाबद्दल देखील त्यांनी माहिती दिली. शाळेतील विद्यार्थी व नागरिकांसाठी स्पर्धा आयोजित करून अवघ्या अडीच तासात ६५० किलोपेक्षा जास्त ई - वेस्ट मटेरियल संकलित केल्याचे गोखले यांनी सांगितले. त्यांच्या क्लबने केलेल्या काही उपक्रमांची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मन की बातमध्ये दखल घेतली आहे. आपल्या छोट्याशा कृतीतूनही पर्यावरणासाठी मोठी मदत होत असते असे त्यांनी शेवटी सांगितले. आभार प्रदर्शन सुभाष अमळनेरकर यांनी केले. कार्यक्रमास रोटरी इलाईटचे अध्यक्ष संदीप झंवर, रोटरी स्टार्सचे अध्यक्ष विपुल पटेल, रोटरी ग्रीन सिटीचे अध्यक्ष धनश्री ठाकरे यांच्यासह विविध रोटरी क्लबचे अध्यक्ष, सचिव व पर्यावरण समिती प्रमुख तसेच रोटरीचे डिस्ट्रिक्ट ऑफिसर्स यांची उपस्थिती होती.

हे वृत्तपत्र सर्जना मीडिया सोल्युशन्स प्रा. लि. जळगाव, धुळे, नंदुरबारकरिता मुद्रक व प्रकाशक **संजय प्रभाकर नारखेडे** यांनी **पी.एम.उद्योग**, डी–८९, एम.आय.डी.सी., जळगाव, जि.जळगाव येथे छापून गाळा क्रमांक ४, गोलाणी मार्केट, जळगाव येथे प्रकाशित केले आहे. * संपादक : **चंद्रशेखर दिगंबर जोशी** यांची पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी आहे. ■आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६, ■पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएएल/८८/२०२४–२०२६.
■ फोन : ०२५७ – २२४२०३१, २२४२०३२, फॅक्स : २२४२०३३. ■E-mail - jaltbharat@gmail.com
■ editor.tarunbharat.jalgaon@gmail.com, ■E-paper : epaper.tarunbharatlive.com



# ‘जिंदगी इत्तेफाक हैं...’

आशा भोसले यांचा जन्म मंगेशकर कुटुंबातला असून त्यांना मास्टर दीनानाथांचा गाण्याचा वारसा मिळाला. ते कलाकार आणि गायक होते. लता मंगेशकर, हृदयनाथ मंगेशकर आदी भावंडांचे मार्गदर्शन व त्यांची साथ या सगळ्यांतून आशाताईंचा गळा घडत गेला. दीनानाथ मंगेशकरांचे वडील कऱ्हाडे ब्राह्मण आणि आई देवदासी होत्या. अशा अपत्यांना आता गोमंतक मराठा म्हणतात.

आशा भोसले यांनी चित्रपट गायनाची सुरुवात ‘माझा बाळ’ या चित्रपटातून केली. १९५० च्या सुमारास त्यांनी हिंदी चित्रपटांतही अनेक गाणी गायली खरी, पण ते चित्रपट विशेष गाजले नाहीत. त्या काळात हिंदी चित्रपटसंगीतावर लता मंगेशकर, शमशाद बेगम, गीता दत्त अशा गायिका राज्य करत होत्या. त्यामुळे आशाताईंना संधी मिळणे अवघड होते. या गायिकांच्या राज्यात राहून, गाऊन, आपले वेगळे अस्तित्व निर्माण करण्याचे, स्वतःला सिद्ध करण्याचे फार मोठे आव्हान आशाताईंपुढे होते. या दरम्यान त्यांच्या वैयक्तिक आयुष्यातील अडचणी, मुलांची जबाबदारी, प्रतिकूल परिस्थिती या सगळ्या विपरीत घटकांशी सामना करत करत आशाताईंनी ते आव्हान स्वीकारले आणि ते स्वबळावर, आत्मविश्वासाने यशस्वीपणे पेलून दाखवले.

१९५७-१९५८ हे वर्ष आशा भोसले यांचेच होते. सचिन देव बर्मन यांच्याकडे गाण्याची संधी त्यांना मिळाली. त्या संधीचे त्यांनी सोने केले. ‘कालाबाजार’, ‘लाजवंती’, ‘नौ दो ग्यारह’, ‘चलती का नाम गाडी’, ‘सुजाता’ हे आणि असे असंख्य चित्रपट त्यांनी आपल्या आवाजाने अजरामर केले. पुढची पाच दशके आशाताईंनी गाजवली.

अनेक संगीतकारांबरोबर काम केले. अनेक कवींच्या काव्यरचनांना सुरांचे कोंदण दिले. एवढेच नाही तर आपल्या गाण्यांबरोबर त्या चित्रपटांना, त्यातल्या अभिनेत्रींनादेखील अजरामर केले.

ओ. पी. नय्यर आणि आशाताई एक अफलातून जोडी होती. १९६०च्या सुमारास नय्यर यांचे संगीत असणारे ‘आँखोसे जो उतरी है दिलमे’ (फिर वही दिल लाया हूँ ) हे गाणे; १९६५चे ‘जाइये आप कहाँ’ (मेरे सनम); १९६८ मधील ‘वो हसीन दर्द देदो’ (हम साया); ‘चैन से हमको कभी’ अशी अनेक प्रसिद्ध गाणी त्यांनी गायली.

हिंदीबरोबर आशा भोसलेंची मराठी गाण्यांची कारकीर्द बहरतच होती. सुधीर फडके, हेमंत कुमार, लता मंगेशकर, सुरेश वाडकर, अनुराधा पौडवाल अशा गायक-गायिकांबरोबरची गाणी मराठी रसिकमनात घर करून राहिली आहेत. बा. भ. बोरकर, आरती प्रभू, ग. दि. माडगुळकर, शांता शेळके, सुरेश भट, सुधीर मोघे यांच्या कवितांबरोबर सौमित्रसारख्या नव्या दमाच्या कवींच्या कविताही आशाताईंच्याच आवाजात रसिकांपुढे आल्या. सर्व कवींच्या शब्दांना आशाताईंनी सुरेल न्याय दिला. ‘तरुण आहे रात्र अजुनी’, ‘जिवलगा राहिले रे दूर’, ‘ही वाट दूर जाते’, ‘फुलले रे क्षण माझे’, ‘झिनी झिनी वाजे’, ‘गेले द्यायचे राहूनी’, ‘गंध फुलांचा गेला सांगून’, ‘आज कुणीतरी यावे’, ‘एका तळ्यात होती बदके’ अशा लोकप्रिय गीतांची यादी प्रचंड आहे.

हिंदी चित्रपट गीतांचा विचार करता आशा भोसले यांनी एस.डी.बर्मन यांच्यापासून ते ए.आर. रहमानपर्यंतच्या विविध कालखंडांतील, अनेक प्रकारच्या संगीतकारांबरोबर काम केले आहे. मराठीतही दत्ता डावजेकर-श्रीनिवास खळे यांच्यापासून ते श्रीधर फडके यांच्यापर्यंत असंख्य संगीतकारांच्या रचनांना त्यांनी सुरेल साज चढवला आहे. मधुबाला-मीनाकुमारीपासून ते अलीकडच्या तब्बू-उर्मिला मातोंडकर-ऐश्वर्या रायपर्यंतच्या अभिनेत्रींना त्यांनी आपला आवाज दिला आहे. त्यांनी मोहम्मद रफी, किशोर कुमार व सुधीर फडके यांच्याबरोबरचा काळ तर गाजवला आहेच, तसेच त्या आज हृषीकेश रानडे सारख्या तरुण गायकाबरोबरही गायले.





## अल्पपरिचय

**जन्म** : सांगली येथे ८ सप्टेंबर १९३३
**मृत्यू** : १२ एप्रिल २०१६
**निवासस्थान** : प्रभुकुंज अपार्टमेन्ट, पेडर रोड, दक्षिण मुंबई.
**कारकीर्दीचा काळ** : १९४३ पासून
**जोडीदार** : गणपतराव भोसले, दुसरा विवाह राहुलदेव बर्मन
**अपत्ये** : हेमंत, वर्षा, आनंद
**वडील** : दीनानाथ मंगेशकर
**आई** : शेवंती उपाख्य शुद्धमती मंगेशकर

कॅनडा, इंग्लंड, अमेरिकेची संयुक्त संस्थाने, स्विडन आदि अनेक देशांत झालेले कार्यक्रम, परकीय संगीतकारांबरोबर केलेले काम, ‘राहुल ॲण्ड आय’सारखा अल्बम, लेस्ली लुईबरोबरचे काम असे अनेक नवनवे प्रयोग आशा भोसले यांनी केले. वयाच्या ७४ व्या वर्षी त्यांनी ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू ब्रेट ली, अभिनेता संजय दत्त यांच्याबरोबर गाण्याचा प्रयोग केला. ‘आशा ॲण्ड फ्रेन्ड्स’ या अल्बमचा हा प्रयोग कमालीचा यशस्वी ठरला होता.

आशा भोसले यांच्या निधनामुळे संगीतविश्वात एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे. एक दिग्गज गायिका म्हणून त्यांच्या दैदीप्यमान कारकीर्दीने भारतातील संगीताचा एक संपूर्ण कालखंडच परिभाषित केला आहे. त्यांच्याशी प्रत्यक्ष संवाद साधल्याच्या माझ्या अनेक सुखद आठवणी आहेत. एक कलाकार आणि एक व्यक्ती म्हणून, त्या आपले आयुष्य आपल्या स्वतःच्या अटींवर जगल्या. आपल्या सुमधुर आणि कालातीत आवाजाने त्यांनी अनेक दशके भारतीय संगीताला समृद्ध केले. त्यांचे संगीत सदैव अजरामर राहील. मी त्यांच्या कुटुंबीयांना आणि असंख्य चाहत्यांना माझ्या मनापासून संवेदना व्यक्त करते.

**- द्रौपदी मुर्मू,** राष्ट्रपती

भारतातील सर्वांत ख्यातनाम आणि अष्टपैलू आवाजांपैकी एक असलेल्या आशा भोसले यांच्या निधनाने अतिशय दुःख झाले. त्यांच्या अनेक दशकांच्या अद्वितीय संगीत प्रवासाने आपल्या सांस्कृतिक वारशाला समृद्ध केले आणि जगभरातील असंख्य लोकांच्या मनाला स्पर्श केला. भावपूर्ण गीतांपासून ते जोशपूर्ण संगीत रचनांपर्यंत, त्यांच्या आवाजात कालातीत तेज होते. त्यांच्याशी झालेल्या संवादांच्या आठवणी मी सदैव जपून ठेवेन. त्यांच्या कुटुंबीयांना, चाहत्यांना आणि संगीतप्रेमींना माझ्या भावपूर्ण संवेदना. त्या पुढील पिढ्यांना प्रेरणा देत राहतील आणि त्यांची गाणी सदैव लोकांच्या आयुष्यात गुंजत राहतील.

**-नरेंद्र मोदी,** पंतप्रधान

भारतीय संगीत विश्वातील एक अत्यंत प्रतिष्ठित आणि दिग्गज व्यक्तिमत्त्व असलेल्या गायिका तथा पद्मविभूषण सन्मानप्राप्त आशा भोसलेयांच्या निधनाची बातमी अत्यंत दुःखद आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्याशी माझे अत्यंत जवळचे, कौटुंबिक ऋणानुबंध होते. त्यांच्या जाण्यामुळे भारताच्या संगीत क्षेत्राची कधीही भरून न येणारी हानी झाली आहे. आपल्या असाधारण प्रतिभेच्या जोरावर, आशा भोसले यांनी संगीत क्षितिजावर आपली एक आगळीवेगळी ओळख निर्माण केली. आपल्या सुमधुर आवाजाच्या जोरावर त्यांनी अनेक अजरामर चित्रपट आणि गीतांना अजरामर केले. ही गीते विविध युगांत आणि पिढ्यांमध्ये लोकप्रिय ठरली. यामध्ये ‘नया दौर’, ‘तीसरी मंझिल’, ‘हरे रामा हरे कृष्णा’ आणि ‘उमराव जान’पासून ते ‘इजाजत’ आणि ‘रंगीला’पर्यंतच्या चित्रपटांचा समावेश आहे. एक पार्श्वगायिका म्हणून त्यांनी असंख्य अविस्मरणीय गीते रसिकांच्या भेटीस आणली. त्यांचा आवाज आणि संगीत क्षेत्रातील त्यांचे अजोड योगदान येणाऱ्या अनेक पिढ्यांपर्यंत स्मरणात राहील. ईश्वर त्यांच्या दिवंगत आत्म्यास शांती देवो आणि त्यांच्या शोककुल कुटुंबाला हे दुःख सहन करण्याची शक्ती प्रदान करो. ॐ शांती.

**- नितीन गडकरी,** केंद्रीय मंत्री

आशा भोसले या देशातीलच नाही तर संगीत विश्वातील सिद्धहस्त आणि प्रतिभासंपन्न पार्श्वगायिका होत्या. आपल्या अवीट स्वरांनी, विविध संगीत प्रकार लीलया गाण्याच्या क्षमतेने आणि संगीतातील व्यापक योगदानामुळे त्यांनी संगीत रसिकांच्या अनेक पिढ्यांवर राज्य केले. आपल्या जवळपास आठ दशकांच्या सांगीतिक कारकीर्दीत त्यांनी विविध भाषा व संगीत प्रकारांमध्ये असंख्य अजरामर गीते सादर करून भारताच्या सांस्कृतिक परंपरेला समृद्ध केले. आशाजींची भावोत्कटता व कलेप्रती बांधिलकी भावी पिढ्यांमधील कलाकार आणि रसिकांना प्रेरणा देत राहील. ‘जो भी है बस यही एक पल है’ हे त्यांचे गाजलेले गीत त्यांच्या जीवनाचे तत्त्वज्ञान झाले होते. या दुःखद प्रसंगी मी महाराष्ट्रातील जनतेच्या तसेच आपल्या स्वतःच्या वतीने दिवंगत आशाजींना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो आणि त्यांच्या कुटुंबीयांना, चाहत्यांना तसेच संपूर्ण संगीत क्षेत्राला आपल्या शोकसंवेदना कळवतो.

**- जिष्णू देव वर्मा,** राज्यपाल

तीन वर्षांपूर्वी धडाक्यात नव्वदी साजरी करणाऱ्या ज्येष्ठ गायिका, पद्मविभूषण, महाराष्ट्र भूषण आशाताई भोसले यांच्या निधनाचे वृत्त अतिशय दुःखद आहे. त्यांच्या निधनाने मंगेशकर घराण्यातील लतादीदींनंतर आणखी एक तारा निखळला आहे. सुरांची सुंदर बाग आज उजाड झाली. आशाताईंचा आवाज म्हणजे संगीताचा आत्मा होता. गायनातील बारमाही हिरवा ऋतू आणि भावभावनांचा सुरेल असा महासागर म्हणजे आशाताई. ‘तोरा मन दर्पण कहलाए’ अशा भावपूर्ण गाण्यापासून ‘खल्लास’पर्यंत अनेक मूडची गाणी लीलया गाणाऱ्या आशाताई भोसले यांनी भक्तिगीत, भावगीत, नाट्यसंगीत, गझल, शास्त्रीय संगीत, रवींद्र संगीत, लोकगीते, पॉप असे अनेक संगीत प्रकारांचे गायन करताना त्यावर आपला वेगळा ठसा उमटवला. मराठी, हिंदी, बांगलासह २० भारतीय भाषा आणि विदेशी भाषांमध्ये १२,००० वर गाणी त्यांनी गायली. अलिकडेच जागतिक रेडिओ दिनाच्या कार्यक्रमात आम्ही सोबत होतो, त्यांनी आग्रह करून ‘अभी ना जाओ छोडकर...’ हे गाणे माझ्याकडून गाऊन घेतले होते आणि ‘पहा मी मुख्यमंत्र्यांना गाणे गायला लावले’, असे म्हणाल्याही होत्या. त्या आशाताईंचा सहवास आता आपल्याला लाभणार नाही, ही कल्पनाच करवत नाही.

**- देवेंद्र फडणवीस,** मुख्यमंत्री

भारतीय संगीत सृष्टीतील अढळ ध्रुवतारा आणि आपल्या सुरावलींनी अवघ्या जगाला मोहिनी घालणाऱ्या पद्मविभूषण, महाराष्ट्र भूषण आशा भोसले यांच्या निधनामुळे देशाने एक महान स्वरसम्राज्ञी गमावली आहे. गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या निधनानंतर आता आशाताईंच्या जाण्याने महाराष्ट्राला मोठा धक्का बसला आहे. आज प्रत्येक रसिकाच्या मनात एकच आर्त साद उमटत आहे, ‘अभी ना जाओ छोडकर, के दिल अभी भरा नहीं.’ आशाताईंनी त्यांच्या गाण्यांनी आपल्याला इतके समृद्ध केले की, त्या कधीतरी आपल्याला सोडून जातील ही कल्पनाच सहन होत नाही. त्यांच्या आवाजातील तोच उत्साह आणि तीच तरलता आता पुन्हा कधीच ऐकायला मिळणार नाही. आशाताई म्हणजे केवळ एक गायिका नव्हत्या, तर त्या संगीतातील चैतन्याचा झरा होत्या. भक्तिगीत असो, लावणी असो किंवा पाश्चात्य ढंगाची गाणी, प्रत्येक सुरात त्यांनी स्वतःचा वेगळा ठसा उमटवला. सर्वाधिक गायनाचा विक्रम करून त्यांनी गिनीज बुक मध्ये आपले नाव नोंदवले.

**- एकनाथ शिंदे,** उपमुख्यमंत्री

## मिळालेले प्रमुख पुरस्कार



- भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च सन्मान दादासाहेब फाळके पुरस्कार-२०००
- भारताचा दुसऱ्या क्रमांकाचा नागरी सन्मान पद्मविभूषण-२००८
- महाराष्ट्र भूषण-२०२१
- बंगा विभूषण- २०१८

### फिल्मफेअर पुरस्कार

- सर्वोत्कृष्ट महिला पार्श्वगायिका- सात वेळा विजेत्या
- फिल्मफेअर विशेष पुरस्कार-१९९६
- फिल्मफेअर लाईफटाईम अचिव्हमेन्ट-२०२१

### राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार

- दोन वेळा राष्ट्रीय पुरस्कार
- ‘दिल चीज क्या है’-उमराव जान (१९८१)
- ‘मेरा कुछ सामान’-इजाजत (१९८६)

### आंतरराष्ट्रीय आणि इतर पुरस्कार

- ग्रॅमी पुरस्कारासाठी दोन वेळा नामांकन
- बीबीसी लाईफटाईम अचिव्हमेन्ट अवॉर्ड-२००२
- एमटीव्ही अवॉर्ड- १९९७, २००१
- झी सिने अवॉर्ड, आयफा अवॉर्ड-२००२
- नाईटटिंगेल ऑफ एशिया अवॉर्ड -१९८७
- सिंगर ऑफ मिलेनियम- २००० दुबई

### इतर उल्लेखनीय कामगिरी

- महाराष्ट्र राज्य चित्रपट पुरस्कार- १८ वेळा
- सर्वाधिक गाणी रेकॉर्ड करणाऱ्या कलाकार म्हणून गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद



## अवघ्या दहाव्या वर्षी पहिले गाणे

आशा भोसले यांच्या दीर्घ आणि यशस्वी कारकीर्दीची सुरुवात अतिशय लहान वयात झाली. त्यांचे पहिले गाणे १९५० मध्ये आलेला मराठी चित्रपट ‘माझा बाळ’ साठी होते. या चित्रपटातील ‘चला चला नव बाळा’ हे गाणे त्यांनी अवघ्या १० वर्षांच्या वयात गायिले.

त्या काळात त्यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती कठीण होती, त्यामुळे लहान वयातच त्यांना गायन क्षेत्रात काम करावे लागले. त्यांच्या आवाजात नैसर्गिक गोडवा आणि लयबद्धता होती, ज्यामुळे हे पहिले गाणे लक्षवेधी ठरले. जरी सुरुवातीला त्यांना मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी मिळाली नाही, तरी याच गाण्यामुळे त्यांच्या कारकीर्दीची पायाभरणी झाली.

पुढे त्यांनी हिंदीसह विविध भाषांमध्ये हजारो गाणी गायली आणि जागतिक स्तरावर नाव कमावले. त्यामुळे ‘चला चला नव बाळा’ हे गाणे त्यांच्या संगीत प्रवासाचा महत्त्वाचा टप्पा मानले जाते.



## ‘सावन आया’ने हिंदी पार्श्वगायनाला सुरुवात

आशा भोसले यांना हिंदी चित्रपटसृष्टीत पार्श्वगायनाची पहिली संधी सहजासहजी मिळालेली नाही. साधारणपणे १९४८ मध्ये त्यांनी ‘चुनरिया’ या चित्रपटात ‘सावन आया’ हे पहिले हिंदी गीत गायिले, असे मानले जाते. त्या वेळी त्या फक्त १४-१५ वर्षांच्या होत्या.

या गाण्यामागील कथा खूप संघर्षमय आहे. मोठी बहीण लता मंगेशकर यांना मोठ्या चित्रपटांत संधी मिळत असताना, आशाजींना मात्र बी-ग्रेड चित्रपट, कमी बजेटची गाणी किंवा दुय्यम भूमिका असलेली गाणी मिळत होती.‘सावन आया’ हे गाणे त्यांनी अत्यंत कमी मानधनात रेकॉर्ड केले. त्या काळात त्यांना स्वतःची ओळख निर्माण करण्यासाठी खूप मेहनत घ्यावी लागली. अनेक संगीतकार त्यांना मुख्य गायक म्हणून संधी देण्यास तयार नव्हते. परंतु, या सुरुवातीच्या संघर्षामुळेच त्यांच्यात आत्मविश्वास आणि वेगळेपण निर्माण झाले. पुढे त्यांनी ओ. पी. नैयर, आर. डी. बर्मन यांच्यासोबत काम करत स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली. थोडक्यात, आशा भोसले यांचे पहिले हिंदी गाणे हे त्यांच्या दीर्घ आणि यशस्वी कारकीर्दीची सुरुवात होती, ज्याची पायाभरणी संघर्ष आणि चिकाटीवर झाली.



## मोठ्या संघर्षानंतर मिळाला ‘ब्रेक’

आशा भोसले यांना हिंदी चित्रपटसृष्टीत खूप संघर्ष केल्यानंतर मोठा ‘ब्रेक’ मिळाला. त्यामागे एक रोचक कहाणी आहे. लहान वयातच गाण्याची सुरुवात केलेल्या आशा भोसले यांना सुरुवातीला फार मोठ्या संधी मिळत नव्हत्या. त्या काळात लता मंगेशकर यांचे वर्चस्व होते, त्यामुळे निर्मति- दिग्दर्शक आशा यांना दुय्यम गाणी देत असत.

त्यांचा खरा ब्रेक १९५० च्या दशकात ‘सीआयडी’ या चित्रपटातून मिळाला. या चित्रपटाचे संगीत ओ. पी. नय्यर यांनी दिले होते. नय्यर यांनी आशा भोसले यांच्या आवाजातील वेगळेपणा ओळखला आणि त्यांना संधी दिली. ‘जरा हौले हौले चलो मोरे साजना’ सारखी गाणी लोकप्रिय झाली आणि आशा भोसले यांचे नाव लोकांच्या लक्षात आले.

यानंतर त्यांच्या कारकीर्दीला मोठे वळण मिळाले ते ‘नया दौर’ चित्रपटातून. या चित्रपटातील ‘उड़े जब जब ज़ुल्फें तेरी’ आणि ‘मांग के साथ तुम्हारा’ ही गाणी प्रचंड गाजली. यामुळे आशा भोसले हिंदी चित्रपटसृष्टीत एक प्रमुख गायिका म्हणून स्थापित झाल्या.

या यशामागे त्यांच्या मेहनतीसोबतच ओ. पी. नय्यर यांचा मोठा वाटा होता. त्यांनी आशा भोसले यांना वेगळी ओळख मिळवून दिली आणि त्यांच्या करिअरला नवी दिशा दिली. संघर्षातून पुढे येत ‘सीआयडी’ आणि ‘नया दौर’ या चित्रपटांनी आशा भोसले यांना हिंदी चित्रपटसृष्टीत खऱ्या अर्थाने ‘ब्रेक’ मिळवून दिला.



## संगीताच्या प्रत्येक युगाची ‘आशा’

### २० भाषा, १२ हजारांवर गाणी आणि सुरांची बाग!

भजनांपासून कव्वालीपर्यंत, कॅब्रेपासून भावगीतांपर्यंत, गजलांपासून पॉपपर्यंत, तामिळ-तेलुगूपासून बंगाल उर्दूपर्यंत... भारतासह जगभरातील संगीतक्षेत्रात गेल्या आठ दशकात आलेल्या प्रत्येक नव्या युगाची ‘आशा’ निमाली. वयाच्या दहाव्या वर्षी एका मराठी गीताने सुरू झालेला प्रवास ९२ व्या वर्षी पूर्ण झाला. लो बजेट चित्रपटांसाठी गाणारी, लतादीदींच्या प्रभावाखाली काहीशी दबलेली आशा, स्वतःच्या गायकीवर काम करत गेली आणि आज गाण्यांचा विश्वविक्रम करून अजरामर झाली.

एका मुलाखतीत आशाताई म्हणाल्या होत्या, विचार केला की,मी दीदीसारखीच गात राहिले तर माझी स्वतःची ओळख कधीच निर्माण होणार नाही. स्वतःच्या गायकीमध्ये विविध शैली आणण्याचा सराव केला. इंग्रजी चित्रपट बघून त्या गाण्यांचा अवाका लक्षात घेतला. वेस्टर्न गायकी समजून घेतली. हिंदीसोबत उर्दू उच्चारांचा सराव केला. आवाजात गाण्याच्या गरजेनुसार बदल करण्यास शिकले. त्यांच्या या अभ्यासाचा परिणाम म्हणून २० पेक्षा जास्त भारतीय आणि इतर भाषांमध्ये १२ हजारांवर गाणी गायल्याचा विक्रम आशाताईंच्या नावे झाला. यात सर्व प्रमुख भारतीय भाषांसोबतच नेपाळी, मल्याळी, रशियन, झेक भाषांमध्येही त्या गायल्या आणि रसिकांनीही गाणी उचलून धरली. विशेषतः ‘बो डाऊन मिस्टर’साठी बॉय् जॉर्जसोबत गायलेल्या गीताने त्यांच्या चाहत्यांचा विस्तार पाश्चिमात्त्य देशांमध्ये झाला. ग्रॅमी पुरस्कारासाठी नामांकन मिळालेल्या पहिल्या भारतीय गायिका आशाताई जगातील सर्वाधिक स्टुडिओ रेकॉर्डिंग झालेल्या गायिका आहेत आणि हा विक्रम गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डस्‌मध्ये त्यांच्या नावे कायम आहे. वर्ष २०११ मध्ये हा विक्रम नोंदविण्यात आला.

तत्पूर्वी, बॉलिवूडमधील सर्वाधिक प्रयोगशील दशक १९७० मध्ये आशा भोसलेंच्या खट्याळ, मादक आणि स्टायलिश आवाजाने लोकांना वेड लावले. ८० च्या दशकात‘उमरावजान’प्रदर्शित झाला आणि आशाच्या शास्त्रीय गायकीने सगळे अंदाज साफ चुकवले. ९० च्या दशकात रेकॉर्डिंगचे तंत्रज्ञान बदलले पण, आशाताईंची ‘इंडी पॉप’मधील लोकप्रियता निःशंक होती.

दैवी देणगी असलेल्या आवाजाला त्यांनी परिश्रमाने पैलू पाडले आणि त्या अंतिम गाणे २०२२ मध्ये प्रदर्शित ‘लाईफ इज गुड’ या चित्रपटासाठी गायल्या. आशाताईंच्या गाण्यांचा स्वॅग प्रत्येक पिढीतील संगीत प्रेमींसाठी आदर्श ठरणार आहे. गाण्यापूर्वी भाषेचा अभ्यास आणि शब्दांच्या उच्चारावर घेतलेले श्रम आशा भोसले यांचे कर्तृत्व ऐतिहासिक ठरवतात.



## अमरावती विद्यापीठाने दिली होती ‘डी. लिट.’




**कुलगुरू डॉ. के. जी. देशमुख यांच्या हस्ते ‘डी.लिट. उपाधी स्वीकारताना आशा भोसले**

बहुआयामी आणि अजरामर स्वराच्या धनी आशा भोसले यांना १९८७ मध्ये अमरावती विद्यापीठाने दीक्षान्त समारंभात डी. लिट. पदवी देऊन सन्मानित केले होते. त्यावेळी विद्यापीठाच्या तिसऱ्या दीक्षान्त सोहळ्यात प्रथम कुलगुरू डॉ. के. जी. देशमुख यांनी आशा भोसले यांना ही उपाधी देऊन सन्मानित केले होते. तत्कालीन व्यवस्थापन मंडळ सदस्य आणि अकोल्यातील श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. डॅडी देशमुख यांचा प्रस्ताव मंजूर झाल्यावर अमरावती विद्यापीठाने त्यांना सन्मानित करण्याचा निर्णय घेतला होता.

आमच्या कुटुंबाच्या कठीण काळात अमरावतीकर प्रेक्षकांनी सातत्याने मदत केली, असे माझी आई नेहमीच सांगायची. आज मी इतकी शिकली नसतानाही अमरावती विद्यापीठाने माझा डी. लिट. देऊन गौरव केला, हा माझ्यासाठी महत्त्वाचा क्षण असल्याची भावना त्यावेळी आशा भोसले यांनी व्यक्त केली होती, असे अमरावती विद्यापीठाचे तेव्हाचे जनसंपर्क अधिकारी प्रा. डॉ. किशोर फुले यांनी आठवणींना उजाळा देताना सांगितले.

## अग्रलेख...

# मेरा कुछ सामान तुम्हारे पास पडा हैं...

पंडित हृदयनाथ मंगेशकरांनी कुठल्या तरी एका कार्यक्रमात सांगितलेला किस्सा. लतादीदी, मीनाताई या सगळ्या मास्टर दीनानाथ मंगेशकर यांच्यासमोर गात असायच्या त्यावेळी छोट्या आशा मंगेशकर खेळत-बागडत असायच्या. आईने एकदा दीनानाथांना सांगितले की, या मुली गातात, ही आशा मात्र गात नाही. त्यावर मास्टर दीनानाथ म्हणाले होते की, ती बंदिशी पाठ करीत नाही. गाणे शिकत नाही. पण, सर्व गोष्टींचा तिचा रियाज आतल्या आत सुरू आहे. एक दिवस असा येईल की, ती कुणालाच काहीही लक्षात न येता फार मोठी गायिका म्हणून प्रसिद्ध होईल!...आणि झाले अगदी तसेच. बालपणी खेळण्यात रमलेली, सुरुवातीला फारशी गंभीर न झालेली आशा जागतिक कीर्तीची गायिका बनली आणि तिने अनेक दशके स्वरसम्राज्ञीचे पद भूषविले. गजल, ठुमरी, लावणी, भावगीत, भजन, पॉप-रॅप असे सारे प्रयोग केले. आशा पारेख, मुमताज, साधना, मधुबाला, मीनाकुमारी, झीनत अमान, हेलन ते माधुरी दीक्षित-करिश्मा कपूर-काजोल आणि उर्मिला मातोंडकर यांच्यापर्यंत अनेकींना आशाताईंनी स्वर दिला. अशा आशाताईंचा श्वास रविवारी, १२ एप्रिल रोजी थांबला. हजारो गाणी आणि त्यातील त्यांचा सुरेल आवाज, आर्तता, मादकता, नाद आणि खट्याळपणा हे सारे त्यांनी रसिकांसाठी मागे सोडले आहे. प्रत्येक मानवी भावनेशी निगडित असलेले एक तरी गाणे आशाताईंनी गायिलेले आहे. नऊ दशकांच्या वळणदार आणि संघर्षमय जीवनात सात दशकांहून अधिक काळ संगीताशी नाते कायम ठेवलेल्या आशाताईंची गाणी हे भारतीय संगीतातील फार मोठे संचित आहे. आशाताई आता आपल्यात नसल्या तरी त्यांच्या सुरावटींच्या रूपाने त्या आपल्या साऱ्यांच्या काळजात सदैव अमर असतील. अमर सुरांच्या या सम्राज्ञीला आदरांजली.

आशा मंगेशकरांची आशा भोसले झाली कोवळ्या वयात. लहानग्या वयापासून घरातली सगळी कामे आणि पुढे मुलांची जबाबदारी. तरुण वयात जोडीदार सोडून गेला. एकीकडे घर आणि मुलांचा सांभाळ आणि दुसरीकडे जमेल तशी गायकी. स्वातंत्र्योत्तर काळाचे दशक उलटता-उलटता लतादीदी ख्यातकीर्त झालेल्या होत्या. गीता दत्त आणि शमशाद बेगम यांच्यासारख्या गायिकांचे चित्रपटसृष्टीवर अधिराज्य होते. हिंदी चित्रसृष्टीला बहर आला होता. आशा भोसले धडपडत होत्या. त्या गात होत्या, काही हिंदी-मराठी गाणी रेकॉर्ड पण झाली होती, त्यांच्या गाण्याला मान्यता मात्र मिळाली नव्हती. १९५७ मध्ये दिलीपकुमार आणि वैजयंतीमालाचा 'नया दौर' हा चित्रपट आला. साहिर लुधियानवीने लिहिलेल्या आणि ओ. पी. नय्यर यांनी संगीतबद्ध केलेल्या गाण्यांनी आशा भोसले हे नाव प्रकाशात आले. तत्पूर्वी सचिन देव बर्मन यांच्यासोबत त्या गायिल्या होत्या. त्यांचे चित्रपट चालले होते. पण आशा भोसले यांचे दमदार गायिका असे नाव झाले नव्हते. यश त्यांना हुलकावण्या देत होते. आशाताईंच्या जीवनात 'नया दौर'च्या निमित्ताने खरोखर नवे युग सुरू झाले. तेव्हापासून आशाताईंचे गाणे जे नव्या दमाने सुरू झाले, ते अखेरपर्यंत थांबले नाही. आशाताईंचा खरा प्रवास सुरू झाला तेव्हा लतादीदी प्रस्थापित झाल्या होत्या. घर आणि घराणे एकच. महावृक्षाच्या सावलीत स्वतःच्या गायकीच्या वृक्षाला बहर आणायचा हे आव्हानच होते. ते त्यांनी स्वीकारले. संकटे, संघर्ष, दगदग यांचे सावट कलेवर आणि साधनेवर पडू दिले नाही. त्या सतत गात राहिल्या. प्रयोग करीत राहिल्या. त्यांनी तब्बल बारा हजारावर गाणी गायिली. प्रामुख्याने ती हिंदी आणि मराठीतच असली तरी देशातल्या आणि जगातल्या एकूण २० भाषांमध्ये त्या गायिल्या. बंगाली, गुजराती, आसामी, भोजपुरी, पंजाबी, तमिळ, मल्याळम, तेलगू, नेपाळी आणि इंग्रजीतही त्या गायिल्या.

आर. डी. बर्मन यांच्याशी आशाताईंचे दुसरे लग्न झाले होते. आर. डी. उपाख्य पंचमदा आणि आशाताईंनी सिनेसृष्टीला अवीट गोडीची आणि विविध धाटणीची अनेक गाणी दिली. या जोडीने चित्रसृष्टीच्या संगीताचा चेहरामोहराच बदलून टाकला. काही वर्षांपूर्वी आशाताईंची एक मुलाखत झाली होती. त्यात त्या म्हणाल्या होत्या की, पंचमना (आर. डी. बर्मन) भेटेपर्यंत आपण इतक्या ताकदीने आणि विविधतेने गाऊ शकतो, याची मला कल्पनाच नव्हती. ओ. पी. नय्यर यांनी प्रस्थापित केलेल्या आशाताईंना एका धाटणीत न अडकवता वैविध्यात रमविले ते आर. डी. बर्मन यांनी. पुढे १९८१ मध्ये आलेल्या 'उमराव जान'मध्ये रेखा जितकी गाजली, तितकीच गाजली आशा भोसलेंची गायकी. शहरयार यांनी लिहिलेली गाणी, खय्यामचे संगीत आणि आशाताईंचा सूर यातून दिल चीज क्या है, इन आँखों की मस्ति के, जुत्सजू जिसकी थी अशा एकाहून एक सरस चीजा चित्रपट संगीताला मिळाल्या. आशाताईंच्या स्वरांत गाण्यातील भावनेच्या गरजेप्रमाणे खट्याळपणा असे आणि आर्तताही. गंमतही असे आणि गांभीर्यही. 'उडे जब जब जूल्फें तेरी' ते 'चैन से हमको कभी' ही त्यांची एकमेव 'रेंज नव्हे'. अशा कितीतरी 'रेंजेस' त्यांच्या हजारो गीतांतून काढता येतील. बंधू हृदयनाथ मंगेशकर, कवी सुरेश भट, सुधीर फडके, शांताराम नांदगावकर, जगदीश खेबुडकर, शांता शेळके, राजा बढे, सी. रामचंद्र अशी कित्येक नावे आहेत, ज्यांच्या साथीने आशाताईंच्या मराठी संगीतातील योगदानाचा उल्लेख करावा लागतो. ही सारी अत्यंत प्रतिभावंत मंडळी. गीतकाराच्या शब्दांना आवाज देणे किंवा चालीवर गाणे एवढेच गायकाचे काम नसते. शब्दांमागील भाव गायकाला व्यक्त करावा लागतो. सुरात गातानाही शब्दांना न्याय देण्याचे भान गायकाला ठेवावे लागते. आशाताईंनी या प्रतिभावंतांच्या आव्हानांना संधी मानले आणि त्यामुळेच त्या अष्टपैलू गायिका म्हणून प्रसिद्ध झाल्या. संगीत आणि गायकीला जीवन अर्पण केलेली ही गायिका. तिने कधीही कोणत्याही अपमार्गाचा अवलंब करून स्वतःला सिद्ध केले नाही आणि खरोखर काहीतरी नवे सिद्ध करण्याचा प्रसंग आला तेव्हा कोणत्याही आव्हानापासून पळ काढला नाही. त्यामुळेच आशाताईंचा स्वर अनेकदा इतक्या वैविध्याने व्यक्त होतो की, अनेकदा आपल्या कानांवर पडत असलेले 'हे' गाणे नेमके कुणी गायिले, याचा अंदाज येत नाही. आशाताईंच्या स्वरांची ओळख वेगळी आणि त्यांच्या लकबीची नजाकत वेगळी. एरवी साधे बोलत असतानाच आशाताईंचा खरा आवाज कानांवर पडायचा. गाण्यांतून त्यांच्या लकबी आणि ताना ओळखीच्या झाल्या. कोणत्या शब्दावर भर द्यायचा आणि कुठल्या शब्दांना गाण्यात वाहून जाऊ द्यायचे, याचे कौशल्य आशाताईंच्या अनेक गाण्यांतून दिसायचे. आता गीतकाराचे शब्द अजरामर करणारीच नव्हे तर लौकिकार्थाने काव्य किंवा नादमय नसलेल्या गाण्यातही जीव ओतणारी गायिका आपल्यात नाही. 'एक सौ सोलह चांद की रातें, एक तुम्हारे कांधे का तिल, गीली मेंहदी की खुशबू, झुठमूठ के शिकवे कुछझूठमूठ के वादे भी सब याद करा दूँसब भिजवा दो, मेरा वो सामान लौटा दो', हे गाणे गुलजार साहेबांनी लिहिले होते. १९८७ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'इजाजत' या चित्रपटातले हे गीत. या गाण्यासाठी गुलजार यांना सर्वोत्कृष्ट गीतकार आणि आशा भोसले यांना सर्वोत्कृष्ट पार्श्वगायिका पुरस्कार मिळाला होता. पण, मुळात हे गाणेच नव्हते. ते मुक्तंद पद्धतीने लिहिलेले काव्य होते. असे म्हणतात की, गुलजार यांनी हे गाणे आर. डी. बर्मन यांना दाखवले तेव्हा त्यांनी गुलजार साहेबांची गंमत केली होती. आता पेपरातल्या बातमीला संगीत द्यायचे तेवढे राहिले, असे पंचमदा गुलजार यांना म्हणाले होते. कारण या गाण्याचे शब्द गद्यासारखे वाटत होते. त्या गद्याला आशाताईंनी पद्यात उतरवून दाखविले. हजारो गाणी गायिली असली तरी आशाताईंकडे देण्यासारखे खूप काही होते याचा हा पुरावा. आजही ते गाणे कुठे तरी वाजत असते तेव्हा आपसूकच मनात येते की, आशाताई, मेरा कुछ सामान तुम्हारे पास पडा हैं...

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# 'सबसे बडा खिलाडी'

एक काळ होता इस्लामाबादला म्हणजे पाकिस्तानला भारताशी संघर्ष थांबविण्यासाठी वॉशिंग्टनकडे धाव घ्यावी लागत होती. आता काळ बदलला आहे. वॉशिंग्टनला म्हणजे अमेरिकेला स्वतःचे युद्ध थांबविण्यासाठी इस्लामाबादकडे धाव घ्यावी लागली आहे. एका जागतिक महाशक्तीच्या शक्तिवानाचे यापेक्षा अधिक उत्तम उदाहरण कोणते असू शकते?

**मुनीरची मध्यस्थता** : अमेरिका-इस्रायल आणि इराण, लेबनान यांच्यात युद्धविराम घडविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली, ती पाकिस्तानचे फिल्ड मार्शल असीम मुनीर यांनी. एक पाय व्हाईट हाऊसच्या दालनात तर दुसरा पाय इराणच्या लष्करात अशी ख्याती असणाऱ्या मुनीर यांनी हा युद्धविराम घडविला.

भारत-पाकिस्तान यांच्यात वाढलेला संघर्ष- प्रारंभी जसा तात्पुरता थांबविण्यात आला व नंतर तो कायम झाला, तसेच या १५ दिवसांसाठी झालेल्या युद्धविरामचे होणार आहे. एखादी लष्करी कारवाई मोहीम १५ दिवसांसाठी स्थगित झाल्यानंतर, ती पूर्ववत पुन्हा सुरू करणे बरेच अवघड असते. त्यामुळे १५ दिवसांत या युद्धविरामला औपचारिकपणे कायम केले जाईल आणि आखाती देशांमध्ये पुन्हा एकदा 'शांतता' नांदू लागेल.

**दबावतंत्र** : राष्ट्रपती ट्रम्प यांनी इराणला होर्मुझ सामुद्रधुनी खुली करण्यासाठी घालून दिलेली मुदत संपण्यास दोन तास बाकी असताना पाकिस्तानच्या पंतप्रधानांनी या युद्धविरामाची घोषणा केली. एक विचित्र संयोग म्हणजे भारत-पाकिस्तान यांच्यातील युद्धविरामाची घोषणा राष्ट्रपती ट्रम्प यांनी केली होती तर अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्ध थांबविण्याची घोषणा पाकिस्तानने केली.

**फिल्ड मार्शल मुनीर** : पाकिस्तानी फिल्ड मार्शल मुनीर यांचे इराणच्या लष्करात वरिष्ठ अधिकाऱ्यांशी फार घनिष्ठ संबंध आहेत व तेच इराणी लष्कराला युद्धबंदीसाठी राजी करू शकतात असे म्हटले जात होते. फिल्ड मार्शल मुनीर मागील काही दिवसांपासून इराणी लष्करी अधिकाऱ्यांच्या सतत संपर्कात होते. इराणचे नवे सर्वोच्च नेता मोसाबा खामेनी हे जखमी असून ते एका रुग्णालयात उपचार घेत असल्याचे सांगितले जाते. या पृष्ठभूमीवर इराणी लष्करी अधिकारीच याबाबत निर्णायक भूमिका घेणार होते. आणि ही बाब असीम मुनीर यांच्या पथ्यावर पडली.

**व्हाईट हाऊस** : दुसरीकडे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांच्याशीही मुनीर यांची मैत्री झाली आहे. ऑपरेशन सिंदूरनंतर ट्रम्प यांनी मुनीर यांना व्हाईट हाऊसमध्ये दुपारच्या भोजनासाठी निमंत्रित केले होते. असा सन्मान मिळालेले हे पहिले लष्करी अधिकारी असावेत. राष्ट्रपती ट्रम्प यांनी आपल्या भाषणांमध्ये मुनीर यांच्यावर स्तुतिसुमनांचा वर्षाव सुरू केला होता. राष्ट्रपती ट्रम्प यांनाही या युद्धातून सन्मानजनक माघार हवी होती. माघारीचा हा रस्ता मुनीर यांनी खुला करून दिल्यानंतर ट्रम्प यांनी लगेच युद्धबंदीचा प्रस्ताव स्वीकारला. यामागे ट्रम्प यांच्यावर असणारा दुहेरी दबाव हे कारण मुख्य होते.

**दुहेरी दबाव** : अमेरिकेतच त्यांच्याच पक्षाच्या रिपब्लिकन नेत्यांनी ट्रम्प यांच्यावर टीका करणे सुरू केले होते. उपराष्ट्रपती जेडी व्हान्स हे तर तातडीने युद्ध संपविण्याच्या बाजूने होते. अमेरिकेत जनता युद्धाच्या विरोधात जात होती. पेट्रोल-गॅसच्या वाढत्या किमती हे त्याचे कारण होते. अमेरिकेच्या लष्करी सामर्थ्याला हादरे बसणे सुरू झाले होते. अमेरिकेचे डझनाहून अधिक विमाने व हेलिकॉप्टर्स या युद्धात गमावली आहेत. आखाती देशात असणाऱ्या अमेरिकन लष्करी तळांना मोठ्या प्रमाणावर नुकसान सहन करावे लागले आहे. हा सारा दबाव राष्ट्रपती ट्रम्प यांच्यावर होता. दुसरा दबाव होता तो आखाती भागातील मित्र देशांचा. इराणने सौदी अरेबिया, संयुक्त अमिरात, कुवैत, बहरीन, कतार या देशांना 'लक्ष्य' केल्यापासून यांनी अमेरिका-इस्रायलने हे युद्ध लवकर थांबवावे यासाठी अमेरिकेला साकडे घालणे सुरू केले होते. अमेरिकेने खरोखरीच इराणच्या ऊर्जा प्रकल्पांना उद्ध्वस्त करणे सुरू केल्यास इराण आपल्या देशातील ऊर्जा प्रकल्प व पाणी शुद्धीकरण संयंत्रांना लक्ष्य करणे सुरू करील याची भीती या देशांना वाटू लागली होती. आणि प्रत्येक दिवसागणिक ही भीती वाढत होती. इराणी लष्कर ज्या अचूकपणे कतार, कुवैत, बहरीन यांच्या तेल शुद्धीकरण कारखान्यांना लक्ष्य करीत होते त्याची एकप्रकारची धास्ती या देशांनी व अमेरिकेनेही घेतली होती. बहरीन या लहानशा देशात अमेरिकेच्या पाचव्या आरमाराचे मुख्यालय आहे. इराणच्या धसक्यामुळे हे मुख्यालय इतरत्र हलविण्यात आले. इराणी लष्कराला चीनच्या अद्ययावत तंत्रज्ञानाचा पाठिंबा आहे. हे अमेरिकेच्या व या मित्र देशांच्या लक्षात आले होते. त्यांनी अमेरिकेला लवकरात लवकर हे युद्ध संपविण्याचा सल्ला दिला होता. या संघर्षात अमेरिकेच्या या मित्रदेशांचे मोठे आर्थिक नुकसान होत होते. ते होत राहिल्यास आपल्या भवितव्यावर परिणाम होईल, हेही या देशांना समजत होते. या साऱ्याचा परिणाम अमेरिकेवर झाला आणि राष्ट्रपती ट्रम्प यांनी एका रात्रीतून इराणला संपविण्याची घोषणा मागे घेतली आणि एका रात्रीच युद्धविरामची घोषणा करण्यात आली.

**चीन-रशिया** : इराणला या युद्धात चीन व रशिया केवळ पाठिंबाच नाही तर संपूर्ण तांत्रिक व लष्करी सहकार्य देत होते. हे आता निर्विवाद समोर आले आहे. त्यावर शिक्कामोर्तब, संयुक्त राष्ट्रातील घटनाक्रमाने केले. संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेत बहरीनने एक प्रस्ताव आणून होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्याचा प्रस्ताव आणला होता. १५ सदस्य देशांपैकी ११ देशांनी त्यास समर्थन दिले होते. पण, चीन व रशिया यांनी नकाराधिकार वापरून तो हाणून पाडला.

**चीनची भूमिका** : इराणला युद्धासाठी मदत करणारा चीन आणि युद्धबंदीसाठी राजी करणाराही चीन. या दोन्ही भूमिका चीनने पार पाडल्या असे दिसते. एकीकडे अमेरिकेच्या मित्र देशांना म्हणजे सौदी अरेबिया, बहरीन, कुवैत, कतार यांचे नुकसान करण्यासाठी चीनने इराणला मदत केली. मात्र राष्ट्रपती ट्रम्प यांनी इराणला विनाशाचा- विध्वसांचा निर्वाणीचा इशारा दिल्यानंतर- आपल्या मित्राला म्हणजे इराणला त्यापासून वाचविण्यासाठी त्याला युद्धविरामासाठी राजी करण्यातही चीनची निर्णायक भूमिका राहिली. कारण, इराण हा चीनचा सर्वांत मोठा व्यापार भागीदार आहे. इराण उद्ध्वस्त होणे, इराणची अर्थव्यवस्था कोलमडून पडणे चीनला परवडणारे नव्हते. त्याने लगेच इराणला सावध केले व सावरले. इराणने चीनचे न ऐकण्याचा प्रश्नच नव्हता.

**पाकिस्तानची लॉटरी?** : आखाती देशातील हा घटनाक्रम पाकिस्तानसाठी एक प्रकारची लॉटरी ठरला. त्याने यात महत्त्वाची भूमिका बजावित अमेरिका, चीन व मुस्लिम जगत या तीन आघाड्यांवर आपली छाप सोडली. अमेरिकेची अप्रत्यक्ष मदत केल्यामुळे 'अमेरिका मेहेरबान', मुस्लिम जगतातील संघर्ष थांबविण्यामुळे 'अल्ला मेहेरबान' आणि हे सारे फिल्ड मार्श मुनीर यांनी केल्यामुळे 'आर्मी मेहेरबान'! म्हणजे आखाती युद्ध एक प्रकारे पाकिस्तानच्या पथ्यावर पडले. जगाला विनाशापासून आम्ही वाचविले असा प्रचार करण्यास पाकिस्तान मोकळा राहणार आहे. शिवाय इस्लामी देशात पाकिस्तानची प्रतिमा व प्रतिष्ठा उंचावणार ते वेगळेच.

**सबसे बडा खिलाडी** : आखातातील संघर्ष अमेरिका-इस्रायल व इराण-लेबनान- हिजबुल्ला यांच्यात झडला. या साऱ्या संघर्षात 'सबसे बडा खिलाडी' ठरला चीन. त्याने आपल्या अचूक तंत्रज्ञानाची चुणूक अमेरिकेला दाखविली. हेच त्याने भारत-पाकिस्तान संघर्षादरम्यान केले होते. भारतीय वायुदलाच्या हालचालींची 'लाईव्ह माहिती' चीन, पाकिस्तानला पुरवीत होता. अगदी हेच आखाती युद्धात झाले. चीन इराणला अमेरिकन नौदल व वायुदलाची 'लाईव्ह माहिती' पुरवीत होता. त्या आधारे इराणने, यूएसएस अब्राहम लिंकन, जेराल्ड फोर्ड या जगातील दोन बलाढ्य विमानवाहू जहाजांना लक्ष्य केले होते. त्याचाच फटका अब्राहम लिंकन या जहाजाला बसला व अमेरिकेला ते इराणच्या टप्प्यापासून दूर हलवावे लागले. आजवर जगातील अन्य देशांना युद्ध थांबविण्यासाठी वॉशिंग्टनचा दरवाजा ठोठवावा लागत होता. आणि आता वॉशिंग्टनला युद्ध संपविण्यासाठी इस्लामाबादचा दरवाजा ठोठवावा लागला ही सारी 'करामात' चीनची! आखाती संघर्षात सबसे बडा खिलाडी ठरला-चीन!

## वेध

पुंडलिक आंबटकर

# पोशिंद्याचे उत्पन्न कसे वाढणार?

सरकारने राज्याच्या प्रगतीसाठी ठोस कृती आराखडा आखला असून त्या दिशेने काम सुरू आहे. शेतकऱ्यांचे उत्पादन आणि उत्पन्न वाढविण्यासाठी अनेक योजना अंमलात आणल्या जात आहेत. सध्या महाराष्ट्राच्या बहुतांश भागात खरीप हंगामाचे नियोजन सुरू झाले आहे. केंद्र सरकारने रासायनिक खतांसाठी ४१,५३३.८१ कोटी रुपयांचे अनुदान जाहीर केले आहे. यंदा विदर्भात काही शेतकऱ्यांना विक्रमी चणा उत्पादन झाले तर काहींना रोगांच्या प्रादुर्भावामुळे मोठे नुकसान सहन करावे लागले. काही शेतकऱ्यांनी कापसाची फरदळ घेतल्याने आगामी हंगामातही बोंडअळीचा धोका आहे.

तेलबियांच्या लागवडीमुळे शेतीची सुपिकता कमालीची घटल्याने आता पूर्वीप्रमाणे कापूस व सोयाबीन उत्पादन होत नाही. शिवाय पावसाच्या अनियमितपणाचा महाराष्ट्रातील शेतीला सातत्याने फटका बसला आहे. गतवर्षी पश्चिम विदर्भातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात उन्हाळी तिळाची लागवड केली होती. हे एक नगदी पीक आहे. परंतु, गत हंगामात अवकाळी पावसाने सातत्याने मारा केल्याने प्रचंड नुकसान झाले. परिणामी यंदा तिळ लागवड आपोआपच कमी झाली.

सरकारने शेतकऱ्यांना विपन्नावस्थेतून बाहेर काढण्यासाठी अनेक योजना लागू केल्या असल्या तरी आजही बहुतांश अल्पभूधारकांना दारिद्र्यरेषेखालीच जगावे लागत असल्याने सरकारकडून कृषिपूरक व्यवसायांना प्रोत्साहन दिले जात आहे. गरिबांची आर्थिक स्थिती सावरण्यासाठी सरकारकडून अनेक कृषिपूरक योजना अनुदानावर राबविल्या जातात. परंतु, योग्य मार्गदर्शन आणि जनजागृतीअभावी उद्दिष्ट साध्य होत नाही, हे तेवढेच सत्य आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना अल्पभूधारकांना मोठ्या प्रमाणात दिलासा देणारी ठरत आहे. सरकारने अल्पभूधारकांसाठी सौरकृषिपंप योजना आणली. परंतु, काही लोकांनी वारंवार या योजनेबाबत अपप्रचार केला. स्थानिक समस्या असू शकतात. परंतु, ही योजना सरकारने भविष्यातील समस्या गृहीत धरूनच आखल्याची पावती देण्याची गरज नाही. महाराष्ट्र राज्य खरीप हंगाम २०२६ साठी कृषी विभागाने खतांचे नियोजन आणि संरक्षित साठ्यावर भर दिला आहे. खरीप हंगामाचा कालावधी १ एप्रिल ते ३० सप्टेंबर २०२६ याप्रमाणे निर्धारित करण्यात आला आहे. केंद्र सरकारने ४१,५३३.८१ कोटी रुपयांचे खत अनुदान मंजूर केले आहे. मागील वर्षाच्या तुलनेत खतसाठा ३.९९ लाख टन इतका वाढल्याने यंदा शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. गरजेनुसार रासायनिक खतांचा साठा उपलब्ध केला जात असला तरी सरकारकडून नैसर्गिक शेतीलाही प्रोत्साहन दिले जात आहे. शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीच्या माध्यमातून कर्जाच्या खाईतून बाहेर काढणे शक्य होऊ शकते.

शेतीचा खर्च कमी करून शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याचा प्रयत्न सरकारकडून होत असला तरी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील मालाच्या दरातील चढउताराचा परिणाम भारतीय शेतीवरही होतो. भारताने तांदूळ निर्यातीत चीनला मागे टाकून आघाडी घेतली आहे. परंतु, सध्या अमेरिका आणि इराणमध्ये युद्ध सुरू असल्याने आयात-निर्यात क्षेत्राचा खर्च वाढला आहे. हे युद्ध दीर्घकाळ चालले तर त्याचा परिणामी भारतीय अर्थव्यवस्थेवर होऊन आर्थिक दरवाढीचा वेग मंदावू शकतो. असे झाले तर त्याचे दुष्परिणाम भारतीय शेतीवरही दिसतील.

राज्य सरकारने 'पुण्यश्लोक अहल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना' आणल्याने शेतकऱ्यांना बऱ्यापैकी दिलासा मिळत आहे. शेततळे बांधण्यासाठी शासनाकडून शेतकऱ्यांना दीर्घकाळापासून अनुदान दिले जाते. परंतु, या योजनेचा उद्देश कितपत पूर्ण झाला, हा अभ्यासाचा विषय आहे. महाराष्ट्रात नदीजोड प्रकल्प शेतीला नवी उभारी देणारा ठरू शकतो. महाराष्ट्राला ५ ट्रिलियन डॉलर्सपर्यंत पोहोचविण्यात अशा योजना खूपच प्रभावी ठरू शकतात. सरकारी योजनांचा योग्य वापर आणि पारदर्शक प्रशासकीय व्यवस्था शेतकऱ्यांच्या जीवनाला कलाटणी देऊ शकतात. परंतु, अजूनही भ्रष्टाचार आणि लाचखोरीची प्रकरणे वारंवार उघडकीस येतात. सरकारला या समस्येवर मात करावीच लागेल. शंभर टक्के भ्रष्टाचार नष्ट होऊ शकणार नाही. परंतु, भ्रष्टाचार कमी करणे नक्कीच शासन-प्रशासनाच्या हाती आहे. पूर्वीच्या तुलनेत आता भ्रष्टाचार शिथिल झाल्याने शेतकऱ्यांची फसवणूकही कमी झाली आहे. पूर्वी साध्या एका कागदपत्रासाठीही वेठीस धरले जायचे. आता डिजिटलायझेशनमुळे बहुतांश क्षेत्रातील दलालांची साखळी खंडित होऊन वेळ आणि पैशांची बचत होऊ लागली आहे. मात्र, आजही कृषी क्षेत्राला ठोस सुधारणांची गरज आहे.

९८८१७१६०२७

## कानोसा

अमोल पुसदकर

# डॉ. आंबेडकरांची संवेदनशीलता

महापुरुष हे त्यांच्या कार्यामुळे महानतेला पोहोचलेले असतात. त्यांचे कार्य बघितले की सर्वसामान्य माणसाला असे वाटते की, हा आपल्या सारखाच दिसणारा हाडामासाचा माणूस इतके मोठे कार्य कसे काय करू शकला? परंतु ज्या लाखो अनुयायांनी त्यांचा मार्ग स्वीकारलेला असतो, इतक्या लोकांना आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी त्यांच्याकडे अत्यंत संवेदनशील असे मन सुद्धा असते. पूजनीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय इतिहासातील एक महत्त्वाचे नाव आहे. संविधानाची निर्मिती, हिंदू कोड बिलाची मांडणी, समाजातील उपेक्षित वर्गाला न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी केलेला संघर्ष हा सर्वांना सुपरिचित आहे; परंतु त्यांच्या स्वभावाचे अनेक पैलू, त्यांच्या जीवनातील अनेक खाजगी गोष्टी, सर्वसामान्य जनतेला फारशा माहीत नसतात.

बाबासाहेब लहान असताना त्यांना सुद्धा मुलांसोबत खेळणे, भांडणे, झाडावर चढणे, नदीमध्ये जाऊन मासळ्या पकडणे इत्यादी गोष्टी फारच आवडायच्या. खेळामध्ये क्रिकेट, टेनिस हे त्यांचे आवडते खेळ होते. इतरांसोबत पत्ते खेळणे सुद्धा त्यांना खूप आवडायचे. समुद्रामध्ये तासन्तास डुंबत राहणे हे पण त्यांना आवडायचे. ते एक चांगले चित्रकार सुद्धा होते. त्यांना तबला सुद्धा वाजवता येत होता. एवढेच काय, पण भारताच्या या कायदा मंत्र्यांना स्वयंपाक सुद्धा उत्तम करता येत होता. जरी त्यांनी आयुष्यभर संघर्षाचा बिगुल वाजवलेला असला, तरी सुद्धा मित्र आणि कार्यकर्त्यांसोबत असताना हास्यविनोद करणे हे सुद्धा त्यांना आवडायचे. विदर्भातील ग्रामीण भाषा, बोलीभाषेतील म्हणी या सुद्धा त्यांना तोंडपाठ असायच्या.

जीवनाचा बराचसा कालखंड त्यांचा गरिबीमध्ये गेला होता. तरीसुद्धा विदेशात राहत असताना तेथील लोकांचे नीटनेटके राहणे, उत्तम पोशाख हे सुद्धा त्यांना खूपच आवडू लागले होते. ते नेहमी म्हणायचे की, टाय लावणे अनेकांना जमत नाही, परंतु मी उत्तम प्रकारे तो लावू शकतो. विद्यार्थी म्हणून तर ते फारच हुशार होते; परंतु त्यांचे हस्ताक्षर सुद्धा खूप सुंदर होते. विदेशात राहून तिथल्या लोकांसोबत मिळून मिसळून सुद्धा त्यांनी धूम्रपान किंवा मद्यपानाला स्पर्श केलेला नव्हता.



प्राण्यांबद्दल सुद्धा त्यांना विशेष प्रेम होते. श्वान हा त्यांचा आवडता प्राणी होता. चांगल्या प्रजातीचे श्वान त्यांना आवडायचे. एकदा त्यांनी पाळलेला श्वान आजारी झाला, त्यावेळेस बाबासाहेबांनी त्याची पूर्ण सेवा केली. त्याला दवाखान्यात घेऊन गेले; परंतु शेवटी तो मरण पावला. आपल्या पाळीव श्वानाचा मृत्यू त्यांना हलवून गेला. एखाद्या लहान मुलगा जसा रडावा, त्याप्रमाणे त्यांनी त्याच्या मृत्यूचा शोक केला. एकदा एका गावी गेले असता, त्यांना त्यांच्या एका मित्राने हरणाचे पिल्लू भेट म्हणून दिले होते. बाबासाहेब त्याला आपल्या घरी घेऊन आले. त्याची सर्व प्रकारची व्यवस्था केली. ते हरिण काही दिवस राहिले व नंतर मरण पावले. त्यावेळेस सुद्धा बाबासाहेब खूप दुःखी झाले होते.

त्यांच्या आई-वडिलांबद्दल सुद्धा त्यांच्या भावना फार हळव्या होत्या. आपल्या बालपणीच्या स्वभावामुळे आपण आपल्या वडिलांचे प्रेम ओळखू शकलो नाही, असे त्यांना नेहमी वाटायचे. त्यांची आठवण आल्यावर बरेचदा ते शोकमग्न व्हायचे. कधीकधी स्मशानामध्ये, ज्या ठिकाणी त्यांच्या वडिलांचा अग्निसंस्कार झाला होता, त्या ठिकाणी जाऊन ते आपला काही वेळ घालवायचे. एकदा त्यांच्या मित्रासोबत ते सातारा रोड स्टेशनवर गेले होते. तिथे जवळच असलेल्या एका ठिकाणी ते थांबले व एका मैदानात जाऊन उभे राहिले. त्यावेळेस ते बरेच भावविव्हळ झाले होते. त्यांच्या डोळ्यांतून अश्रू वाहत होते. त्याबद्दल मित्राने विचारल्यावर ते म्हणाले की, इथेच माझ्या आईचा अंतिम संस्कार झाला होता. इथे जवळच आम्ही एका पडक्या घरात राहत होतो. माझी आई, भाऊ व बहीण गिट्टी फोडण्याचे काम करीत होते. इथल्या जंगलामध्ये मी खूप खेळलो आहे; परंतु अतिशय दुःखाची गोष्ट आहे, की माझी आई आणि वडील दोघेही मी शिकून किती मोठा झालेलो आहे हे बघण्याकरिता जिवंत नाहीत.

त्यांची पत्नी रमाबाई यांच्याबद्दल सुद्धा त्यांच्या मनात अत्यंत प्रेम होते. बाबासाहेब जेव्हा विदेशामध्ये शिकत होते, त्यावेळेला रमाबाई मोलमजुरी करून पैसे साठवीत होत्या व आवश्यक तेव्हा त्यांना पाठवीत सुद्धा होत्या. बाबासाहेब म्हणायचे की, तिने माझ्यासाठी डोक्यावर शेण वाहण्याचे कार्य सुद्धा केलेले आहे. रमाबाईंचे निधन झाले, त्या वेळेला त्यांच्या डोक्याशी बसून त्यांनी खूप शोक केला होता. पत्नीच्या मृत्यूनंतर अनेक दिवस ते शोकमग्न होते. त्यांनी स्वतःला घरामध्ये बंद करून घेतलेले होते. रमाबाईंचे स्वास्थ्य चांगले राहावे, यासाठी त्यांनी आपल्या इच्छांना सुद्धा मर्यादित केलेले होते. 'थॉट्स ऑन पाकिस्तान' या आपल्या पुस्तकांमध्ये त्यांनी जी अर्पण पत्रिका दिलेली आहे, त्यामध्ये त्यांनी आपल्या पत्नीचा 'रामू'असा उल्लेख करून तिला ते पुस्तक समर्पित केले आहे.

बाबासाहेब जेव्हा कायदा मंत्री होते, त्यावेळेस त्यांचे सुपुत्र भय्यासाहेब यांना दोन व्यापाऱ्यांनी संपर्क केला व त्यांचे काही काम करण्यासाठी ते त्यांना विमानाने दिल्लीला घेऊन आले. दिल्लीला पोहोचल्यावर भय्यासाहेबांनी बाबासाहेबांना, या लोकांना तुमची सही आणि शिफारसपत्र पाहिजे, असे सांगितले. त्यासाठी मी यांना तुमच्याकडे घेऊन आलो आहे, असे भय्यासाहेब म्हणाले. त्यावर बाबासाहेब त्यांना म्हणाले की, ''इथे मी देशाचा कायदा मंत्री आहे, तुझा बाप नाही. तुझा बाप मुंबई दादरमधील राजगृहामध्ये असतो. घरी मी तुझा वडील आहे; इथे जर तू माझ्याकडे आला तर मी देशाचा कायदा मंत्री आहे हे लक्षात ठेव.'' त्यामुळे बाबासाहेबांनी त्यांना त्यांचे काम न करता परत पाठवून दिले. कर्तव्यकठोर, परंतु संवेदनशील मन असलेल्या महामानवाला शत शत प्रणाम.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

### वानखेडे स्टेडियमचे महत्त्व

कितीही नवी स्टेडियम्स उभी राहिली तरी वानखेडे ते वानखेडेच राहणार असा महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी वानखेडे स्टेडियमचा केलेला गौरव योग्यच आहे. वानखेडेचे स्थानच अद्वितीय आहे. क्रिकेट इतिहास याच्याशिवाय अपूर्ण आहे असं म्हटल्यास वावगे होणार नाही. या मैदानावर जगभरातील अनेक दिग्गज खेळाडूंनी अविस्मरणीय तुफानी सामने आणि विक्रम घडवून तत्कालीन क्रिकेटप्रेमींना त्या क्षणांचा दिलेला आनंद शब्दांत मावणारा नाही. जुन्या पिढीच्या मनात त्या आठवणी आजही ताज्या आहेत, राहणार आहेत. मात्र, एक खंत राहते ती त्याकाळी या स्टेडियमवर प्रत्येक कसोटी सामन्यातून पाच पाच सहा सहा मुंबईचे कसोटीवीर पाहावयास मिळत असत. आज मात्र प्रथम श्रेणी सामन्यातूनही शोधावे लागतात.



**विश्वनाथ पंडित**

### शेतजमिनी अनियंत्रितपणे अकृषक रूपांतरणाचे दुष्परिणाम

दि. ३० मार्च रोजी राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी यांनी संसदेत कृषीसाठी उपयोगी जमिनीचे अनियंत्रितपणे अकृषीकरण होत असल्यामुळे होणाऱ्या दुष्परिणामांचे विश्लेषण त्यांच्या भाषणात केले. मोठ्या प्रमाणावर शेतजमिनी निवासी आणि औद्योगिक वापरासाठी वळवल्या जात आहेत त्यामुळे शेती क्षेत्र कमी होऊन अन्न सुरक्षेवर वाईट परिणाम होत आहे. अन्नधान्य निर्यातीवर विपरीत परिणाम व अन्नधान्य दुर्मिळतेमुळे महागाईत अतोनात वाढ होत आहे. शेतकऱ्यांची जमीन विक्री व अकृषक रूपांतर करताना शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळायला हवा. जमीन गमावल्यामुळे शेतकऱ्याचे पुनर्वसन व रोजगार यांची योग्यप्रकारे पूर्तता झाली पाहिजे. शहराचा विकास आवश्यक असला तरी; अनियंत्रित शहरीकरणामुळे सुपीक जमीन नष्ट होण्याचे प्रमाण सतत वाढत आहे.

राज्य सरकारने याबाबतीत कायदे आणि नियंत्रणाचे स्पष्ट धोरण ठेवणे आवश्यक आहे. कोणती जमीन अकृषक करायची याबाबत कडक निकष असणे आवश्यक आहे. गुंतवणूकदार शेतजमीन स्वस्तात विकत घेऊन अकृषक रूपांतरित करून महाग भावात विकून नफाखोरी करतात. यावर कायद्याचे नियंत्रण ठेवावे तसेच नियोजनाशिवाय अकृषीकरणामुळे रस्ते, पाणी, वीज यासारख्या सुविधांची पूर्तता करण्यात समस्या निर्माण होतात. बिल्डर, व्यावसायिकांनी या सर्व विपरीत परिणामांचा विचार न करता अनियंत्रितपणे शेतजमीन अकृषक रूपांतरित करण्याने शहरांचे अमर्याद विस्तारीकरण होत आहे आणि खेड्यातील बेरोजगारीमुळे तेथील लोक रोजगारासाठी शहराकडे धाव घेत आहेत. वाढत्या लोकसंख्येमुळे शहरातील पायाभूत सुविधांची पूर्तता होऊ शकत नाही. शासनाद्वारे याबाबतीत असणारे शिथिल कायदे कडक करून त्यांची शिक्षेच्या तजविजीसह अंमलबजावणी अत्यावश्यक आहे.

**ॲड. प्रकाश देशपांडे**

## वाचक पत्रे

### क्रांतीची ठिणगी पेटवणारे थोर क्रांतिकारक दामोदर चापेकर



भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील थोर क्रांतिकारकांपैकी एक म्हणजे दामोदर चापेकर! त्यांचा बलिदान दिवस १८ एप्रिल रोजी साजरा केला जातो. इंग्रजांच्या अन्यायाविरुद्ध निर्भीडपणे आवाज उठवून त्यांनी क्रांतीची पहिली ठिणगी पेटवली. दामोदर चापेकर आणि त्यांच्या भावांनी देशासाठी आपले प्राण अर्पण केले.

१८९७ साली पुणे येथे प्लेगची भीषण साथ पसरली होती. त्या काळात इंग्रज अधिकारी वॉल्टर चार्ल्स रँड याने लोकांवर अमानुष अत्याचार सुरू केले होते. या अन्यायाविरुद्ध दामोदर चापेकर यांनी आवाज उठवला. त्यांनी आपल्या भावांसह रँडचा वध करण्याचा निर्णय घेतला. २२ जून १८९७ रोजी रँडवर गोळीबार करून त्यांनी इंग्रज सत्तेला जबर धक्का दिला. या घटनेमुळे भारतीय स्वातंत्र्यलढ्याला नवे वळण मिळाले आणि क्रांतीची ज्वाला अधिक प्रखर झाली. या घटनेनंतर इंग्रजांनी चापेकर बंधूंना अटक केली. न्यायालयातही त्यांनी निर्भीडपणे आपल्या कृत्याची कबुली दिली. १८ एप्रिल १८९८ रोजी दामोदर चापेकर यांना फाशी देण्यात आली.

त्यांच्या बलिदानाने असंख्य भारतीयांच्या मनात स्वातंत्र्याची जाज्वल्य भावना निर्माण झाली. देशभक्ती, धैर्य आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा त्यांनी दिली. त्या त्यागाची जाणीव ठेवून आजच्या पिढीने प्रामाणिकपणे देशसेवा करणे आणि राष्ट्रहिताला प्राधान्य देणे हीच त्यांना दिलेली खरी श्रद्धांजली ठरेल.

**प्रिया बागडदेव**




## महत्त्वाचे

### चार फलंदाज बाद होण्याने सामन्याला वळण



**चेन्नई :** येथे चेन्नई सुपर किंग्सविरुद्ध इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) सामन्यात सलग चार षटकांत चार गडी गमावणे हा सामन्याचा टर्निंग पॉईंट ठरला. त्यामुळे आमच्या संघाला २३ धावांनी पराभव पत्करावा लागला, असे मत दिल्ली कॅपिटल्सचे क्रिकेट संचालक वेणुगोपाल राव यांनी व्यक्त केले. २१३ धावांचे लक्ष्य गाठताना, दिल्ली कॅपिटल्सने ४.५ षटकांत बिनबाद ६१ धावा केल्या होत्या, परंतु केएल राहुल (१८), पथुम निस्संका (४१), अक्षर पटेल (०१) आणि समीर रिझवी (०६) बाद झाल्यामुळे धावसंख्या ७६ धावांवर चार गडी बाद अशी झाली. सामन्यानंतर वेणुगोपाल यांनी पत्रकारांशी संवाद साधला ते म्हणाल की, मला वाटते आमच्या फलंदाजीत काहीतरी उणीव होती. चार षटकांत चार गडी गमावणे हा सामन्याचा टर्निंग पॉईंट होता. या फॉरमॅटमध्ये सातत्याने गडी बाद झाल्याने आमच्या संघाचे नुकसान झाले. दिल्ली कॅपिटल्सचे क्षेत्ररक्षणही खराब होते. त्यांनी आयुष म्हात्रेला धावबाद करण्याची संधी गमावली आणि संजू सॅमसनचा झेल सोडला, ज्याचा फायदा घेत सॅमसनने ५६ चेंडूंमध्ये नाबाद ११५ धावा केल्या.

### पंचांशी वाद घातल्याबद्दल नितीश राणाला दंड

**चेन्नई :** चेन्नई सुपर किंग्स विरुद्धच्या इंडियन प्रीमियर लीग सामन्यादरम्यान चौथ्या पंचांशी वाद घातल्याबद्दल दिल्ली कॅपिटल्सचा फलंदाज नितीश राणाला त्याच्या सामना शुल्काच्या २५ टक्के दंड ठोठावण्यात आला आहे. ही घटना १९ व्या षटकात घडली, जेव्हा पंचांनी ट्रिस्टन स्टब्सची ओले ग्लोव्हज बदलण्याची विनंती नाकारली. यामुळे राणा आणि पंच यांच्यात जोरदार शाब्दिक चकमक उडाली. दमट हवामानामुळे जास्त घाम येत असल्याने स्टब्सने ग्लोव्हज बदलण्याची विनंती केली होती.राणा बाद झाल्यानंतरही चौथ्या पंचांशी वाद घालत होता, ज्यासाठी त्याला एक डिमेरिट पॉईंटही देण्यात आला. आयपीएलने एका निवेदनात म्हटले आहे की, दिल्ली कॅपिटल्सचा फलंदाज नितीश राणाला आयपीएल खेळाडूंच्या आचारसंहितेच्या श्रेणी १ चे उल्लंघन केल्याबद्दल त्याच्या सामना शुल्काच्या २५ टक्के दंड आणि एक डिमेरिट पॉईंट देण्यात आला आहे.राणा आयपीएल आचारसंहितेच्या कलम २.३ चे उल्लंघन केल्याबद्दल दोषी आढळला, जे सामन्यादरम्यान अश्लील भाषेचा वापर करण्याशी संबंधित आहे, असे निवेदनात म्हटले आहे. राणाने आपला गुन्हा कबूल केला आणि सामनाधिकाऱ्याने दिलेली शिक्षा स्वीकारली. दरम्यान, चेन्नई सुपर किंग्सचा कर्णधार ऋतुराज गायकवाडला सामन्यात संथ गतीने षटके टाकल्याबद्दल १२ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला.

# देशी गिल, विदेशी बटलर तळपले

### गुजरातचा जायन्टस्‌चा लखनौवर सोप्पा विजय



◆ **लखनौ, १२ एप्रिल**

ताज्या दमाची फौज असलेल्या गुजरातच्या संघाने सहजसोपा विजय साकारताना लखनौ संघाला सात गडी राखून पाणी पाजले. कर्णधार शुभमन गिल आणि जॉश बटलर यांनी शानदार फलंदाजी करीत अर्धशतके झळकावली. अवघ्या २८ धावा देत ४ गडी बाद करणारा प्रसिद्ध कृष्णा सामनावीर ठरला.

विजयासाठी आवश्यक असलेल्या १६४ धावांचा पाठलाग करताना सलामीवीर साई सुदर्शन आणि गिल यांनी सावध सुरूवात केली. साई सुदर्शन सहाव्या षटकात १५ धावा काढून बाद झाला. त्यानंतर गिल-बटलर जोडी मैदानावर जमली. या दोघांनी घाई न करता फलंदाजी करीत संघाची धावसंख्या सव्वासेच्या पलीकडे नेली. गिल ५६ तर बटलर ६० धावा काढून बाद झाले. तंबूत परतण्यापूर्वी या जोडीने संघाचा आणखी एक विजय निश्चित केला. वाशिंग्टन सुंदरने नाबाद २१ तर राहुल तेवतीयाने नाबाद १० धावा काढत गुजरातला आठ चेंडू व सात गडी राखून विजय मिळवून दिला. लखनौकडून मोहम्मद शमी, प्रिन्स यादव आणि दिग्वेस राठी यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.

तत्पूर्वी, एडम मार्करम, मिशेल मार्श, निकोलस पुरण आणि वृषभ पंत सारखे आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू असलेल्या लखनौ जायंटस्‌ संघाची कामगिरी गुजरात संघासमोर ढेपाळली. २० षटकांत लखनौचा संघ १६४ धावाच काढू शकला.

मार्करम आणि मार्श यांनी डावाची सुरूवात केली. सलामी जोडीकडून मोठ्या धावसंख्येची अपेक्षा होती. मात्र, मार्श संघाच्या १४ धावा असताना प्रसिद्ध कृष्णाच्या गोलंदाजीवर वॉशिंग्टन सुंदरकडे झेल देऊन बाद झाला. माशनि कशाबशा ११ धावा काढल्या. यानंतर कर्णधार वृषभ पंत मैदानात उतरला. गुजरातच्या सर्वच गोलंदाजांनी अचूक मारा केल्याने धावा काढताना नाकीनाऊ आले. यातच पंत मोहम्मद सिराजच्या गोलंदाजीवर तेवतीयाकडे झेल देऊन तंबूत परतला. त्याने ११ चेंडूत दोन चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने १८ धावा काढल्या. दोन बाद ४५ अशा स्थितीतून लखनौला मोठ्या भागीदारीची गरज असताना अनुभवी मार्करमला प्रसिद्ध कृष्णाने ३० धावांवर बाद केले. संघाच्या ६९ धावांवर मार्करम तर ७४ धावांवर आयुष बडोनीही बाद झाल्याने लखनौचा संघ अडचणीत आला. आता सर्व भिस्त निकोलस पुरण ,अब्दुल समद आणि मुकूल चौधरीवर होत्या. प्रसिद्धने आज फारच तिखट आणि अचूक मारा केला. बडोणीला अवघ्या ९ धावांवर बाद केल्यानंतर त्याने धोकादायक पुरणाही तंबूची वाट दाखविली. पुरण चांगलाच अडखळत होता. २१ चेंडू खेळूनही त्याला १९ धावाच काढता आल्या. त्यामध्ये दोन षटकारांचा समावेश आहे. मोक्याच्या वेळी फलंदाज तंबूत परत जात असल्याने संघ १५० धावाही ओलांडतो की नाही, अशी परिस्थिती असल्याने समद आणि मुकूल चौधरी यांना संयमी फलंदाजी करावी लागली. दोघेही प्रत्येकी १८ धावा काढून बाद झाले. तळाचे फलंदाज जॉर्ज लिंडे याने १६ तर मोहम्मद शमीने पाच चेंडूंमध्ये एक षटकार आणि एक चौकार हाणत १२ धावा काढल्याने लखनोने १६४ ही समाधानकारक धावसंख्या गाठली.

### कृष्णाचे चार बळी



गुजरातच्या कगिसो रबाडा वगळता सर्वच गोलंदाजांनी अचूक गोलंदाजी केली. प्रसिद्ध कृष्णाने तर कमालच केली. त्याने चार षटकांमध्ये अवघ्या २८ धावा देत चार गडी बाद केले. मोहम्मद सिराज आणि रबाडाने प्रत्येकी एक तर अशोक शर्मानि दोन गडी बाद केले. सिराजने चार षटकांमध्ये केवळ १९ धावा दिल्या. राशीद खानला गडी बाद करता आला नसला तरी त्याने चार षटकांत फक्त २५ धावा दिल्या. विशेष म्हणजे गुजरातच्या गोलंदाजांनी वाईडच्या रुपात फक्त दोन अतिरिक्त धावा दिल्या. कुणाही नोबॉल टाकला नाही.

# राजस्थान करणार का ‘सनरायझर्स’चा ‘सनसेट?’

### आज क्रिकेटप्रेमींना मेजवानी

◆ **हैदराबाद, १२ एप्रिल**

सध्या फॉममध्ये असलेला राजस्थान रॉयल्स संघ सोमवारी येथे इंडियन प्रीमियर लीगमध्ये सनरायझर्स हैदराबादविरुद्ध खेळताना अव्वल स्थानावरील आपली पकड अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न करेल.

या हंगामात रॉयल्सने जवळपास प्रत्येक विभागात वर्चस्व गाजवले आहे. चार सामन्यांतील चार विजय त्यांचे वर्चस्व दर्शवतात. संघात एक धोकादायक आघाडीची फळी आणि अत्यंत संतुलित गोलंदाजी आक्रमण आहे.

संघाच्या यशामागे यशस्वी जयस्वाल आणि युवा वैभव सूर्यवंशी या स्फोटक सलामीच्या जोडीचा हात आहे, ज्यांनी पॉवरप्लेमध्ये सातत्याने प्रतिस्पर्धी संघाच्या गोलंदाजींना फोडून काढले आहे. जयस्वाल आणि सूर्यवंशी यांच्या स्फोटक फलंदाजीने त्यांना चालू हंगामातील सर्वात धोकादायक जोड्यांपैकी एक बनवले आहे. ध्रुव जुरेलने तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करून संघाला स्थैर्य दिले आहे आणि संघाची लय कायम राखली आहे.



इशान किशन



रियान पराग

कर्णधार रियान परागच्या नेतृत्वाखालील मधल्या फळीची आतापर्यंत फारशी परीक्षा झालेली नाही. मात्र, मधल्या फळीतील फलंदाजांना आतापर्यंत मिळालेल्या मर्यादित संधींचा पुरेपूर फायदा घेता आलेला नाही आणि संघाच्या दमदार कामगिरीतील ही कदाचित एकमेव चिंतेची बाब आहे.

या हंगामात रॉयल्सच्या गोलंदाजीत लक्षणीय सुधारणा दिसून आली आहे. गेल्या हंगामात गोलंदाजीतील अपयशामुळे नवव्या स्थानावर राहिल्यानंतर, त्यांनी अधिक शिस्तबद्ध आणि धोकादायक गोलंदाजी आक्रमण म्हणून पुनरागमन केले आहे.

याउलट, सनरायझर्स हैदराबादची कामगिरी अस्थिर राहिली आहे. संघ सातत्यपूर्ण कामगिरी करण्यात अपयशी ठरला आहे. चारपैकी तीन सामने गमावल्यानंतर हा माजी विजेता संघ सहाव्या स्थानावर आहे. संघ आपल्या जुन्या रणनीतीवर ठाम आहे. जलद सुरुवातीसाठी ते ट्रॅव्हिस हेड आणि अभिषेक शर्मा या स्फोटक जोडीवर अवलंबून आहेत, परंतु या दोघांनाही सातत्यपूर्ण कामगिरी करता आलेली नाही.

कार्यवाहक कर्णधार इशान किशनसुद्धा त्याच्या सुरुवातीच्या खेळीनंतर फॉर्ममध्ये नाही. धावा करण्याची जबाबदारी प्रामुख्याने हेनरिक क्लासेनने उचलली आहे, ज्याने चार डावांमध्ये १८४ धावा केल्या आहेत आणि काही प्रसंगी सनरायझर्सला सामन्यात परत आणण्यात यश मिळवले आहे.

मात्र, गोलंदाजी हा संघाचा कमकुवत दुवा राहिला आहे आणि नियमित कर्णधार पॅट कमिन्सच्या अनुपस्थितीमुळे संघाच्या समस्या अधिकच वाढल्या आहेत.

### आजचा सामना

**सनरायझर्स हैदराबाद विरुद्ध राजस्थान रॉयल्स**

**स्थळ :** राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियम, हैदराबाद

**वेळ :** सायंकाळी ७.३० वाजतापासून

**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर



बंगळुरू येथे झालेल्या भारतातील सर्वांत मोठ्या ‘फिटनेस रेस’मध्ये सहभागी झालेल्या बॅडमिंटनपटू पी.व्ही. सिंधू आणि क्रिकेट खेळाडू हरमनप्रीत कौर

# तीन पराभवांनी खेळाडू थकले होते

### चेन्नईचे गोलंदाजी प्रशिक्षक सिमन्स यांची कबुली

◆ **चेन्नई, १२ एप्रिल**

सलग तीन पराभवांमुळे संघाच्या मनोधैर्यावर परिणाम झाला नाही, परंतु खेळाडू पराभवाने थकून गेले होते, अशी कबुली चेन्नई सुपर किंग्सचे गोलंदाजी प्रशिक्षक एरिक सिमन्स यांनी दिली.

पाच वेळच्या विजेत्या सीएसकेने दिल्ली कॅपिटल्सला २३ धावांनी पराभूत करून आपल्या पराभवाची मालिका खंडित केली आणि चालू हंगामात आपले खाते उघडले. सामन्यानंतर सिमन्स म्हणाले, आमचे खेळाडू हा सामना जिंकण्यासाठी खूप आतुर होते. मला वाटते की सलग तीन सामने गमावल्यानंतर आम्ही पराभवाने थकून गेलो होतो.

आज ड्रेसिंग रूममधील वातावरण खूप छान होते, पण ते कधीही वाईट नव्हते. मला वाटते की लोकांनी आरसीबी विरुद्धचा सामना पाहिला आणि विचार केला, अरे, आपण खूप मागे आहोत, पण आम्हाला कधीही तसे वाटले नाही.

सिमन्स म्हणाले, या स्पर्धेत लय मिळवणे आणि सकारात्मक राहणे खूप महत्त्वाचे आहे. या विजयानंतर संघातील वातावरण सकारात्मक आहे. पण त्याआधीही, सराव सत्रांदरम्यान खेळाडूंचा दृष्टिकोन चांगला होता.

मागील सामन्यांमध्ये आत्मविश्वासाची कमतरता होती का, असे विचारले असता, सिमन्स म्हणाले, नाही, मला तसे वाटत नाही. मला म्हणायचे आहे की आत्मविश्वासाची कमतरता होती. पण क्षेत्ररक्षण अनेकदा संघाचा मूड ठरवते आणि जेव्हा सरफराजने हवेत झेल घेतला, तेव्हा संघाचे मनोधैर्य वाढले. या छोट्या गोष्टी खूप महत्त्वाच्या असतात.

संजू सॅमसनने ५६ चेंडूंमध्ये ११५ धावा केल्या, तर आयुष म्हात्रेनेही ५९ धावांची वादळी खेळी केली, ज्यामुळे सीएसकेने २ गडी गमावून २१२ धावा केल्या. जेमी ओव्हरटनच्या १८ धावांत चार बळींमुळे सीएसकेने दिल्ली कॅपिटल्सला १८९ धावांवर बाद केले.

सॅमसनचे कौतुक करताना सिमन्स म्हणाला, मला अनेक वर्षे एमएस धोनीसोबत काम करण्याची संधी मिळाली आहे. मी भेटलेल्या सर्वात शांत क्रिकेटपटूंपैकी तो एक आहे. संजू सॅमसन त्याच्यासारखाच आहे. तो खेळाकडे त्याच पद्धतीने पाहतो. मी त्याला कधीही अस्वस्थ पाहिले नाही.


ऑनलाईन तभा वाचण्यासाठी
www.tarunbharat.net
वर भेट द्या!

# आयुष शेट्टीने पटकावले आशिया चॅम्पियनशिपमध्ये रौप्यपदक

◆ **चीन, १२ एप्रिल**

बॅडमिंटन आशिया चॅम्पियनशिपमध्ये रौप्यपदकासह पदार्पण करणाऱ्या आयुष शेट्टीचा प्रवास रविवारी पुरुष एकेरीच्या अंतिम सामन्यात चीनच्या जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या शी यु ची विरुद्ध २१-८, २१-१० अशा चुरशीच्या लढतीत पराभव झाल्याने संपुष्टात आला.

या वीस वर्षीय खेळाडूने या स्पर्धेत रौप्यपदक जिंकणारा पहिला भारतीय आणि पुरुष एकेरीमध्ये ६१ वर्षांनंतर अंतिम फेरीत पोहोचणारा पहिला खेळाडू बनून इतिहास रचला. मागील फेऱ्यांमधील आपला वेग कायम ठेवण्यात शेट्टीला अपयश आले, कारण अनुभवी चिनी खेळाडू या भारतीय युवा खेळाडूसाठी खूपच कडवी झुंज ठरली. पहिल्याच गेममध्ये आघाडी घेतल्यामुळे शी ने आयुषला पुनरागमन करण्याची फारशी संधी दिली नाही.



दुसऱ्या गेममध्ये ७-२ अशी ५ गुणांची आघाडी घेत आयुषने दमदार सुरुवात केली, पण त्याला ती आघाडी टिकवता आली नाही, कारण चिनी खेळाडूने पुन्हा एकदा नियंत्रण मिळवत ७-७ अशी बरोबरी साधली आणि अखेरीस विजयावर शिक्कामोर्तब केले.

या स्पर्धेने या युवा खेळाडूची क्षमता आणि भारतीय बॅडमिंटनचे उज्ज्वल भविष्य सिद्ध केले. त्याने जागतिक क्रमवारीत पहिल्या, तिसऱ्या आणि सातव्या क्रमांकावर असलेल्या खेळाडूंना पराभूत करून जगातील अव्वल खेळाडूंपुढे गंभीर आव्हान उभे केले.

# तीन तासांच्या खराब खेळामुळे आम्हाला फटका : विशाल उप्पल

◆ **नवी दिल्ली, १२ एप्रिल**

बिली जीन किंग कप (बीजेकेसी) टेनिस स्पर्धेच्या आशिया-ओशनिया गट आयमध्ये आपल्या संघाला तिसरे स्थान मिळाल्याबद्दल भारतीय कर्णधार विशाल उप्पलने पहिल्या दिवशीच्या तीन तासांच्या खराब खेळाला दोषी ठरविले. या पराभवामुळे भारताला वर्ल्ड ग्रुप प्लेऑफसाठी पात्र ठरण्याची संधी गमवावी लागली.

भारत गट आय मध्येच कायम राहील, तर अव्वल दोन संघ, थायलंड आणि इंडोनेशिया, प्लेऑफसाठी पात्र ठरले आहेत. आठवडाभरातील चढ-उतार असलेल्या कामगिरीवर भाष्य करताना उप्पल म्हणाला की, थायलंडविरुद्धची संथ सुरुवात एका कठीण सामन्यात महागात पडली. शनिवारी अंतिम सामन्यात दक्षिण कोरियाला २-१ ने हरवल्यानंतर उप्पल म्हणाला, सर्वांत मोठा आनंद म्हणजे आम्ही कोरियाला हरवले. पण दुःखद गोष्ट ही आहे की आठवड्याच्या सुरुवातीला आम्ही तीन तास खराब टेनिस खेळलो, ज्यामुळे आम्हाला प्लेऑफ गमवावे लागले.



पात्र ठरण्याच्या मोठ्या आशांसह भारताने या स्पर्धेत प्रवेश केला होता, परंतु थायलंडविरुद्धचा पराभव त्यांना महागात पडला. उप्पल म्हणाला, मला आता खूप वाईट वाटत आहे. स्पर्धेपूर्वी आम्हाला माहीत होते की पात्र होण्यासाठी आम्हाला थायलंड आणि कोरियाला हरवावे लागेल. जर आम्ही पहिल्या दिवशी दोन-तीन तास खराब टेनिस खेळलो नसतो, तर चित्र वेगळे असते.

वैष्णवी अडकर थायलंडविरुद्ध पहिला एकेरी सामना हरली. त्यानंतर पावसामुळे बाधित झालेल्या दुसऱ्या एकेरी सामन्यात सहजा यमलपल्लीचा पराभव झाला. थायलंडने इंडोनेशियाला मागे टाकून गुणतालिकेत अव्वल स्थान पटकावले. भारतालाही इंडोनेशियाकडून निसटता पराभव पत्करावा लागला.

ज्येष्ठ खेळाडू अंकिता रैना म्हणाली की, क्रमवारी काहीही असली तरी देशासाठी खेळण्यात एक वेगळाच उत्साह असतो. अशा संधी वारंवार मिळत नाहीत.

# राजस्थान रॉयल्सचे व्यवस्थापक भिंदर वादाच्या भोवऱ्यात

**डगआऊटमध्ये फोन वापरून नियमांचे उल्लंघन**

◆ **नवी दिल्ली, १२ एप्रिल**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्धच्या इंडियन प्रीमियर लीग सामन्यादरम्यान संघाच्या डगआऊटमध्ये मोबाईल फोन वापरताना टीव्ही कॅमेऱ्यात कैद झाल्यामुळे राजस्थान रॉयल्सचे माजी संघ व्यवस्थापक रोमी भिंदर वादात सापडले आहेत.

ही घटना सर्वप्रथम एका सोशल मीडिया इन्फ्लुएन्सरने इन्स्टाग्रामवर शेअर केली होती, परंतु शुक्रवारी गुवाहाटी येथे रॉयल्सच्या सहा गडी राखून झालेल्या विजयादरम्यान भिंदर मोबाईल फोन वापरत असल्याची पुष्टी झाली आहे. तडाखेबंद खेळाडू वैभव सूर्यवंशी त्यांच्या शेजारी बसला होता.



भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) एका अधिकाऱ्यानेही भिंदर यांनी नियमांचे उल्लंघन केल्याची पुष्टी केली आहे. ते म्हणाले, होय, भिंदर यांनी खेळाडू आणि सामना अधिकारी क्षेत्राच्या (पीएमओए) नियमांचे उल्लंघन केले आहे, कारण सामन्यादरम्यान डगआऊटमध्ये मोबाईल फोन वापरण्यास मनाई आहे.

आयपीएलच्या अधिकृत वेबसाइटवरील पीएमओए प्रोटोकॉल २०२६ नुसार, संघ व्यवस्थापक ड्रेसिंग रूममध्ये फोन वापरू शकतो, परंतु डगराऊटमध्ये नाही. भिंदर फ्रँचायझीच्या स्थापनेपासूनच तिच्याशी संबंधित आहे आणि तज्ज्ञांच्या मते, त्याला भ्रष्टाचारविरोधी नियमावलीची चांगलीच माहिती असायला हवी.

अधिकाऱ्याने सांगितले, हे अनवधानाने घडले असेल, परंतु नियमांचे उल्लंघन असल्याने कारवाई केली पाहिजे. सामनाधिकारी आणि एसीयू (भ्रष्टाचारविरोधी पथक) यांच्या अहवालाच्या आधारे ताकीद द्यायची की बंदी घालायची, हे ठरवले जाईल. याच्या आधारे आयपीएल नियामक परिषद निर्णय घेऊ शकते. सामन्यानंतर सूर्यवंशीने भिंदरचा उल्लेख आपला ‘स्थानिक मार्गदर्शक’ असा केल्याने त्याला आणखी चौकशीला सामोरे जावे लागू शकते.

# सविताच्या पुनरागमनामुळे भारताला दिलासा

### कर्णधार सलीमा आजारपणामुळे बाहेरच

◆ **बुएनोस आयर्स, १२ एप्रिल**

स्टार गोलकीपर आणि माजी कर्णधार सविता पुनिया १० महिन्यांनंतर राष्ट्रीय महिला हॉकी संघात पुनरागमन करणार आहे. सोमवारी येथे सुरू होणाऱ्या अर्जेंटिनाविरुद्धच्या चार सामन्यांच्या मालिकेत ती खेळणार आहे, पण कर्णधार सलीमा टेटे आजारपणामुळे खेळू शकणार नाही.

वैयक्तिक कारणांमुळे खेळापासून दूर राहिल्याने सविता जून २०२५ पासून कोणत्याही स्पर्धेत खेळलेली नाही, तर मिडफिल्डर सलीमा सध्या कांजण्यांमधून बरी होत आहे. एफआयएच नेशन्स कप, यावर्षी बेल्जियम आणि नेदरलँड्‌समध्ये होणारा एफआयएच हॉकी विश्वचषक आणि आशियाई खेळांच्या पृष्ठभूमीवर हा दौरा भारतासाठी महत्त्वाचा आहे.

भारतीय महिला संघ गुरुवारी संध्याकाळी अर्जेंटिनासाठी रवाना झाला. यापूर्वी, त्यांनी बंगळुरू येथे एका प्रशिक्षण शिबिरात भाग घेतला होता.

हैदराबाद येथे झालेल्या २०२६ विश्वचषक पात्रता फेरीत उपविजेता ठरलेला भारतीय संघ आपली विजयी लय कायम ठेवण्याचा प्रयत्न करेल. सलीमाच्या अनुपस्थितीत, अनुभवी फॉरवर्ड नवनीत कौर या दौऱ्यावर संघाचे नेतृत्व करेल. नवनीतला तिच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल नुकताच हॉकी इंडिया बलबीर सिंग सीनियर प्लेयर ऑफ द इयर पुरस्कार मिळाला आहे.

अनुभवी भारतीय गोलकीपर सविता पुनियाच्या पुनरागमनामुळे संघ लक्षणीयरीत्या मजबूत होईल. बिचू देवी खरिबाम तिच्यासोबत गोलकीपिंगची जबाबदारी सांभाळेल. नुकताच आपला २०० वा आंतरराष्ट्रीय सामना खेळलेली निक्की प्रधान आणि अनुभवी सुशीला चानू बचावफळीचे नेतृत्व करतील.

भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक स्योर्ड मारिन यांनी या दौऱ्याबद्दल सांगितले, आम्ही येथे २३ खेळाडूंसह आलो आहोत आणि प्रत्येकाला आपली प्रतिभा दाखवण्याची संधी मिळेल. आम्ही या दौऱ्याचा उपयोग विविध सांघिक संयोजन आजमावण्यासाठी आणि जिंकण्याचे मार्ग शोधण्यासाठी करू. जगातील दुसऱ्या क्रमांकाच्या संघाविरुद्ध वैयक्तिक आणि सांघिक कामगिरी पाहण्यासाठी मी उत्सुक आहे. इशिका चौधरी, मनीषा चौहान, ज्योती आणि उदिता यांसारख्या खेळाडू देखील भारताच्या बचावफळीचा भाग आहेत. वरिष्ठ संघात निवड झाल्यामुळे लालथंतुलंगीलाही आपले कौशल्य दाखवण्याची संधी मिळेल. सलीमा संघाबाहेर असल्याने, नेहा, वैष्णवी विठ्ठल फाळके आणि सुनेलिता टोप्पो यांच्यावर मिडफिल्डची जबाबदारी असेल.साक्षी राणा, ऋतुजा दादाशो पिसाळ, इशिका आणि दीपिका सोरेंग यांसारख्या खेळाडू आपली छाप पाडण्यासाठी आणि संघात आपले स्थान पक्के करण्यासाठी कोणतीही कसर सोडणार नाहीत. बलजीत कौर, दीपिका आणि ब्युटी डुंगडुंग यांच्यावर फॉरवर्ड लाईनची जबाबदारी असेल. मुमताज खानचेही संघात पुनरागमन झाले असून, तिच्या उपस्थितीमुळे भारतीय संघाची गोल करण्याची क्षमता वाढेल.



## महत्त्वाचे

### नेताजींचे पणतू चंद्रकुमार यांचा तृणमूलमध्ये प्रवेश

**कोलकाता :** नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे पणतू चंद्रकुमार बोस यांनी भाजपा सोडून तृणमूल काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यांनी भाजपच्या धोरणांना



विभाजनकारी म्हटले असून निवडणूक आयोगावर संगनमताचा आरोपही केला. तृणमूलमध्ये प्रवेश केल्यानंतर चंद्र कुमार बोस म्हणाले, भाजपामध्ये सामील होणे ही आपल्या आयुष्यातील एक ऐतिहासिक चूक होती. निवडणुका जिंकण्यासाठी लोकांमध्ये फूट आणि ध्रुवीकरण करणे हेच त्यांचे एकमेव ध्येय आहे. मी जातीयवादाचा सामना जातीयवादाने करू शकत नाही. जर एखाद्या पक्षाचे एकमेव ध्येय समाजाला विभाजित करणे असेल, तर मी तिथे राहू शकत नाही. त्यांनी देशाची रचना वाचवण्यासाठी सर्व विरोधी पक्षांना एकत्र येण्याचे आवाहन केले. ■

**ऑनलाईन तभा वाचण्यासाठी www.tarunbharat.net वर भेट द्या!**

# पाणीटंचाईचे संकट अधिक गडद

## देशातील १६६ जलाशयांची पातळी ५० टक्क्यांनी घटली

◆ **नवी दिल्ली, १२ एप्रिल**

देशातील १६६ प्रमुख जलाशयांमधील पाण्याची पातळी दोन महिन्यांतच ५० टक्क्यांनी घटली असून, एकूण साठवण क्षमतेपैकी केवळ ४४.७१ टक्केच पाणी शिल्लक असल्याने भर उन्हाळ्यात पाणी टंचाईचे संकट निर्माण होण्याची भीती केंद्रीय जलआयोगाने व्यक्त केली आहे.

जलाशयांमधील एकूण साठा ८२.०२ अब्ज घनमीटरपर्यंत खाली आला आहे, जो एकूण क्षमतेच्या केवळ ४४.७१ टक्के आहे. पाणी पातळी कमी होण्याचा वेग कायम राहिल्यास महिनाभरात तीव्र पाणीटंचाई निर्माण होऊ शकते, असे आयोगाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे. देशातील १६६ जलाशयांतील पाणी पातळी फेब्रुवारी झपाट्याने कमी होत आहे. केवळ दोन महिन्यांत २२ टक्के घट नोंदवली गेली आहे. यामुळे उन्हाळ्यात पाणीटंचाईचा धोका वाढला आहे. बहुतांश नदी खोरे आता त्यांच्या क्षमतेच्या ३० टक्के ते ६० टक्के क्षमतेने कार्यरत आहेत. बिहारमधील चंदन धरण पूर्णपणे कोरडे पडले आहे. आयोगाच्या मते, परिस्थिती गेल्या वर्षीच्या आणि १० वर्षांच्या सरासरीपेक्षा चांगली आहे, परंतु पाण्याच्या पातळीत होणाऱ्या घसरणीचा वेग ही चिंतेची बाब आहे.

तज्ज्ञांच्या मते, या घसरणीमागे जानेवारी-फेब्रुवारीमधील कमी पाऊस आणि सिंचन व वीज निर्मितीसाठी वाढलेला पाण्याचा वापर ही मुख्य कारणे आहेत. गेल्या वर्षी चांगल्या मान्सूनमुळे जलाशय पूर्ण भरलेले होते, तर यावर्षी सुरुवातीच्या महिन्यांत वाढलेल्या पाण्याच्या वापरामुळे जलाशयातील साठा झपाट्याने कमी झाला आहे. सध्या पाण्याची पातळी गेल्या वर्षीपेक्षा चांगली आहे, परंतु घटीच्या गतीने चिंता वाढवली आहे.



### जलाशयांत असलेल्या पाण्याची एकूण टक्केवारी

| राज्य | टक्का |
|---|---|
| आसाममधील खांडोंग | २८ |
| कर्नाटकातील तातिहल्ला | १६ |
| केरळमधील पेरियार | ३३ |
| तामिळनाडूतील शोलेर | १३ |
| तामिळनाडूतील वैगई | २६ |
| तेलंगणातील प्रियदर्शनी जुराला | ४२ |
| प. बंगालमधील कांगसावती | ३४ |

### राज्यस्तरीय आकडेवारी

| राज्य | जलाशयातील घट |
|---|---|
| पंजाब | ७३.७२ |
| राजस्थान | ४७.८२ |
| महाराष्ट्र | ४५.५५ |
| हिमाचल प्रदेश | ३०.६९ |
| गुजरात | २६.३३ |
| मध्य प्रदेश | २३.७९ |
| बिहार | २२.८१ |

### प्रमुख नद्यांच्या पाणी पातळीतील घट

| नदी | टक्के |
|---|---|
| तापी | ६०.७१ |
| गंगा | ५३.८ |
| महानदी | ५२.१७ |
| गोदावरी | ४७.५८ |
| नर्मदा | ४६.०९ |
| कावेरी | ४२.७५ |
| कृष्णा | ३१.३१ |

# पलानीस्वामींच्या आरोपाने खळबळ

श्यामकांत जहागीरदार

◆ **नवी दिल्ली, १२ एप्रिल**




तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत विरोधी पक्षनेते अण्णाद्रमुकचे पलानीस्वामी यांनी मुख्यमंत्री एम.के. स्टॅलिन यांच्यावर केलेल्या आरोपाने राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे.

शेवटच्या दिवसात स्टॅलिन यांनी आपल्या पित्याला म्हणजे करुणानिधी यांना घरात कैद करुन ठेवले होते, असा आरोप पलानीस्वामी यांनी केला. विशेष म्हणजे असा आरोप स्टॅलिन यांचे सख्खे भाऊ अलागिरी आणि विश्वासू सहकारी ए. राजा यांनी केला होता, त्यांच्याच आरोपांचा मी पुनरुच्चार करतोआहे, असे पलानीस्वामी यांनी म्हटले.

करुणानिधी यांची प्रकृती ठिक नसताना ए. राजा यांचा एक ऑडियो खूप व्हायरल झाला होता. करुणानिधी यांना स्टॅलिन यांनी घरात नजरबंद करुन ठेवले होते, असा दावा या ऑडियोतून राजा यांनी केला होता, असा आरोप पलानीस्वामी यांनी एका प्रचारसभेत केला. ज्या पित्याने तुम्हाला आमदार, मंत्री, उपमुख्यमंत्री आणि पक्षाचा कार्यकारी अध्यक्ष बनवले, त्यांना घरात नजरकैदेत ठेवणे कितपत योग्य आहे, अशी विचारणाही त्यांनी केली.

पलानीस्वामी फक्त ए. राजा यांचा संदर्भ देऊनच थांबले नाही तर त्यांनी स्टॅलिन यांचे संख्खे भाऊ अलागिरी यांनी केलेल्या आरोपाचाही पुनरुच्चार केला आहे. माझ्या वडिलांना एका कैद्यासारखे ठेवले गेले आहे, असे अलागिरी यांनी तेव्हा म्हटले होते. जेव्हा करुणानिधी यांच्या सख्खा मुलाने असा आरोप केला होता, तेव्हा त्याच्यावर आपण अविश्वास कसा दाखवायचा? अशी विचारणाही पलानीस्वामी यांनी केली आहे. अलागिरी आणि राजा यांच्यात आरोपात थोडेही तथ्य आढळले तर स्टॅलिन यांना आपली मुख्यमंत्रिपदाची खूर्ची गमवावी लागेल, असे ते म्हणाले. ए. राजा यांनी ऑडियोबाबतचे सर्व आरोप फेटाळून लावले आहे. हा ऑडियो जारी करणाऱ्या युट्युब ला अब्रुनुकसानीची नोटिस पाठवण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. ए. राजा त्यावेळी द्रमुकमध्ये उपमहासचिव होते, त्यामुळे त्यांनी केलेल्या आरोपांनी गांभीर्य वाढले होते. माझ्यावर या आरोपाचा राग काढण्यापेक्षा ज्यांनी असा आरोप केला, त्या राजा यांच्यावर आरोप करा, असा प्रतिटोला पलानीस्वामी यांनी मुख्यमंत्री स्टॅलिन यांना मारला. ■

# मुख्यमंत्री स्टॅलिन यांनी आरोप फेटाळले

**नवी दिल्ली, १२ एप्रिल**

तामिळनाडूचे माजी मुख्यमंत्री आणि द्रमुक नेते करुणानिधी यांना नजरकैदेत ठेवण्यात आले होते, हा अण्णाद्रमुकचे नेते आणि माजी मुख्यमंत्री पलानीस्वामी यांचा आरोप मुख्यमंत्री स्टॅलिन यांनी फेटाळून लावला आहे. वयोमान झाल्यामुळे तसेच प्रकृतीच्या तक्रारींमुळे करुणानिधी माझ्या निवासस्थानी आराम करत होते, पक्षातील नेत्यांना भेटत नव्हते, असे स्टॅलिन यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री म्हणून माझ्या कार्यकाळावर तसेच कार्यपध्दतीवर पलानीस्वामी यांनी आरोप करावे, पण मर्यादा सोडून खालच्या पातळीवर व्यक्तिगत आरोप करु नये, असे आवाहन स्टॅलिन यांनी केले.

यावर द्रमुकच्या नेत्यांनी जे आरोप केले, त्याकडेच मी फक्त लक्ष वेधले, असा खुलासा करतांना, स्टॅलिन यांच्यावर आरोप करतांना पलानीस्वामी यांनी करुणानिधी यांचे कौतुक केले. सगळा देश त्यांची प्रशंसा करतो, पण त्यांच्या घरात जी भाऊबंदकी सुरु आहे, ती चिंताजनक असल्याचे त्यांनी म्हटले आहे. आपल्या वडिलांना नजरकैदेत ठेऊन सत्ता बळकावणाऱ्या स्टॅलिन यांची तुलना आपल्या वडिलांना तुरुंगात टाकून गादीवर बसलेल्या औरंगजेबाशी करण्याचा प्रयत्न पलानीस्वामी यांनी केला असल्याचे दिसते.

दुसरीकडे ए. राजा यांनी ऑडियोतून करण्यात आलेल्या आरोपांचे खंडन केले आहे, असे खोडसाळ आरोप करणाऱ्यांवर अब्रुनुकसानीचा खटला दाखल करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. मात्र अशा आरोपांमुळे द्रमुकचे करुणानिधी आणि अण्णाद्रमुकच्या जयललिता यांच्या मृत्यूचे राजकारण होण्याची शक्यता वाढली आहे. पलानीस्वामी यांनी केलेल्या आरोपांचा राजकीय फायदा पलानीस्वामी आणि अण्णाद्रमुकला मिळतो की स्टॅलिन यांचा आरोपांचा जनमानसावरील प्रभाव खोडून काढत तामिळनाडूची सत्ता पुन्हा मिळवतील, याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

# एकाच सुनावणीत फेटाळल्या २५ जनहित यचिका

## सर्वोच्च न्यायालयाचा याचिकाकर्त्यांना दणका



◆ **नवी दिल्ली, १२ एप्रिल**

देशभरातील सर्वच न्यायालयांमध्ये याचिका दाखल करण्याचे प्रमाण वाढले असून, याचा ताण न्यायव्यवस्थेवर येत आहे. अशातच प्रत्येक समस्येसाठी न्यायालयात येऊ नका, अशा शब्दांत फटकारत सर्वोच्च न्यायालयाने एकाच सुनावणी २५ जनहित याचिका फेटाळून लावल्या आहेत.

सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या अध्यक्षतेखालील झालेल्या सुनावणीत या याचिकेला कुठलाही आधार नसल्याचे कारण देत फेटाळून लावण्यात आल्या. याचिकाकर्त्यांनी सर्वप्रथम संबंधित प्रशासकीय आणि संबंधित प्राधिकरणांकडे संपर्क करावा. तेथे कोणतीही कारवाई न झाल्यासच न्यायालयात हस्तक्षेपासाठी यावे. विविध मुद्द्यांवर अधिकाऱ्यांना शिक्षित करणे आणि संवेदनशील बनवणे ही पहिली पायरी असावी, असे सरन्यायाधीशांनी नमूद केले. वकिलांनी मुद्दे समजून घेऊन योग्य ठिकाण निवडणे अपेक्षित आहे. प्रत्येक धोरणात्मक बाबतीत न्यायपालिका हा शेवटचा आधार आहे, पहिला नाही. तसेच सर्वोच्च न्यायालयाने जातीय जनगणनेला स्थगिती देण्याची मागणी करणारी याचिका फेटाळून लावली. सरन्यायाधीशांनी याचिकेतील मजकूर आणि वापरलेल्या भाषेवर तीव्र आक्षेप व्यक्त केला.

### कोणत्या याचिका फेटाळल्या?

**फेटाळलेल्या याचिकांमध्ये एकसमान भाषा धोरण, साबणातील रसायनांवर नियमन आणि देशव्यापी अन्न नोंदणी मोहिमेची मागणी करण्यात आली होती. एका जनहित याचिकेत भिकारी आणि तृतीयपंथी लोकांसारख्या वंचित गटांच्या उन्नतीसाठी धोरण तयार करण्याचे निर्देश देण्याची मागणी करण्यात आली होती. सर्वोच्च न्यायालयाने पाच जनहित याचिका निरर्थक असा शेरा मारून फेटाळून लावल्या. एका याचिकेत कांदा आणि लसूणमध्ये तामसिक (नकारात्मक) ऊर्जा आहे की नाही हे ठरवण्यासाठी वैज्ञानिक अभ्यासाची मागणी करण्यात आली होती.** ■

# विदर्भात उष्णतेचा कहर, सर्व जिल्हे चाळिशी पार

## अकोल्यात सर्वाधिक ४३.१ तापमान

◆ **नागपूर, १२ एप्रिल**

अवकाळीचा कहर शांत झाल्यानंतर हवामान खात्याच्या अंदाजानुसार विदर्भ तापायला सुरुवात झाली आहे. रविवारी विदर्भातील सर्वच जिल्ह्यांमध्ये पारा चाळीशीच्या वर गेल्याचे दिसून आले असून, यात अकोल्यात सर्वाधिक ४३.१ अंश तापमानाची नोंद करण्यात आली.

अकोल्याच्या खालोखाल अमरावती येथे ४२.४ इतके तापमान नोंदविण्यात आले. वर्धेत ४२ आणि वाशिम येथे ४१.६ इतके तापमान नोंदविण्यात आले. त्याखालोखाल नागपुरात ४१.४ अंश तापमानाची नोंद झाली आहे.

तिथेच चंद्रपूर आणि गडचिरोली येथे ४१ अंश तापमानाची नोंद झाली. बुलढाणा येथे ४०.६ आणि गोंदिया येथे ४०.५ अंश इतके तापमान होते. सोबतच, यवतमाळ येथे ४०.२ आणि भंडारा येथे ४० अंश तापमान होते. विदर्भासोबतच महाराष्ट्राच्या काही जिल्ह्यांमध्येही तापमानाचा पारा वाढत असल्याचे चित्र दिसत आहे.

पुढील काही दिवस तापमानात सातत्याने वाढ होणार असल्याचा इशारा हवामान खात्याने दिला असून, नागरिकांनी आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.




पक्षी आपले वेळापत्रक कधीच विसरत नाहीत. आपल्या अवतीभोवती राहणाऱ्या चिमणाबाईचेही तसेच. कडक उन्हाळा लागताच आपलं इवलेले घरटे बांधण्याची तयारी सुरू होते. मऊ कापूस, फांदी, पिसे गोळा करून येणाऱ्या पिढीसाठी तिची तजविज सुरू होते.

# महिला व बालविकास विभागात मेगाभरती

## ८ हजार ६०० हून अधिक पदांचा मार्ग मोकळा

◆ **मुंबई ,१२ एप्रिल**

गेल्या दोन दशकांपासून प्रलंबित असलेला महिला व बालविकास विभागाच्या रिक्त पदांचा आणि नवीन आकृतीबंधाचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. तब्बल २३ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर राज्य सरकारने या विभागाच्या ८ हजार ६६९ नियमित पदांच्या नवीन आराखड्याला मंजुरी दिली आहे. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी या क्रांतिकारी निर्णयाची घोषणा केली असून, यामुळे राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांना रोजगाराची मोठी संधी उपलब्ध होणार आहे. या निर्णयामुळे विभागाच्या कामकाजाला आता नवी गती मिळणार आहे.

विभागाच्या सक्षमीकरणासाठी केवळ जुन्या पदांची भरतीच नाही, तर काळानुरूप प्रशासकीय सुसूत्रता आणण्यासाठी १६५ नवीन पदांची भरही टाकण्यात आली आहे. नियमित पदभरतीसोबतच दैनंदिन प्रशासकीय कामकाजाचा वेग वाढवण्यासाठी २ हजार ८४३ पदे बाह्ययंत्रणेद्वारे भरली जाणार आहेत. हा निर्णय केवळ सरकारी नोकरीपुरता मर्यादित नसून, महिला आणि बालकांच्या कल्याणासाठी राबवल्या जाणाऱ्या योजनांची तळागाळापर्यंत प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी उचललेले हे एक ऐतिहासिक पाऊल मानले जात आहे. या मेगाभरतीचा सर्वात मोठा फायदा ग्रामीण आणि शहरी भागातील आरोग्याचा कणा असलेल्या अंगणवाडी व्यवस्थेला होणार आहे.

# अलवार सुरांची 'आशा' निमाली

(पान १ वरून)

आशा भोसले यांच्या पार्थिवावर सोमवारी अन्त्यसंस्कार होतील, असे त्यांचा मुलगा आनंद यांनी सांगितले. आशा भोसले यांचे वास्तव्य लोअर परळ येथील 'कासा गांद्रे' येथे होते. तिथे सोमवारी सकाळी ११ वाजता लोक त्यांना अखेरचा निरोप देऊ शकतील. त्यांच्या पार्थिवावर उद्या दुपारी चार वाजता शिवाजी पार्क येथे अन्त्यसंस्कार केला जाईल, असे आनंद यांनी पत्रकारांना सांगितले.

ज्या कौशल्याने आशा भोसले यांनी 'चैन से हम को कभी'मध्ये हरवलेल्या प्रेमावर शोक करायला लावला, त्याच कौशल्याने 'आजा आजा'वर श्रोत्यांना नाचायला लावले.

आशा भोसले यांनी स्वतः आठ दशकांपेक्षा जास्त काळ गायन केले आणि तब्बल १२ हजार गाणी ध्वनिमुद्रित केली. त्यांचे पहिले गाणे १९४३ मध्ये वयाच्या अवघ्या दहाव्या वर्षी 'माझा बाळ' या मराठी चित्रपटासाठी होते. त्यांनी २०१० च्या दशकाच्या उत्तरार्धापर्यंत आणि त्यानंतरही गायन सुरूच ठेवले. त्यामुळे जागतिक संगीत इतिहासातील सर्वाधिक दीर्घकाळ सादरीकरण करणाऱ्या गायकांमध्ये त्यांची गणना केली जाते.


# 'शांती'ची झोळी रिकामीच

(पान १ वरून)

इराणच्या दोन अटी अमेरिकेने अमान्य केल्याने चर्चा फिस्कटल्याची माहिती समोर आली आहे. अमेरिकेचे उपराष्ट्रपती जे.डी. व्हान्स पत्रपरिषदेत बोलताना म्हणाले, पाकिस्तानच्या मध्यस्थीने इराणसोबत झालेल्या चर्चेत सर्व अटींवर व्यापक चर्चा झाली, मात्र त्यातून काहीही निष्पन्न झाले नाही. इराण अण्वस्त्रमुक्त होईल आणि अण्वस्त्र विकास कार्यक्रम पूर्णपणे बंद करेल याची हमी द्यायला तयार नाही. त्यांनी आमच्या अटी स्वीकारण्यास नकार दिला आहे. प्रदीर्घ चर्चेनंतर अमेरिकेने आपली अंतिम आणि सर्वोत्तम ऑफर दिली होती आणि संपूर्ण वाटाघाटी दरम्यान अमेरिकेच्या शिष्टमंडळाने बरीच लवचिकता दाखवली. होर्मुझ जलमार्गावरील नियंत्रण सोडण्यात त्यांनी तयारी दर्शवली नाही.



इराणच्या उत्पन्नाचा कणा असलेल्या कच्च्या तेलाच्या निर्यातीवर अधिक कडक निर्बंध लादून त्यांची आर्थिक नाकेबंदी केली जाईल. होर्मुझवर अमेरिकेचे नियंत्रण राहणार असून इराणला शुल्क देणाऱ्या जहाजांना प्रवेश दिला जाणार नाही. करार नाकारून त्यांनी मोठी चूक केली आहे आणि याची किंमत चुकवावी लागेल. **- डोनाल्ड ट्रम्प,** राष्ट्राध्यक्ष, अमेरिका



इराण चांगल्या हेतूने आणि दृढ निश्चयाने चर्चेसाठी पुढे आला होता, परंतु मागील दोन युद्धांच्या कटू अनुभवांमुळे अमेरिकेबद्दल तीव्र अविश्वास निर्माण झाला आहे. अमेरिकेचे बोलणे आणि कृती यातील तफावत हे या अपयशाचे मुख्य कारण होते. इराणचा विश्वास जिंकण्यात त्यांना पूर्णपणे अपयश आले.

**- मोहम्मद गालिबाफ,** अध्यक्ष, इराण संसद

आंतरराष्ट्रीय जलमार्गावर कोणत्याही देशाचा ताबा असू शकत नाही अशी आमची भूमिका आहे. दुसरीकडे इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी अमेरिकेने अवाजवी मागण्या केल्या, त्या आम्ही अमान्य केल्याचे सांगितले. हितसंबंधासाठी राजनैतिक प्रयत्न सुरूच ठेवणार असल्याचे ते म्हणाले.

### राजधानीतील एक असेही साहित्य संमेलन

राजधानी दिल्लीत नुकतेच एक साहिन्य संमेलन पार पडले. याआधी दिल्लीत अ. भा. मराठी साहित्य संमेलनही झाले होते. आता महिला शासकीय अधिकाऱ्यांचे साहित्य संमेलन झाले. साहित्यात हा नवा प्रवाह आला, असे म्हणायला हरकत नाही. आतापर्यंत साहित्यिकात शासकीय सेवेत नसलेले पण सरकार समर्थक आणि सरकार विरोधक असे दोन गट मानले जात होते. आता त्यात शासकीय सेवेतील महिला अधिकाऱ्यांची भर पडली आहे. या संमेलनाचे आयोजन सरहद पुणे, महाराष्ट्र सदन नवीन दिल्ली आणि मराठी भाषा विभाग महाराष्ट्र शासनाने केले. राजधानीत झालेल्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे आयोजनही सरहद पुणे यांनीच केले होते. साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात अ. भा. मराठी साहित्य महामंडळाचा जेवढा हातखंडा नसेल, तेवढा आता सरहद पुणेचा झाला आहे, असे म्हणायला हरकत नाही.

निवृत्त सनदी अधिकारी आणि ज्येष्ठ साहित्यिका लीना मेहंदळे संमेलनाच्या अध्यक्ष होत्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन झाले. या संमेलनातील महिला अधिकाऱ्यांच्या मुलाखतीचे आणि अनुभवकथनांचे काही सत्र अतिशय चांगले झाले. शासकीय सेवेतील महिला अधिकारी निवृत्तीनंतर शासकीय सेवेतील आपले अनुभव सांगणारे आत्मचरित्रपर लेखन करीत असतात, पण या लेखनाला आतापर्यंत साहित्याचा दर्जा मिळत नव्हता. साहित्यिक म्हणून पुरस्कारही मिळत नव्हते. याबाबतची व्यथा महिला शासकीय अधिकाऱ्यांनी आणि संमेलनाध्यक्ष लीना मेहंदळे यांनी मांडली आणि मराठी भाषा विभागाचे मंत्री उदय सामंत यांनी ती तत्काळ मान्यही केली. आता शासकीय सेवेतील महिला अधिकाऱ्यांच्या लिखाणाला साहित्य म्हणून आणि त्यांना साहित्यिक म्हणून नुसती मान्यता नाही, तर पुरस्कारही दिले जाणार आहे, ही समाधानाची बाब म्हटली पाहिजे. असे संमेलन आता दरवर्षी महाराष्ट्रात घेतले जातील, असेही सामंत यांनी जाहीर केले. या संमेलनाच्या आयोजनाचे श्रेय महाराष्ट्र सदनाच्या निवासी आयुक्त आर. विमला आणि महालेखा उपनियंत्रक तसेच स्वागताध्यक्ष सुप्रिया देवस्थळी यांना द्यायला पाहिजे. शासकीय सेवेतील महिला अधिकाऱ्यांच्या साहित्य संमेलनाला मिळालेला प्रतिसाद पाहता शासकीय सेवेतील पुरुष अधिकारीही आपल्यासाठी अशा संमेलनाची मागणी करू शकतात. लोकसभा आणि विधानसभेत महिलांना ३३ टक्के आरक्षणाबाबतचे घटनादुरुस्ती विधेयक पारित होत असताना शासकीय सेवेतील महिला अधिकाऱ्यांचे असे साहित्य संमेलन हा एक चांगला संकेत म्हणायला हरकत नाही.

### राजधानीत झाले छत्रपती शिवाजी महाराजांवरील अनुभूती संग्रहालय

**राजधानीत** दिल्लीत छत्रपती शिवाजी महाराजांवरील एका अनुभुती संग्रहालयाचे लोकार्पण नुकतेच केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते झाले. छत्रपती शिवाजी महाराज स्मारक राष्ट्रीय समितीने या संग्रहालयाची उभारणी केली आहे. दिल्ली ही मुघलांची राजधानी म्हणून ओळखली जाते. या ठिकाणी स्वराज्याची उभारणी करणाऱ्या




एका महामानवाचे आणि राष्ट्रपुरुषाचे संग्रहालय स्थापन होणे ही समस्त मराठी माणसांच्या दृष्टीने आनंदाची आणि अभिमानाची बाब म्हटली पाहिजे. महाराष्ट्रात शिवाजी महाराजांवरील अनेक संग्रहालये आहेत. त्यांनी बांधलेले अनेक किल्ले आजही चांगल्या स्थितीत आहेत. शिवकथाकार बाबासाहेब पुरंदरे यांच्या गाजलेल्या जाणता राजा या महानाट्याचे अनेक प्रयोग राजधानीत झाले. आता दिल्लीतील आणि उत्तर भारतातील लोकांना त्यांचा इतिहास कायमस्वरूपी पाहण्याची आणि अनुभवण्याची संधी यानिमित्त मिळाली आहे.छत्रपती शिवाजी महाराजांचा जेवढा प्रभाव महाराष्ट्रात जाणवतो, तेवढा तो दुर्दैवाने उत्तर भारतात जाणवत नाही. याचे कारण, शिवाजी महाराजांचा इतिहास जसा महाराष्ट्रातील शाळांतून शिकविण्यात आला, तसा तो उत्तर भारतातील शाळांतून शिकविण्यात आला नाही. नाही म्हणायला शिवाजी महाराजाच्या नावाने दिल्लीत एक रेल्वे स्टेशन आहे, एक एअरपोर्ट, मेट्रो स्टेशनही आहे. संसदभवनात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळाही आहे. खरं म्हणजे, शिवाजी महाराज फक्त महाराष्ट्राचेच नाही, तर देशाचे आराध्य आणि राष्ट्रदैवत व्हायला पाहिजे. आपल्या कार्यकाळात शिवाजी महाराज बहुधा दिल्लीपर्यंत आले नसावे. ते आग्र्याला आले होते. आग्र्यातून सुटका हा त्यांचा इतिहास सगळ्यांना माहिती आहे. उत्तर भारताला छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास माहिती करून देण्यासाठी या संग्रहालायाची निर्मिती करण्यात आली. हे अतिशय चांगले आणि कल्पकतेने बांधलेले संग्रहालय आहे. आत गेल्यावर आपण शिवकाळात हरवून जातो. १९८० मध्ये या संग्रहालयासाठी तत्कालिन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी जागा दिली होती. आता काळाच्या ओघात ही जागा कमी पडणे स्वाभाविक आहे. त्यामुळे संग्रहालयाच्या विस्तारासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याची ग्वाही नितीन गडकरी यांनी दिली. महत्त्वाचे म्हणजे, आपल्या नातवांना घेऊन हे संग्रहालय पाहण्यासाठी येण्याचे आश्वासनही गडकरी यांनी दिले.

●● ●●

### दोन दिग्गज नेत्यांची समोरासमोर भेट

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे एक दुसऱ्याचे कट्टर राजकीय प्रतिस्पर्धी मानले जातात. राहुल गांधी मोदी यांच्यावर तुटून पडायची आणि हल्ला चढविण्याची एकही संधी सोडत नाही. ज्यावेळी हे दोन्ही नेते लोकसभेत असतात, त्यावेळी सभागृहात एक अदृश्य स्वरूपाचा तणाव जाणवतो. मोदी यांच्यावर टीका करताना राहुल गांधी कोणत्याही प्रकारचा संयम आणि मर्यादा पाळत नाही. याउलट मोदी राहुल गांधी यांच्यावर टीका करताना सर्व संसदीय संकेत आणि मर्यादांचे पालन करतात. एकदा राहुल गांधी यानी सभागृहात आपल्या जागेवरून उठून सत्ताधारी बाजूला जात पंतप्रधान मोदी यांना आलिंगन दिले होते, पण तो नाटकीपणा होता. थोर समाजसुधारक महात्मा जोतिब फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त संसदभवनात त्यांच्या पुतळ्याला आदरांजली वाहण्यासाठी आयोजित कार्यक्रमात पंतप्रधान मोदी आणि राहुल गांधी समोरासमोर आले. मोदी यांनी हात जोडून हसतमुखाने राहुल गांधी यांना अभिवादन केले. राहुल गांधी यांनीही मोदी यांना नमस्कार केला. दोघांनी छायाचित्रही काढून घेतले. सभ्य, सुसंस्कृत आणि मर्यादा पाळणारा राजकारणी कसा असतो, हे मोदी यांनी आपल्या छोट्याशा कृतीतून दाखवून दिले. राहुल गांधीनी आपल्या प्रतिमेला न शोभणारे शालिन वर्तन केले, हा भाग वेगळा.

● **दिल्लीवाला**

## स्केचद्वारे आशाताईंना श्रध्दांजली

आपल्या चिरतरुण आवाजाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध करणाऱ्या सुप्रसिद्ध पार्श्वगायिका आशा भोसले यांच्या सुरेल स्मृतींना माझ्या संग्रहातील स्केचच्या माध्यमातून अनिल पाटील यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.



## थोडक्यात महत्त्वाचे...



### प्रकाश चौधरी यांचा राज्यस्तरीय उत्कृष्ट लेखापरीक्षक पुरस्काराने सन्मान

**धरणगाव** : श्रीक्षेत्र आळंदी येथे ऑडिटर्स कौन्सिल ॲण्ड वेल्फेअर असोसिएशनच्यावतीने प्रमाणित लेखापरीक्षक राज्यस्तरीय अधिवेशन व कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत कुऱ्हे पानाचे (ता.भुसावळ) येथील प्रमाणित लेखापरीक्षक प्रकाश प्रल्हाद चौधरी यांचा राज्यस्तरीय उत्कृष्ट लेखापरीक्षक पुरस्काराने गौरव करण्यात आला. २१ व २२ मार्च रोजी पार पडलेल्या या अधिवेशनात महाराष्ट्रातील ३२ जिल्ह्यांमधून शेकडो लेखापरीक्षक उपस्थित होते. पुरस्कार स्वीकारल्यानंतर प्रकाश चौधरी यांनी, या पुरस्कारामुळे मला भविष्यात आणखी जोमाने काम करण्याची प्रेरणा मिळेल, असे सांगितले.

### जळगाव जिल्ह्यात ४७ शाळांची मान्यता रद्द

जळगाव : कारभारात अनियमितता आणि कागदपत्रात हेराफेरी केल्या प्रकरणी जळगाव जिल्ह्यातील ४७ शाळांची मान्यता रद्द करण्यात आली आहे. या धडक कारवाईमुळे शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे. अनेक प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालय इत्यादी शैक्षणिक संस्थाना अनुदानापासुन कायमस्वरुपी अपात्र ठरविण्यात आले आहे.

शासनाच्या या कारवाईत जळगाव जिल्ह्यातील ४७ शाळा रडारवर आल्या आहेत. याशिवाय १५ तुकड्यांनाही अनुदानासाठी अपात्र करण्यात आले आहे. शालेय शिक्षण विभागाने ही कारवाई केली आहे. सखोल मूल्यांकन आणि ठरवलेल्या निकषांच्या आधारे ही कारवाई केल्याचे सुत्रांकडून सांगण्यात आले.

या कारवाईत जिल्ह्यातील २४ प्राथमिक शाळा, १७ माध्यमिक शाळा आणि सहा उच्च माध्यमिक शाळांचा समावेश आहे. उच्च माध्यमिक स्तरावरील एकूण १५ तुकड्यांनाही अपात्र ठरवण्यात आले आहे. विभागाने घालून दिलेले मार्गदर्शक तत्वांचे पालन तसेच निकषांची पूर्तता करणे शाळा महाविद्यालयांना बंधनकारक होते. मात्र त्यांच्याकडून पूर्तता न होवू शकल्याने ही कारवाई करण्यात आली.

### भरधाव ट्रॅक्टरची दुचाकीला धडक; दोघे मित्र गंभीर जखमी

**जळगाव** : समोरुन भरधाव वेगात ट्रॅक्टर आणत चालकाने दुचाकीला धडक दिली. दुचाकीस्वार दोघे मित्र रस्त्यावर पडुन गंभीर जखमी झाले. जळगाव ते विदगाव रस्त्यावर हा अपघात धामणगाव फाट्याजवळ गुरुवारी (९ एप्रिल) संध्याकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास झाला.कुंदन अजय गुजर (वय ३०,रा. शेंदुर्णी) तसेच त्याचा मित्र गोमा कुंभार असे जखमीची नावे आहेत. कुंदन गुजर हा त्याची दुचाकी (एमएच १३ ईटी ९२२१) चालवित होता. त्याच्यामागे मित्र गोमा कुंभार बसला होता. हे दोघे रस्त्याने जात असताना समोरुन ट्रॅक्टर (एमएच १९ सी ९२२१) वरील चालकाने दुचाकीला जोराने धडक दिली. यात दुचाकीवरील दोघे रस्त्यावर पडुन जखमी झाले. अपघात पाहिल्यानंतर जखमींना मदत करण्यासाठी चालक थांबण्याची अपेक्षा होती. मात्र ट्रॅक्टर घेऊन चालक घटनास्थळावरुन पसार झाला. प्रत्यक्षदर्शींनी घटनास्थळी येऊन जखमीना शासकीय रुग्णालयात उपचारार्थ हलविले. याप्रकरणी ट्रॅक्टर चालकावर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा शनिवारी दाखल करण्यात आला. पोलीस नाईक सोपान पाटील हे तपास करीत आहेत.

### भांडणातून बेदम मारहाण परस्पर तक्रारी : १२ जणांवर गुन्हा

**जळगाव** : लहान मुलांच्या मागील भांडणाच्या कारणावरुन तसेच दुचाकीचे चाक पायाला लागले अशा कारणावरुन वाद झाला. एकमेकांना शिवीगाळ करत मारहाण केली. ही घटना शुक्रवारी (१० एप्रिल) दुपारी आमोदा फाट्याजवळ घडली. याप्रकरणी परस्पर तक्रारीनुसार दोन्ही गटातील बारा जणांविरोधात तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. कैलास नारायण कोळी (वय ४१,रा. घार्डी ता.जळगाव) यांच्या तक्रारीनुसार त्यांच्यासह त्यांचा पुतण्या फाट्यावर असताना लहान मुलांच्या मागील भांडणावरुन संशयितांनी दोघांना शिवीगाळ करत दमदाटी केली. त्यानंतर काठ्यासह हाताबुक्क्यांनी मारहाण केली परेश पाटील, सोपान कोळी, समाधान कोळी, दर्शन कोळी, कमलाकर कोळी, सतिष कोळी (सर्व रा. रिधुर) यांच्या विरोधात तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. दुसऱ्या गटाचे समाधान सुधाकर पाटील (वय ३०,रा. रिधुर) यांच्या तक्रारीनुसार अमोल कोळी याच्या दुचाकीचे चाक पायाला लागले होते. शुक्रवारी दुपारी आमोदा फाट्याजवळ रस्त्यावर त्याचा जाब विचारला असता संशयिताने डोक्यात लाकडी दांडा मारला.त्यांच्या सोबतचे कमलाकर कोळी यानाही लाकडी दाडंयाने मारहाण केली. नशेत शिवीगाळ करत चापटाबुक्क्यांनी मारहाण केली. याप्रकरणी अमोल कोळी, संदीप कोळी, योगेश कोळी, रवि कोळी, कैलास कोळी तसेच ज्ञानेश्वर कोळी ( सर्व रा. घार्डी) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. उपनिरीक्षक श्यामकुमार मोरे हे गुन्ह्याचा तपास करीत आहेत.

### पिंपळगावसह परिसरातील अवैध धंद्यांवर पोलिसांकडून कारवाई

**पाचोरा** : तालुक्यातील पिंपळगाव (हरेश्वर) पोलीस स्टेशन हद्दीत राबविण्यात आलेल्या कोम्बिंग ऑपरेशनदरम्यान अवैध धंद्यांवर कारवाई करण्यात आली. सहाय्यक पोलीस निरीक्षक कल्याणी वर्मा यांच्या नेतृत्वाखाली विविध पथके तयार करुन अवैध धंद्यांवर छापेमारी करण्यात आली. कारवाईत सातगाव (डोंगरी) येथील सुपडू रहमान तडवी हा गावठी हातभट्टी दारू तयार करण्यासाठी लागणारे कच्चे रसायन बाळगताना तर म्हसास (ता.पाचोरा) येथे विक्रम सिताराम बोरसे व सुनंदाबाई नारायण भिल हे राहत्या घराच्या आडोशाला गावठी दारूची विक्री करताना आढळून आले. सांगवी गावात ग्रामपंचायतीच्या मागील बाजूला कौशल्याबाई मदन कोळी व मदन दगडू कोळी हे गावठी दारू विक्री करताना आढळून आले. या सर्व कारवायांमध्ये ५९ हजार ६०० रुपयांची १ हजार ६३६ लिटर गावठी दारू व कच्चे रसायन जप्त करण्यात आले या प्रकरणी चार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. कुऱ्हाड येथे बंद टपरीच्या आडोशाला ताडी विक्री करणाऱ्या प्रकाश शिवदास भिल याच्यासह एकास अटक करण्यात आली. त्यांच्या ताब्यातून १० लिटर ताडी जप्त करण्यात आली. तसेच सातगाव (डोंगरी) येथे शेतात सुरू असलेल्या 'झन्ना-मन्ना' जुगार अड्ड्यावर छापा टाकण्यात आला. यात दत्तू वाल्मिक मोकळे व नंदलाल बाजीराव पाटील यांना ताब्यात घेण्यात आले, तर काही जण घटनास्थळावरून पसार झाले. या ठिकाणी तब्बल २ लाख ६४ हजार ८०० रुपये रोख, मोटारसायकल, मोबाईल आणि ५२ पत्त्यांचा कॅट जप्त करण्यात आला आहे.

# अवैध गौणखनिज उत्खनन वाहतूक कारवाई

## ७२६ प्रकरणात साडेदहा कोटींपैकी पावणे आठ कोटींची वसुली
## ७ जेसीबींसह ६७४ वाहने जप्त, ६० गुन्ह्यांमध्ये १४ संशयितांना अटक



**तभा वृत्तसेवा**
**जळगाव,**

जिल्हा महसूल प्रशासनाने जळगाव जिल्ह्यात एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ दरम्यान अवैध गौण खनिज उत्खनन आणि वाहतूक प्रकरणी नियुक्त महसूल पथकांनी केलेल्या कारवाईत ७२६ प्रकरणे उघडकीस आली. जिल्हा प्रशासनाने या ७२६ प्रकरणात ७ जेसीबी यंत्रे, ६७४ ट्रक, डंपर, ट्रॅक्टर ट्रॉलींसह अन्य साहित्य जप्त केले. यात अवैध गौण खजिन वाहतूक करणाऱ्यांवर १० कोटी ६२ लाख ६९ हजार ७१४ रूपये दंडात्मक कारवाई केली. तर ६० गुन्ह्यांमध्ये १४ संशयितांना अटक देखील करण्यात आली असून यासंदर्भात विविध तहसील प्रशासनपातळीवर आतापर्यंत तब्बल सात कोटी ७७ लाख ७६ हजार ३९४ सरासरी ७५ टक्के रूपयांचा दंड शासन तिजोरीत जमा झाला असल्याची माहिती महसूल प्रशासनाने दिली.

जिल्ह्यात २०२५-२६ अंतर्गत एप्रिलमध्ये २३ वाळू गटांसाठी ई ऑक्शन लिलाव प्रक्रीया अंमलबजावणी करण्यात आली होती. परंतु एप्रिल दरम्यान एकाही वाळू ठेकेदाराने यात प्रतिसाद दिलेला नसल्याने मान्सूननंतर ऑक्टोबर २०२५ दरम्यान १४ वाळू गटांसाठी ई ऑक्शन प्रक्रिया राबविण्यात आली.

**जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्देश सूचनांनुसार कारवाई मोहीम**

दरम्यान, ७ वाळू गटांचा लिलाव होवून त्याव्दारे दोन कोटी ४० लाख ७४हजार ६७१ रूपयांचा महसूल प्रशासन तिजोरीत जमा झाला. तसेच अन्य वाळू गट शासकिय कामांसह घरकुल बांधकामासाठी खुले करण्यात आले होते. मात्र दुसरीकडे सात वाळू गटांव्यतिरिक्त अन्यत्र कोणत्याही वाळू गटातून लिलाव झालेले नसताना अवैध वाळू वाहतूक होत असल्याचे निदर्शनास आले होते. त्यानुसार तत्कालीन जिल्हाधिकारी आयुष प्रसाद तसेच विद्यमान जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या निर्देशानुसार तहसील



> अवैध गौण खनिज उत्खनन आणि वाहतूक रोखण्यासाठी महसूल अधिकारी, उपप्रादेशीक परिवहन तसेच पोलीस प्रशासन अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक वेळोवेळी घेण्यात आल्या आहेत. त्यात उचीत नियमांसह विविध कलमांनुसार कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. नागरिकांनी वाळू उत्खनाची अधीकृत माहिती घेवून बेकायदेशीर वाळू उत्खनन टाळावे. नाशिक विभागात २०२५-२६ दरम्यान अवैध वाळू वाहतूक कारवाईअंतर्गत सर्वात जास्त सरासरी ७५ टक्के दंडात्मक रकमेचा भरणा जळगाव जिल्हा प्रशासनाला मिळाला आहे.
> **- रोहन घुगे (जिल्हाधिकारी, जळगाव)**

तसेच उपविभागीय दंडाधिकारी प्रशासन पातळीवरून धडक मोहिम राबवित २०२५-२६ अंतर्गत आतापर्यंत तब्बल ७२६ अवैध गौण खनिज उत्खनन आणि वाहतूक प्रकरणी करवाई करण्यात आली.

**दहा कोटी ६२ लाखांचा दंड**

जिल्हा प्रशासनाच्या गौण खनिज विभागांतर्गत विविध तालुकापातळीवर अवैधरित्या वाळू उत्खनन व

वाहतूक करणारे ट्रक, ट्रॅक्टर ट्रॉलीसह ७ जेसीबी यंत्रे आणि ६७४ वाहने जप्त करण्यात आली. गौण खनिज वाहतूक उत्खननसंदर्भात ७२६ प्रकरणात ६८ गुन्हे नोंदविण्यात आले असून कारवाईपोटी तब्बल १० कोटी ६२ लाख ६९ हजार ७१४ रूपयांचा दंड आकारणी करण्यात आली आहे.

**मार्चअखेर पावणे आठ कोटीहून अधिक दंड रकमेचा भरणा**

मार्च २०२६ अखेर सात कोटी ७७ लाख ७६ हजार ३९४ रुपये महसूल प्रशासनाच्या तिजोरीत जमा झाले आहेत. तर अवैध गौण खनिज वाहतूकदारांकडून २ कोटी ८४ लाख ५५ हजार ७३३ रूपये दंडात्मक रकम येणे बाकी असून ५३५ गुन्ह्यांमध्ये बंधपत्र बॉण्ड घेण्यात आले आहेत. आणि १८४ प्रकरणांचे बंधपत्र घेणे शिल्लक असल्याचे म्हटले आहे.

**सरासरी ७५ टक्के दंड वसूल**

२०२४-२५ च्या मानाने यावर्षीच्या कारवाईत तीन कोटींनी दंडात्मक वाढ झाली असून तब्बल १० कोटी ६२ लाख ६९ हजार ७१४ रुपयांपैकी तब्बल पावणे आठकोटींहून अधिक रक्कम अर्थात सरासरी ७३.१८ टक्के महसूल जिल्हा प्रशासन तिजोरीत जमा झाला आहे.

**गतवर्षी ६५८ वाहनांवर आठ कोटींची कारवाई; १० हल्ल्यांची नोंद**

२०२४-२५ या आर्थिक वर्षात अवैध गौण खनिज वाहतूक करणारे ट्रॅक्टर, हायवा, डंपर, जेसीबी तसेच दुचाकी अशा ६५८ पैकी ४३१ वाहनांवर दंड व बंधपत्रे घेत सुमारे आठ कोटी ८० लाख आठ हजार ५१५ रुपयांची दंडात्मक कारवाई झाली. यात मार्च २०२५ पूर्वी पाच कोटी ५२ लाख ६११ रुपये दंड वसूल झाला होवून, तीन कोटी २८ लाख सात हजार ९०४ रुपये प्रलंबित होती.

**शासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांवर दोन वर्षात अठरा हल्ले**

२०२४-२५ दरम्यान अवैध गौण खनिज वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध विविध प्रकारचे ४३ गुन्हे दाखल होते तर, १९ संशयितांना अटक करण्यात आली होती. अवैध गौण खनिज वाहतूक रोखण्यावेळी १० शासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांवर हल्ले झाले होते. यासंदर्भात संशयितांवर ६० गुन्हे दाखल करण्यात आले असून यातील १४ संशयीतांना अटक करण्यात आल्याची जिल्हा प्रशासनाकडे नोंद आहे. तर मार्च २०२६ दरम्यान भडगाव, अमळनेर, जळगाव आणि चोपडा आदी ठिकाणी अधिकारी कर्मचाऱ्यांवर ८ हल्ले करण्यात झाले आहेत.

| तालुका | कारवाई | दंड | वसूल दंड | जप्त वाहने | दाखल गुन्हे | अटक | हल्ले |
|---|---|---|---|---|---|---|---|
| जळगाव | १३८ | १७५१०२८० | १०५५०१२५ | १३६ | ११ | ११ | २ |
| जामनेर | १६ | ४०९२८५० | ३२५१२५० | १६ | ० | ० | ० |
| भुसावळ | ३५ | ८०३६६४६ | ५८०६६६८ | ३५ | २ | ० | ० |
| बोदवड | ३ | ६४७१९० | ५१७९३० | ० | ० | ० | ० |
| मुक्ताईनगर | ३६ | ७२१०२५२ | ५८११७९२ | ३० | ३ | ० | ० |
| यावल | ३६ | ७६५०५२८ | ५५२८२८८ | ३६ | ० | ० | ० |
| रावेर | २६ | ३९३४७३७ | ३०८५६७६ | २६ | ० | ० | ० |
| अमळनेर | ६३ | ६३४७९९४ | ५७४८०४२ | ६४ | २ | ० | १ |
| चोपडा | ३७ | ६१७८५३० | ५२११२८५ | २९ | ६ | २ | २ |
| एरंडोल | ५५ | ९२९५८४३ | ४८३१८५५ | १८ | २२ | ० | ० |
| धरणगाव | ३१ | ३९६७८६५ | ३६३९६९० | ३१ | ८ | ० | ० |
| पारोळा | ८ | १०९०५३० | १०९०५३० | ८ | १ | ० | ० |
| पाचोरा | ६९ | १०३४८१८५ | ७०४१८८० | ६९ | ० | ० | ० |
| भडगाव | ८८ | १४१७०८२६ | ११८७३६३८ | ८८ | ० | १ | ३ |
| चाळीसगाव | ८७ | ६१३५१३८ | ४१३५४२५ | ८७ | ० | ० | ० |
| एकूण | ७२६ | १०६२६९७१४ | ७७७७६३९४ | ६७४ | ६० | १४ | ८ |

### अवैध वाळू वाहतुकीत जळगाव, भडगाव अव्वल

अवैध वाळू गौण खनिज वाहतुकीत जळगाव तालुका अव्वल असून, त्याखालोखाल भडगाव, चाळीसगाव, पाचोरा आणि अमळनेर, एरंडोल, चोपडा असा उतरता क्रम असून याच तालुक्यात अधिकारी कर्मचाऱ्यांवर हल्ले झालेले आहेत.

# वानेगाव-निंभोरी परिसरात मधमाशांच्या हल्ल्यात १८ ते २० शेतमजूर जखमी

**पाचोरा** : तालुक्यातील वाणेगाव-निंभोरी परिसरात सकाळी ८ वाजेच्या सुमारास शेतात मजुरीचे काम सुरू असताना अचानक मधमाशांच्या पोळ्याने भीषण हल्ला चढविला. या घटनेत शेतात काम करणाऱ्या महिला व पुरुष मजुरांपैकी तब्बल १८ ते २० शेतमजूर जण जखमी झाल्याची घटना घडली आहे.

घटनेनंतर स्थानिक नागरिकांच्या मदतीने सर्व जखमी शेतमजुरांना तात्काळ पाचोरा ग्रामीण रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.ग्रामीण रुग्णालयातील डॉ. अमित साळुंखे व त्यांच्या संपूर्ण आरोग्य कर्मचारी वर्गाने तातडीने सहकार्य करत जखमींवर उपचार सुरू करण्यात आले आहेत.

दरम्यान, भारतीय जनता पार्टीचे अमोल शिंदे यांना घटनेची माहिती



मिळताच त्यांनी तात्काळ शहराध्यक्ष दीपक माने यांना घटनास्थळी व रुग्णालयात जाऊन परिस्थितीची पाहणी करण्याचे निर्देश दिले.

शहराध्यक्ष दीपक माने यांनी तातडीने रुग्णालयात धाव घेऊन जखमी मजुरांची विचारपूस केली. तसेच सर्व जखमींची योग्य ती काळजी घेतली जाईल व आवश्यक ती मदत मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.

या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



# महाराजस्व शिबिरात ४७० लाभार्थ्यांना विविध लाभांचे वितरण

**पाचोरा, १२ एप्रिल**

तालुक्यातील पुनगाव ग्रामपंचायतीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरात सर्व विभागांचे मिळून ४७० लाभार्थ्यांना विविध लाभांचे वितरत करण्यात आले.

शिबिराचे उद्घाटन तहसिलदार विजय बनसोडे, न.पा. गटनेते सुमित पाटील यांच्याहस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांनी मनोगत व्यक्त करतांना, छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या स्वराज्यात प्रजेच्या अडचणी त्वरित सोडवण्याची परंपरा निर्माण केली. त्याच विचारातून शासनाने नागरिकांच्या समस्या स्थानिक पातळीवर सोडवण्यासाठी हा अभिनव उपक्रम सुरु केल्याचे सांगितले. यावेळी पुनगावच्या सरपंच सुनिता पाटील, विकासो चेअरमन प्रल्हाद पाटील, माजी सरपंच प्रल्हाद गुजर, उपसरपंच अनिल पाटील आदी उपस्थित होते.

शिबिरात महसूल, ग्रामपंचायत, कृषी, सामाजिक न्याय, आरोग्य, पाणीपुरवठा, एस.टी. महामंडळ तसेच इतर विविध शासकीय विभागांशी संबंधित तक्रारी व अर्ज स्वीकारुन त्यांचे तत्काळ निराकरण करण्यात आले. यावेळी संजय गांधी योजना, कृषी विभाग अंतर्गत विविध शेती उपयोगी अवजारे, पुरवठा विभागाकडून ई-शिधापत्रिका, एस.टी. महामंडळाच्या कार्डची नोंदणी, वारस दाखला, ७/१२, दुरुस्त सातबारे, उत्पन्न दाखले, घरकुल लाभार्थी यांना प्रमाणपत्रासह इतर विभागांच्या लाभांचे वितरण तहसिलदार विजय बनसोडे, तालुका कृषी अधिकारी सुधाकर कराड, सुमित पाटील यांच्याहस्ते करण्यात आले.

प्रास्तविक मंडळ अधिकारी सुधाकर पाटील यांनी तर सूत्रसंचालन चिंतामण पाटील यांनी केले.

# शेतमाल निर्यातीसाठी जळगावातून कार्गो विमान सेवा!

## भाजपा कार्यकर्ता जनसंवाद मेळाव्यात खा.स्मिता वाघ यांची माहिती

**तभा वृत्तसेवा**
**नगरदेवळा, १२ एप्रिल**

सरकारकडून शेतकरी हिताला प्राधान्य देण्यात येत आहे. शेतकरी सुखी कसा राहील, यासाठी सातत्याने प्रयत्न सुरु आहेत. शेतीम ालाच्या निर्यातीसाठी जळगावमधून कार्गो विमान सेवा सुरू करण्याचे प्रयत्न सुरू असून यामुळे स्थानिक शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला योग्य बाजारपेठ मिळण्यास मदत होणार असल्याचे प्रतिपादन खा.स्मिता वाघ यांनी केले.

नगरदेवळा-बाळद गटात भारतीय जनता पक्षाच्यावतीने कार्यकर्ता जनसंवाद मेळाव्याचे



आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानावरुन त्या बोलत होत्या. यावेळी माजी आ.दिलीप वाघ, वैशाली सुर्यवंशी, प्रणय भांडारकर, नामदेव पाटील, भाजपा तालुकाध्यक्ष गोविंद शैलार आदी उपस्थित होते.

पुढे बोलतांना खा.वाघ यांनी, नगरदेवळा रेल्वे स्टेशनवर एक्सप्रेस गाड्यांना थांबा मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले. विविध विकासकामांसाठी उपलब्ध होणाऱ्या निधी योजनांबाबत तसेच आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूम ीवर भाजपाची मोर्चेबांधणी कशी असेल, याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी माजी आमदार दिलीप वाघ, वैशाली सूर्यवंशी यांनीही मनोगत व्यक्त केले. मेळाव्यात नगरदेवळा-बाळद गटातील अनेक कार्यकर्त्यांनी भाजपामध्ये प्रवेश केला. प्रास्तविक भाजपा तालुकाध्यक्ष गोविंद पाटील यांनी केले तर आभार प्रणय भांडारकर यांनी मानले.

# भारतीय ग्राहक पंचायतच्यावतीने उपअधीक्षक स्मिता गावित यांचा सत्कार

**अमळनेर, १२ वृत्तसेवा**

येथील सिटी सर्वे कार्यालयातील भूमी अभिलेख उपअधीक्षक स्मिता गावित यांचा अखिल भारतीय ग्राहक पंचायतच्यावतीने पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी सुहास अहिरे यांनी, भूमी अभिलेखन व्यवस्थेचा इतिहास व महत्त्व याविषयी माहिती दिली. भारतात ब्रिटिशकालापासून जमीन नोंदणीची अचूक व शिस्तबद्ध पद्धत अस्तित्वात असून कर वसुलीसाठी जमीन मोजणीची प्रक्रिया राबविण्यात आली होती. त्या काळात साखळदंडाच्या सहाय्याने मोजमाप केले जात असे, जे अत्यंत कठीण व धोकादायक होते. या प्रक्रियेदरम्यान काही



कर्मचाऱ्यांनी आपले प्राणही गमावले होते, तरीही त्या काळातील नोंदी आजही विश्वासार्ह ठरत असल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रसंगी ग्राहक पंचायतच्या तालुका उपाध्यक्षा ज्योती भावसार, जिल्हा उपाध्यक्ष सतीश देशमुख, जिल्हा सहसचिव मकसूद बोहरी, जिल्हा ग्राहक संरक्षण समिती सदस्य नरेंद्र पाटील, जिल्हा बँकिंग व सायबर प्रमुख विजय शुक्ला, जिल्हा ऊर्जा समिती प्रमुख सुनील वाघ, मेहराज बोहरी उपस्थित होते.



# एरंडोल येथे महात्मा फुले जयंती उत्साहात साजरी

**एरंडोल** : येथे क्रांतीसुर्य महात्मा फुले यांची १९९ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या पुतळ्यास माल्यार्पण करण्यात आले. त्यानंतर शहरातून भव्य मोटरसायकल रॅली काढण्यात आली. रॅलीदरम्यान शहरातील महापुरुषांच्या पुतळ्यांना माल्यार्पण करण्यात आले. यावेळी जय ज्योती, जय क्रांतीच्या घोषणांनी शहर दणाणले होते. महात्मा फुले युवा क्रांती मंचच्यावतीने महात्मा फुले चौकात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यात ६५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यात उपनगराध्यक्ष सुनीता माळी, नगरसेविका आरती महाजन यांनी देखील सहभाग घेतला.

कार्यक्रमास नगराध्यक्ष डॉ.नरेंद्र ठाकूर, माजी नगराध्यक्ष देविदास महाजन, किशोर निंबाळकर, राजेंद्र चौधरी, दशरथ महाजन, शोभा महाजन, उपनगराध्यक्ष सुनीता माळी, नगरसेविका आरती महाजन, नगरसेवक प्रा.मनोज पाटील, अनिल महाजन, मयूर महाजन, रवींद्र महाजन, योगेश महाजन, माजी नगरसेवक रुपेश माळी, यशवंतराव चव्हाण शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अमित पाटील, सावता माळी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष विजय महाजन, बाजार समितीचे माजी सभापती शालिग्राम गायकवाड, निवृत्त तहसीलदार अरुण माळी, युवासेनेचे माजी जिल्हा समन्वयक अतुल महाजन, माजी उपनगराध्यक्ष कुणाल महाजन, संजय महाजन, विकास संस्थेचे माजी अध्यक्ष दुर्गादास महाजन, शिवसेनेचे जगदीश पाटील, युवा क्रांती मंचचे माजी अध्यक्ष कैलास महाजन, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष ईश्वर बिऱ्हाडे, प्रमोद महाजन, आनंदा चौधरी, राजेंद्र महाजन, गजानन महाजन, प्रल्हाद महाजन, आय.जी.माळी, अरुण महाजन, पी.जी. चौधरी आदी मान्यवर उपस्थित होते.

सायंकाळी महात्मा फुले चौकापासून सवाद्य मिरवणुकीचे आयोजन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यशस्वीतेसाठी युवा क्रांती मंचचे अध्यक्ष अध्यक्ष राहुल माळी, उपाध्यक्ष सागर पाटील, सचिव भावेश महाजन, गणेश महाजन, सचिन माळी, समाधान महाजन, कमलेश महाजन, नितीन महाजन यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.




## महत्त्वाचे

### प्राण्यांची निर्दयतेने वाहतूक पोलिसांनी केली सुटका

**जळगाव** : दोन पाळीव बैल निर्दयतेने वाहनात कोंबुन वाहतूक केली जात होती. पोलिसांनी वाहन थांबवून चौकशी केली असता प्रकार उघडकीस आला.गुरुवारी (९ एप्रिल) दुपारी ही कारवाई चोपडा अडावद रस्त्यावर मंगरुळ फाट्याजवळ केली. दोन लाख किमतीचे वाहन (एमएच १९ सीएक्स २७०१) तसेच दोन बैल किमत ३० हजार असा मुद्देमाल हस्तगत केला. दीपक मांगिलाल चव्हाण (रा. रामपुरा), विकास अशोक बारेला ( कृष्णापुर), तौफिक साजिद कुरेशी (चोपडा) तसेच अज्ञात एक अशा चौघांवर याप्रकरणी अडावद पोलीस ठाण्यात प्राणी अधिनियमनुसार गुन्हा दाखल करण्यात आला.हवालदार मधुकर पवार हे तपास करीत आहेत.

### हल्लाप्रकरणी नऊ जणांवर गुन्हा

**जळगाव** : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्षपद का दिले नाही, याकारणावरुन संशयितांनी शिवीगाळ करत दमदाटी केली दगड मारुन जखमी केले. तसेच कारच्या काचा फोडल्या होत्या. यात सामाजिक कार्यकर्ते मुकुंद सपकाळे हे जखमी झाले होते. याप्रकरणी तक्रारीनुसार विशाल राजु अहिरे, (रामेश्वर कॉलनी) पराग लोहार तसेच अन्य पाच ते सात जणांविरोधात जिल्हापेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस उपनिरीक्षक शांताराम देशमुख हे तपास करीत आहेत.

### घराबाहेर पडलेला तरुण बेपत्ता

**जळगाव** : मोबाईल दुरुस्त करण्यासाठी जावुन येतो,असे कुटुंबियांना सांगुन घराबाहेर पडलेला २३ वर्षीय तरुण बेपत्ता झाला. शुक्रवारी (१० एप्रिल) सकाळी साडेदहा वाजेच्या सुमारास ही घटना एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गावात घडली. कुटुंबियांनी सर्वत्र शोध घेतला असता तपास लागला नाही. याप्रकरणी तक्रारीनुसार शनिवारी एमआयडीसी पोलीस ठाण्यात मिसिंग दाखल करण्यात आली. हवालदार समाधान टहाकळे तपास करीत आहेत.

### महिलेच्या गळ्यातील सोन्याची पोत लंपास

**जळगाव** : आठवडे बाजारातील गर्दीचा फायदा घेत भामट्याने हातचलाखी करत महिलेच्या गळ्यातील सुमारे ८३ हजार किमतीची सोन्याची पोत चोरत पोबारा केला. शनिवारी (११ एप्रिल) संध्याकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास ही घटना शहरातील कासमवाडी येथील आठवडे बाजारात घडली. बाली भरतसिंग राजपूत (वय ६२,रा. विद्युत कॉलनी) या गृहिणी बाजार करण्यासाठी कासमवाडी आठवडे बाजारात आल्या होत्या. हातचलाखीने त्याने महिलेच्या गळ्यातील २३.८९ ग्रॅम वजनाची सुमारे ८३ हजार २९५ रुपये किमतीची सोन्याची पोत काढुन घेत पसार झाला. प्रकार लक्षात आल्यानंतर महिलेने शोध घेतला असता पोतचा तपास लागला नाही. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. हवालदार समाधान टहाकळे तपास करीत आहेत.

### अपघातात पाच जण जखमी

**जळगाव** : वेगवेगळ्या घटनेत रविवारी (१२ एप्रिल) पाच जण जखमी झाले. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात जखमीना हलविण्यात आले. साक्षी समाधान पाटील (वय १५,रा. पळसोद), ललीत मधुकर महाजन (वय २३,रा. वाघनगर), गौरव प्रवीण वाणी (वय ३५,रा. पिंप्राळा), भिकन कौतीक कोळी(वय ३९,रा.वेळोदा) तसेच आनंदा दगडु सपकाळे (वय ४५,रा. कानळदा) यांचा जखमींमध्ये समावेश आहे.




गरजूंसाठी शवपेटी उपलब्ध

संपर्क - (०२५७) २२३६१६६, २२२३६९९



अंकासाठी संपर्क

'तरुण भारत' अंकासंदर्भात काही सूचना, तक्रारी किंवा काही अडचण असल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

मो.९०२३३४५५५० ९६२३६०४७१२


# शिरसोली रस्त्यावरील अतिक्रमणाबाबत महापौरांची ना. उईकेंशी चर्चा

## महापालिकेची मांडली बाजू; अतिक्रमण निघणारच

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १२ एप्रिल**

महापालिकेच्या मालकिच्या जागेवर झालेले अतिक्रमण हटविण्यासंदर्भात महापौर दीपमाला काळे यांनी आदिवासी विकास मंत्री ना. अशोक उईके यांची भेट घेत चर्चा केली. दरम्यान मोहाडी गट नं. ६० वरील अनाधिकृत अतिक्रमण हटविण्यात येणार असल्याचे संकेत प्राप्त झाले आहे.



शिरसोली रस्त्यावरील मोहाडी गट नं. ६० ही १३ एकर जागा महापालिकेच्या मालकिची आहे. मनपा मालकिची जागा परस्पर विकून त्याठिकाणी अतिक्रमण वाढविण्यात आले आहे. याबाबत महापौर दीपमाला काळे यांनी पत्रकार परिषद घेत अतिक्रमण काढण्याविषयी स्पष्ट भूमिका मांडली होती. दरम्यान शनिवारी ना. अशोक उईके हे जळगाव दौऱ्यावर होते. या दौऱ्यात शिरसोली रस्त्यावरील अतिक्रमणधारकांनी त्यांची भेट घेत निवेदन दिले होते. या निवेदनानुसार अतिक्रमणधारकांना नियमित करण्याची मागणी करण्यात आली.

**महापौरांनी मांडली महापालिकेची बाजू**

ना. अशोक उईके यांची महापौर दीपमाला काळे यांनी भेट घेतली. यावेळी नगरसेविका ॲड. शुचिता हाडा, माजी नगरसेवक मनोज काळे, अतुलसिंह हाडा उपस्थित होते. या भेटीत महापौरांनी महापालिकेच्या अतिक्रमित जागेसंदर्भात कागदपत्र दाखवित बाजू मांडली. तसेच शासनाच्या निर्णयांबाबतही याठिकाणी चर्चा करण्यात आली. मंत्री अशोक उईके यांनी माहिती जाणून घेतल्यानंतर नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्याबाबतच सूचित केले आहे. त्यामुळे मोहाडी गट नं. ६० वरील अतिक्रमण काढण्याचे संकेत प्राप्त झाले आहे.

# महावितरणचे रोहित्राला अचानक आग

## परिसरात घबराट; तत्परतेने टळला अनर्थ

**जळगाव,१२ एप्रिल** : महावितरण विद्युतच्या विज सप्लाय रोहित्र आग लागुन पेटले. प्रत्यक्षदर्शीनी तत्काळ खबर दिल्याने मनपा अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी पाण्याचा फवारा मारुन ही आग विझविली. त्यामुळे अनर्थ टळला. एमआयडीसीतील अजिंठा चौफुलीजवळ आयोध्यानगर परिसरात ही घटना रविवारी (१२ एप्रिल) सकाळी पावणे नऊ वाजेच्या सुमारास घडली.



शहरात वीज पुरवठा करण्यासाठी या परिसरात रोहित्र कार्यान्वित आहे. अचानक त्याला आग लागल्याने मोठा भडका झाला. ही माहिती प्राप्त होताच अग्नीशमन दलाचा बंब घेऊन रवाना झालेल्या कर्मचाऱ्यांनी रोहित्रावर पाण्याचा फवारा मारुन ही आग विझविली.घटनास्थळी पोहोचलेल्या अग्निशमन दलाच्या पथकाने प्रसंगावधान राखत आगीवर नियंत्रण मिळवले. वाहन चालक प्रकाश चव्हाण, प्रदीप धनगर, संजय तायडे यांच्यासह फायरमन कर्मचाऱ्यांनी शर्थीचे प्रयत्न करत आग विझवली.

या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही मात्र रोहित्राचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती प्राप्त झाली. आग लागण्याचे नेमके कारण समजुन आले नाही. महावितरणच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी जावुन घटना जाणुन घेतली. घटनेची माहिती एमआयडीसी पोलिसांना देण्यात आली.

**शॉर्टसर्किटने आग**

शॉर्टसर्किट झाल्यानंतर घरात ठिणगी पडल्याने आग लागली. खोटेनगर परिसरातील विठ्ठलवाडीमध्ये ही घटना रविवारी दुपारी दोन वाजेच्या सुमारास घडली. गोपाळ जगन्नाथ भक्त यांच्या घरातील इलेक्ट्रीक वस्तु, फ्रीज तसेच वायरिंग जळाल्याने नुकसान झाले. खबर प्राप्त होताच अग्नीशमन दलाच्या कर्मचारी बंब घेऊन रवाना झाले. पाण्याचा फवारा मारुन ही आग विझविण्यात आली.

मुख्य अग्निशमन अधिकारी अश्वजीत घरडे, चालक प्रकाश चव्हाण, प्रकाश कुमावत फायरमन तेजस जोशी, संजय तायडे, भूषण पाटील या कर्मचाऱ्यांनी आग विझविली.



# आशाताईंच्या सुरांमध्ये निसर्गाची कोमलता

## जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन यांच्याकडू आठवणींचा उजाळा

**जळगाव** : भारतीय संगीताच्या आकाशातील अजरामर स्वरकन्या आशा भोसले यांच्या निधनाची बातमी मनाला चटका लावून गेली. त्यांच्या सुरांनी अनेक पिढ्यांचे आयुष्य समृद्ध केले, तर त्यांच्या गाण्यांमध्ये निसर्गाची कोमलता, मातीचा सुगंध आणि जीवनातील ओलावा कायम जाणवत राहिला अशा शब्दात जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन यांनी आशाताई भोसले यांच्या आठवणींना उजाळा दिला.

जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन यांनी पुढे सांगितले की, कविवर्य ना. धों. महानोर यांच्या काव्यातील मातीशी असलेली नाळ जशी जिवंत आहे, तशीच ती आशाताईंच्या स्वरांतूनही अनुभवायला मिळाली. त्यांच्या काही गाण्यांतून शेती, निसर्ग आणि मातीतल्या भावविश्वाचा सुगंध दरवळत राहिला, जणू काळजाशी जपलेली आपल्या भूमीची ओळखच. श्रद्धेय भवरलाल जैन यांच्या कार्यातून जसे जल, जमीन आणि शेतकऱ्यांशी नाते जपले गेले, तसेच आशाताईंच्या सुरांतूनही जीवनाशी असलेले नाते अधिक दृढ झाले. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या पहिल्या पदवी प्रदान सोहळा ७ सप्टेंबर १९९३ ला झाला होता. त्यावेळी आशाताई भोसले व ज्येष्ठ साहित्यीक भालचंद्र नेमाडे यांना डिलीट पदवी प्रदान करण्यात आले होते. त्यावेळी जैन हिल्स येथे त्यांच्या भेटीचा तो प्रसंग आजही मनात ताजा आहे, साधेपणाने, प्रेमाने आणि आत्मीयतेने झालेला संवाद आजही स्मरणात कोरलेला आहे. त्यांच्या सुरांनी निसर्गाला आवाज दिला, मातीला अर्थ दिला आणि मनाला शांती दिली. अशी स्वरसम्राज्ञी आता आपल्यात नसली तरी त्यांचे गीतरूपी अस्तित्व सदैव जिवंत राहील असेही अशोक जैन यांनी सांगितले.

# मुख्य रस्त्यांवर व्हाईट पट्ट्यांसह पिवळ्या पट्ट्यांच्या कामाला सुरुवात

## महापौर दीपमाला काळे यांच्या पुढाकाराने शहराच्या सुशोभीकरणाला वेग

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १२ एप्रिल**

जळगाव शहराला शिस्तबद्ध आणि सुंदर स्वरूप देण्यासाठी महापौर दीपमाला काळे यांनी सुरू केलेल्या विशेष मोहिमेला आता यश येताना दिसत आहे. महापौर आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यातील प्रभावी समन्वयामुळे शहरात रस्ते विभाजक आणि मार्गांवर पांढरे व पिवळे पट्टे (झेब्रा क्रॉसिंग व लेन मार्किंग) टाकण्याच्या कामाला रविवार, १२ एप्रिल रोजी रात्री ९ वाजेपासून प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली आहे.



रविवारी रात्री उशिरा सुरू झालेल्या या कामात पहिल्या टप्प्यात शिवतीर्थ चौक ते आकाशवाणी चौक या मुख्य मार्गावर पांढरे पट्टे टाकण्याचे काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आले आहे. रात्रीच्या वेळी वाहतूक कमी असताना हे काम करण्यात आल्याने कामाचा वेग वाढला असून, सोमवारी सकाळी या मार्गाचे रूप पालटल्याचे पाहायला मिळाले. यावेळी महापौर दीपमाला काळे, उपमहापौर मनोज चौधरी, स्थायी समिती सभापती डॉ. चंद्रशेखर पाटील यांनी रात्री प्रत्यक्ष कामाची पाहणी केली. संबंधित कंत्राटदार आणि कर्मचाऱ्यांशी चर्चा करून कामाविषयी सूचना केल्या.

**वाहतुकीला लागणार शिस्त**

शहरातील वाढती वाहतूक आणि अपघातांचे प्रमाण लक्षात घेता, रस्ते मार्किंग असणे अत्यंत आवश्यक होते. गेल्या महिनाभरापासून महापौर दीपमाला काळे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे या कामासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. रस्त्यांवर पट्टे टाकल्यामुळे वाहनधारकांना आपल्या लेनचा अंदाज येईल, ज्यामुळे वाहतुकीला शिस्त लागेल आणि रस्ते अधिक सुरक्षित व सुंदर दिसण्यास मदत होणार आहे.

**जनमानसातून कौतुक**

शहराच्या सुशोभीकरणासाठी आणि नागरी सुविधेसाठी महापौरांनी घेतलेल्या या निर्णयाचे जळगावकरांकडून स्वागत होत आहे. प्रशासकीय कामांचा पाठपुरावा करून प्रत्यक्ष अंमलबजावणी करून घेतल्याबद्दल महापौरांचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे.

# महाराष्ट्र पोलीस दलात हेल्मेट सक्तीचे

## अंमलबजावणीचे एस.पी.ना निर्देश

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव,१२ एप्रिल**

महाराष्ट्र पोलीस दलातील सर्व कर्मचाऱ्यांना दुचाकी चालविताना हेल्मेट वापरणे सक्तीचे करण्यात आले आहे. या आदेशाची अंमलबजावणी त्वरीत करण्यात यावी, असे निर्देश अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) प्रवीण साळुंखे यांनी जारी केले आहेत.

**बैठकीत ठरला मुद्दा चिंतेचा**

राज्याचे पोलीस महासंचालक सदानंद दाते यांनी नागपूर येथे पोलीस प्रशासन आढावा बैठक घेतली होती. याबैठकीत मुंबई तसेच नागपूर वगळता राज्यातील अनेक जिल्हांमध्ये पोलीस कर्मचारी यांच्याकडून हेल्मेट वापरण्याचे प्रमाण असमाधानकारक आहे, हा विषय चिंतेचा मुद्दा ठरला होता. त्यानंतर हे आदेश महाराष्ट्र पोलिसांना तत्काळ जारी करण्यात आले.

कायद्याची अंमलबजावणी करणारे प्राथमिक घटक म्हणून पोलिसांनी स्वत: कृतीतून आदर्श घालून देणे आवश्यक आहे. या नियमांचे हेतुपुरस्कार उल्लंघन केल्यास ती बाब शिस्तभंगाची कारवाई म्हणून हाताळली जाईल,असा इशारा देण्यात आला आहे.

रस्ते सुरक्षा नियमांचे अल्लंघन करताना आढळणारे अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांना केवळ मोटार वाहन कायद्यांतर्गत आर्थिक दंडच भरावा लागणार नाही, तर त्यांच्या सेवा अभिलेखात गैरवर्तनाची औपचारिक नोंद केली जाईल,असा इशारा देण्यात आला आहे.

राज्य महामार्ग पोलिसांच्या आकडेवारीनुसार वाहतूक अपघातामध्ये होणाऱ्या एकूण मृत्यूपैकी ३५ ते ४० टक्के मृत्यू हे दुचाकी चालकांचे असतात. हेल्मेट परिधान केल्याने मृत्यूच्या अथवा गंभीर दुखापतीचा धोका लक्षणीयरीत्या कमी होतो. सर्व पोलीस आयुक्त तसेच पोलीस अधीक्षक यांनी या आदेशाची त्वरीत अंमलबजावणी करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.

राज्यात मुंबई तसेच नागपूर याठिकाणी हेल्मेट वापरण्याचे पोलिसांचे प्रमाण ८० टक्क्याहून अधिक आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यात हे प्रमाण २० टक्क्यापेक्षा कमी असल्याचे निदर्शनास आले आहे. त्याअनुषंगाने हेल्मेट सक्तीचे आदेश बजावण्यात आले आहेत.

# जावेद अहमद यांच्यासारखे जवान हे राष्ट्राची खरी शक्ती - पालकमंत्री

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १२ एप्रिल**

कठीण आणि जीवघेण्या परिस्थितीतही कर्तव्य पार पाडणे हीच खरी देशभक्ती असते. गोळीबारात गंभीर जखमी होऊनही जबाबदारी पूर्ण करणारे जावेद अहमद हे खरे वीर आहेत. त्यांच्या अदम्य साहसाची दखल घेत महाराष्ट्र शासनाने 'महाराष्ट्र गौरव पुरस्कार योजना' अंतर्गत रुपये ६० लाखांची आर्थिक मदत प्रदान केली. ही मदत म्हणजे त्यांच्या शौर्याला दिलेला सन्मान आणि कृतज्ञतेची भावना आहे. असे प्रतिपादन पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले.

पिलखोड (ता. चाळीसगाव) गावचे सुपुत्र व सीआरपीएफचे जवान जावेद अहमद यांच्या अदम्य शौर्याची दखल घेत शासनाने 'महाराष्ट्र गौरव पुरस्कार योजना' अंतर्गत रुपये ६० लाखांची आर्थिक मदत मंजूर केली. या मदतीचा धनादेश पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालय येथे समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला. जवानांच्या त्यागाचा सन्मान करणे ही आपली नैतिक जबाबदारी, असे जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी सांगितले.

सूत्रसंचालन सैनिकी विभागाचे कल्याण संघटक विश्वनाथ उगले यांनी केले. जिल्हा सैनिक अधिकारी निलेश पाटील यांनी प्रास्ताविक केले. सहाय्यक जिल्हा सैनिक अधिकारी संजय गायकवाड यांनी आभार मानले.याप्रसंगी जि. प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी करिश्मा नायर, जिल्हा सैनिक अधिकारी निलेश पाटील, सहाय्यक जिल्हा सैनिक अधिकारी संजय गायकवाड व कल्याण संघटक विश्वनाथ उगले यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बँक खात्याची माहिती घेत शेतकऱ्याची पावणे तीन लाखाहून अधिकची फसवणूक

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव,१२ एप्रिल**

जास्त नफ्याचे आमिष दाखवून विश्वास संपादन केला. त्यानंतर बँक खात्याची माहिती घेत शेतकऱ्याची तब्बल २ लाख ९२ हजार ३६३ रुपयांची संशयिताने फसवणूक केली. याप्रकरणी शनिवारी (११ एप्रिल) सुरज कुमार याच्यावर तालुका पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

३६ वर्षीय तक्रारदार शेतकरी जळगाव तालुक्यातील रहिवासी आहेत. १ जानेवारी ते ५ जानेवारी २०२६ या कालावधीत तक्रारदार यांच्या मोबाइल टेलिग्राम या सोशल मीडिया ॲपवर त्यांना लिंक आली. ती लिंक त्यांनी ओपन केली. रजिस्ट्रेशन केले.

त्यानंतर टेलिग्रामवरुन अज्ञात इसमाने शेतकऱ्याचा विश्वास संपादन केला. त्यांच्या बँक खात्याची माहिती घेऊन अधिक रक्कम मिळेल,असे आमिष दाखविले. तक्रारदार यांच्या टेलिग्रामवर प्राप्त झालेल्या युपीआय तसेच सुरज कुमार याचे नावे असलेले पंजाब ॲड सिंध बँक झील पटलाला यावर तक्रारदार यांच्या स्टेट बँक खात्यातून युपीआयव्दारे वेळोवेळी पैसे ट्रान्सफर केले.

एअरपाझ स्टार्ट ट्रॅव्हिलिंग नोव यावर तक्रारदार यांचे नाव तयार झालेल्या खात्यावर (वायलेट) मध्ये वाढीव रक्कम दाखविली. त्यानंतर संशयिताने २ लाख ९२ हजार ३६३ रुपयांची फसवणूक केली. हा प्रकार लक्षात आल्यानंतर शेतकऱ्याने पोलिसात कैफियत मांडली. याप्रकरणी सुरज कुमार संशयित बँक खाते तसेच इतर अज्ञात इसमाविरोधात तालुका पोलीस ठाण्यात शनिवारी गुन्हा दाखल करण्यात आला. हवालदार दीपक चौधरी हे तपास करीत आहेत.

**ही दक्षता नेहमी घ्या**

काहीच माहिती नसलेली आणि अनोळखी व्यक्तीने पाठविलेली लिंक कदापिही ओपण करु नये. आपली व्यक्तीगत माहिती, बँक खात्याचा क्रमांक कोणालाही देवु नये.अमिष अथवा फायद्याचे अनोळखीने सांगीतलेल्या गोष्टीवर कधीही विश्वास ठेऊ नये. कोणत्याही प्रकारचा धाक दाखवून कोणी दबाव टाकत असल्याचे लक्षात आल्यास घाबरु नये. सायबर पोलिसांकडे अथवा जवळच्या पोलीस ठाण्यात तक्रार त्वरीत द्यावी. यामुळे आर्थिक फसवणूक होण्यापासून बचाव करता येईल.

# आर. सी. बाफना ज्वेलर्सचे नवे पाऊल

## ग्राहकांना थेट आर्थिक फायद्याची पध्दत

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव,१२ एप्रिल**

ज्वेलरी व्यवसायात विश्वासार्हता, पारदर्शक व्यवहार आणि ग्राहककेंद्रित सेवा यासाठी प्रसिद्ध असलेल्या रतनलाल सी. बाफना ज्वेलर्स यांनी पुन्हा एकदा नवे पाऊल उचलत दागिन्यांच्या हिशोब प्रणालीत महत्त्वपूर्ण सुधारणा जाहीर केली आहे. ही केवळ मर्यादित कालावधीची योजना नसून, ग्राहकांना थेट आर्थिक फायदा मिळावा यासाठी तयार केलेली नवीन पद्धत आहे. १९७४ पासूनचा विश्वास आता नव्या स्वरुपात ग्राहकाना अधिक लाभदायक असा असणारा आहे.

या नव्या बदलानुसार, दागिन्यांच्या मजुरीच्या गणनेत मूलभूत स्तरावर बदल करण्यात आला असून, त्यामुळे ग्राहकांना थेट आणि लक्षणीय बचत होणार आहे. आर. सी. बाफना ज्वेलर्सच्या महाराष्ट्रातील सर्व शोरूममध्ये ही सुधारित प्रणाली लागू करण्यात आली असून,



ग्राहकांकडून याला सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.

**शुध्दतेची हमी, परतावा धोरण**

संस्थेची वाटचाल १९७४ पासून सुरू झाली असून, सुरुवातीपासूनच ग्राहकहिताला प्राधान्य देत विविध बदल करण्यात आले. प्रारंभीच स्वतःच्या ठिकाणी दागिन्यांचे उत्पादन सुरू करून गुणवत्ता नियंत्रणावर भर देण्यात आला. त्यानंतर १९८५ मध्ये शुद्धतेची हमी आणि परतावा धोरण लागू करून ग्राहकांचा विश्वास अधिक दृढ करण्यात आला. त्याच काळात प्रत्येक दागिन्यावर मणी, रत्न आणि मोत्यांचे अचूक वजन स्पष्टपणे नमूद करण्याची पारदर्शक पद्धत सुरू करण्यात आली.

> आमच्या संस्थेची स्थापना १९७४ मध्ये झाली. या प्रवासात आम्ही कधीही नफ्याला प्राधान्य दिले नाही, तर ग्राहकांच्या विश्वासाला दिले. आज ५२ वर्ष पूर्ण करताना, नफा वाढवण्याऐवजी तो कमी करून त्याचा थेट फायदा ग्राहकांना देण्याचा ऐतिहासिक निर्णय आम्ही घेतला आहे. हा बदल आमच्या ब्रँडची वेगळी ओळख निर्माण करणारा आहे.
>
> -सिध्दार्थ रतनलाल बाफना, संचालक

**पाच दशकाची वाटचाल**

२००० साली पारंपरिक कसोटीऐवजी अत्याधुनिक कॅरेटोमीटर यंत्रणा उपलब्ध करून देत ग्राहकांना वैज्ञानिक पद्धतीने सोन्याची शुद्धता तपासण्याची सुविधा देण्यात आली. पुढे २०१७ मध्ये शुद्धतेनुसार दर निश्चित करण्याची प्रणाली लागू करून ग्राहकांकडून केवळ योग्य मूल्यच आकारले जात असल्याची खात्री देण्यात आली.आज ५२ वर्षाचा टप्पा गाठताना,नफा मर्यादित ठेवत त्याचा थेट फायदा ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे,असे बाफना ज्वेलरीकडून सांगण्यात आले.



# रोटरी जळगाव इलाईटला प्रांतपालांची अधिकृत भेट

**जळगाव,१२ एप्रिल** : येथील रोटरी क्लब ऑफ जळगाव इलाईटला रोटरी डिस्ट्रिक्ट ३०३०चे प्रांतपाल ज्ञानेश्वर शेवाळे (नासिक) यांनी नुकतीच वार्षिक अधिकृत भेट दिली.

मायादेवी नगरातील रोटरी भवन मध्ये झालेल्या कार्यक्रमास प्रांतपालांसह सहाय्यक प्रांतपाल संजय गांधी, अध्यक्ष संदीप झंवर, प्रशासन सचिव हरगोविंद मणियार, प्रकल्प सचिव धर्मेंद्र भैय्या यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रांतपाल ज्ञानेश्वर शेवाळे यांनी या रोटरी वर्षात रोटरी जळगाव इलाईटने केलेल्या कार्याचे कौतुक करीत सदस्यांना मार्गदर्शन केले.

रक्तदान शिबिरातील उल्लेखनीय कार्याबद्दल रोटरी इलाईटचे सदस्य सुरेश मंत्री, ज्ञानदेव महाडिक , रवीकिरण कोमबडे यांचा प्रांतपालांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. मोक्षदा मुकेश गुरव या विद्यार्थिनीला प्रांतपालांच्या हस्ते प्रेरणादायी पुस्तके देण्यात आली. प्रांतपालांचा परिचय संजय गांधी यांनी तर डॉ. मुर्तुजा अमरेलीवाला यांनी आभार मानले.

पहिल्या सत्रात अध्यक्ष, सचिव, प्रेसिडेंट इलेक्ट, सेक्रेटरी इलेक्ट, सहप्रांतपाल आणि प्रांतपाल यांची बैठक झाली. दुसऱ्या सत्रातील क्लब असेंबली मध्ये सर्व कमिटी चेअरमन यांनी आपापल्या कार्याचा अहवाल प्रांतपालांना सादर केला. प्रांतपाल शेवाळे यांनी क्लबच्या कामकाजाविषयी समाधान व्यक्त केले.

## थोडक्यात महत्त्वाचे...



### महात्मा फुले- डॉ.बाबाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त विद्यापीठात समता दौडमधून दिला ऐक्य- समतेचा संदेश

**जळगाव**: समाज सुधारक महात्मा ज्योतिबा फुले आणि घटनाकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ येथे ११ ते १४ एप्रिल कालावधीत संयुक्त जयंती महोत्सवाचे भव्य आयोजन केले आहे. मुलांच्या वसतिगृहापासून प्रशासकीय इमारतीपर्यंत ही दौड उत्साहात पार पडली. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी तसेच फुले-आंबेडकर यांच्या विचारांचे महत्त्व पटवून देण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला.

या समता दौडीत विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी स्वतः सहभाग घेऊन विद्यार्थ्यांना प्रेरित केले. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष उंची लाभून विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळाली. यावेळी भाषा प्रशाळेचे संचालक प्रा. म. सु. पगारे, प्रा. किशोर पवार, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. चंद्रशेखर वाणी, अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे, प्रा. रामटेके, प्रा. अजय सुरवाडे, सहसमन्वयक राजू सोनवणे, अरुण सपकाळे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. 'संयुक्त जयंती महोत्सवा'च्या माध्यमातून विद्यापीठ परिसरात सामाजिक समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांचा प्रसार करण्यात येत असून, पुढील दिवसांत विविध शैक्षणिक, सांस्कृतिक आणि प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

# प्रत्येक प्रभागात नियुक्त होणार स्वच्छता दूत

## शहर सौंदर्यीकरणासाठी महापौरांचा पुढाकार

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १२ एप्रिल**

शहराचा स्वच्छता दर्जा सुधारण्यासाठी आणि नागरिक व महापालिका प्रशासन यांच्यात समन्वय साधण्यासाठी आता प्रत्येक प्रभागात स्वच्छता दूत नियुक्त केले जाणार आहेत. महापौर दीपमाला काळे यांनी महानगरपालिकेत आयोजित केलेल्या विविध सामाजिक संस्थांच्या बैठकीत हे नियोजन जाहीर केले. शहरातील स्वच्छतेविषयी काम करणाऱ्या विविध संघटनांचे प्रतिनिधी आणि नागरिक या बैठकीला उपस्थित होते. यावेळी महापौरांनी स्वच्छतेबाबतचे आगामी नियोजन मांडले.

प्रभागातील स्वच्छता अबाधित राखण्यासाठी स्वच्छता दूत दुवा म्हणून काम करतील. स्थानिक नगरसेवकांना या मोहिमेत जोडून घेऊन स्वच्छतेचे काम अधिक प्रभावीपणे कसे करता येईल, याचे नियोजन करण्यात येत आहे. विशेषतः या कामात तरुणांचा सहभाग वाढवण्यावर भर दिला जाणार असल्याची माहिती महापौरांनी दिली.



**वेंगुर्ला पॅटर्नवर चर्चा**
या बैठकीत कल्याण येथील मनुसृष्टी संस्थेच्या वैशाली तांबट यांनी वेंगुर्ला नगरपरिषदेच्या यशस्वी स्वच्छता मॉडेलची (वेंगुर्ला पॅटर्न) माहिती दिली. शहरात कचरा व्यवस्थापन कशा प्रकारे अधिक सक्षम करता येईल, यावर त्यांनी सादरीकरण केले.

उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांवर कडक दंडात्मक कारवाई करावी, अशी सूचना बैठकीत मांडण्यात आली.प्रभागाची स्वच्छता राखणाऱ्या जागरूक नागरिकांना प्रोत्साहन म्हणून बक्षीस देण्यात यावे. नागरिकांनी कचऱ्याचे वर्गीकरण करून तो ओला आणि सुका अशा स्वरूपातच द्यावा, असे आवाहन करण्यात आले.

ज्या ठिकाणी भाजी बाजार भरतात, त्या ठिकाणी मोठ्या कचराकुंड्या आणि कंटेनर ठेवण्यात यावेत. अस्वच्छता पसरवणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत बीव्हीजी कंपनीला अधिकार देण्याविषयी महापौरांनी सकारात्मकता दर्शवली आहे. जळगाव शहराला कचरामुक्त करण्यासाठी प्रशासनासोबतच नागरिकांनीही या मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# सारा फाउंडेशन, भीमकन्या गृपतर्फे आरोग्य शिबीरास प्रतिसाद

## महात्मा फुले, डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त उपक्रम

**जळगाव, १२ एप्रिल**

क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या १९९ व्या जयंतीनिमित्त आणि बोधिसत्व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला, सारा फाउंडेशन व भीमकन्या ग्रुप वाघ नगर, यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मोफत आरोग्य शिबिराला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

या शिबिरात स्थानिक नागरिकांना आरोग्य तपासणी व होमिओपॅथी औषधे मोफत उपलब्ध करून देण्यात आली. डॉ. जयेश वाल्हे, डॉ. सिद्धेश्वर पाटील, डॉ. अमिता श्रीवास्तव, डॉ. स्वाती सोनवणे व सहकाऱ्यांनी रुग्णांची तपासणी केली कार्यक्रमाला आमदार सुरेश भोळे, उपमहापौर मनोज चौधरी, नगरसेवक अनिल अडकमोल, भूषण लाडवंजारी, शिरीष तायडे, डॉ. चंद्रकांत भालेराव, उपाध्यक्ष सुरेखा भालेराव, डॉ. सागर भालेराव,जयसिंग वाघ, दिलीप तासखेडकर, प्रितम शिरतुरे, डी. एच. भास्कर, विनोद सपकाळे, बापू साळुंके, प्रा.अशोक हनवते, अरविंद बिऱ्हाडे, वसंत जावळे, चंद्रशेखर ओतारी, मिलिंद वाल्हे, अरविंद बाविस्कर, राहुल भालेराव, साधना बाविस्कर, विशाखा हनवते, ज्योती सूरदास, संगीता सपकाळे, स्वाती मेढे, ज्योती लोखंडे, दिपाली सपकाळे, शितल अहिरे, अलका तायडे, माधुरी वाघ उपस्थित होते. सूत्रसंचालन श्री. वांद्रे यांनी केले.



# भाजपातर्फे प्रबोधन सप्ताहाला सुरूवात

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त उपक्रम



**जळगाव** : भारतीय जनता पार्टी जळगाव महानगरतर्फे महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त प्रबोधन सप्ताहाचे आयोजन. करण्यात आले असून या अंतर्गत विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहेत.

संत चोखामेळा बोर्डिंग येथे शालेय विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्य वाटप तसेच अन्नदान कार्यक्रम आयोजित करण्यात आला होते. या कार्यक्रमास आमदार सुरेश भोळे, भाजपा जळगाव महानगर जिल्हाध्यक्ष दिपक सूर्यवंशी, स्थायी समिती सभापती डॉ. चंद्रशेखर पाटील, गटनेते प्रकाश बालाणी यांची उपस्थिती होती.

या सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत तसेच अन्नदान करण्यात आले या माध्यमातून समाजात सेवा व समतेचा संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आला.

यावेळी जिल्हा सरचिटणीस विशाल त्रिपाठी, राहुल वाघ, प्रबोधन सप्ताहाचे जिल्हा संयोजक आशिष सपकाळे, सह संयोजक ज्योती निंभोरे, सह संयोजक मनोज सोनवणे, दिपक परदेशी, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष नितु परदेशी, मंडळ अध्यक्ष विनोद मराठे, नगरसेवक अरविंद देशमुख,पंकज जैन, शुभांगी बिऱ्हाडे, संगीता पाटील, तारा पटेल, पवन खंबायते, सुनील वाणी, दिपक बाविस्कर, सचिन कोळी, राजू डोंगरे, हरिओम सूर्यवंशी, ॲड. आनंद कोचुरे, चेतन नन्नवरे, सुनील जाधव कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

# घरगणना प्रक्रियेसाठी फील्ड यंत्रणा सज्ज

## महापालिकेत जनगणना २०२७ च्या क्षेत्रीय प्रशिक्षण शिबिराचा समारोप

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १२ एप्रिल**

शहर महानगरपालिकेच्यावतीने जनगणना प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर ९ ते ११ एप्रिल या कालावधीत आयोजित करण्यात आलेले क्षेत्रीय प्रशिक्षण शिबिर यशस्वीरीत्या पार पडले. तीन दिवस चाललेल्या या शिबिरामध्ये शहरी भागासाठी नियुक्त फील्ड ट्रेनर्सना सखोल व सर्वसमावेशक प्रशिक्षण देण्यात आले. महापालिकेच्या या उपक्रमामुळे आगामी जनगणना प्रक्रियेसाठी सक्षम, प्रशिक्षित व सज्ज फील्ड यंत्रणा तयार झाली असून शहरातील घरगणना कामकाज अधिक प्रभावीपणे राबविण्यास मदत होणार आहे.

या शिबिराचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून मास्टर ट्रेनर बोदवड तहसीलदार ज्ञानेश्वर सपकाळे व हर्षल नेमाडे (विभाग प्रमुख, शासकीय तंत्रनिकेतन, यांनी सहभाग घेतला. त्यांनी जनगणनेचे राष्ट्रीय महत्त्व अधोरेखित करताना अचूक, पारदर्शक व वेळेत माहिती संकलन करण्याचे महत्त्व स्पष्ट केले. घरगणना करताना अनुसरावयाची प्रक्रिया, डिजिटल साधनांचा वापर, माहिती नोंदणीतील बारकावे, नागरिकांशी संवाद कौशल्य तसेच उद्भवणाऱ्या तांत्रिक व प्रशासकीय अडचणींवर उपाययोजना याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. प्रशिक्षणादरम्यान सहभागी फील्ड ट्रेनर्सना सैद्धांतिक माहितीबरोबरच प्रात्यक्षिकांवर विशेष भर देण्यात आला. शिबिराच्या शेवटच्या दिवशी सर्व फील्ड ट्रेनर्सनी प्रत्यक्ष क्षेत्रात जाऊन घरोघरी भेट देत



घरगणना प्रक्रिया राबविली. या प्रात्यक्षिक उपक्रमामुळे प्रशिक्षणादरम्यान मिळालेल्या ज्ञानाचा प्रत्यक्ष उपयोग करण्याची संधी मिळाली व सहभागींचा आत्मविश्वास अधिक दृढ झाला. शिबिरामध्ये जनगणना कार्यातील शिस्त, गोपनीयता, अचूकता आणि वेळेचे महत्त्व यावर विशेष भर देण्यात आला. तसेच प्रत्येक घटकापर्यंत पोहोचून सर्वसमावेशक माहिती संकलित करण्यासाठी आवश्यक असलेल्या नियोजन, समन्वय आणि जबाबदाऱ्यांचे सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

**घरगणनेसाठी सहकार्य करा**

प्रक्रियेसाठी येणाऱ्या प्रगणक व सुपरवायझर यांना सहकार्य करावे. नागरिकांनी अचूक व सत्य माहिती देऊन राष्ट्रीय महत्त्वाच्या या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा, असेही प्रशासनाने स्पष्ट केले. याप्रसंगी उपमहापौर मनोज चौधरी यांनी सर्व फिल्ड ट्रेनर व मास्टर ट्रेनर यांची भेट घेऊन राष्ट्रीय कार्यक्रम पार पाडण्यासाठी प्रोत्साहन दिले. यावेळी चार्ज अधिकारी जयंत शिरसाठ, प्रसाद पुराणिक, आर. टी. पाटील, मनोज वन्नरे, जनगणना अधीक्षक आकाश जगताप तसेच सर्व सहा.चार्ज अधिकारी उपस्थित होते.

# भाजपा जिल्हा महानगरतर्फे संविधान जागर यात्रा

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले जयंतीनिमित्त उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १२ एप्रिल**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती तसेच महात्मा ज्योतिबा फुले यांची द्विशताब्दी महोत्सव निमित्त भारतीय जनता पार्टी जळगाव जिल्हा महानगर तर्फे प्रबोधन सप्ताहाचा दुसरा दिवसानिमित्त आज क्रांतीज्योती महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त संविधान जागर यात्रा काढण्यात आली.

या संविधान जागर यात्रेला जी एम फाउंडेशनपासून सुरुवात होऊन नेहरू चौक, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळ्यापर्यंत काढण्यात आली. याप्रसंगी फुले मार्केट येथील महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्याच्या माल्यार्पण करून यात्रेचा समारोप करण्यात आला.

यानिमित्त जळगाव शहराचे आमदार सुरेश भोळे, जिल्हाध्यक्ष दीपक सूर्यवंशी, महापौर दीपमाला काळे, सरचिटणीस विशाल त्रिपाठी,



जयेश भावसार, जिल्हा संयोजक आशिष सपकाळे, जळगाव जिल्हा उपाध्यक्ष ज्योती निंभोरे, जिल्हा अनुसूचित जाती जिल्हाध्यक्ष मनोजकुमार सोनवणे, महिला जिल्हा उपाध्यक्ष शुभांगी बिऱ्हाडे, सुनील जाधव, भाग्यश्री चौधरी, भूषण लाडवंजारी, शिरीष तायडे, अनिल जोशी, जितेंद्र चव्हाण, अनिल अडकमोल, विजय बांदल, महेश जोशी, सचिन बाविस्कर, प्रकाश पंडित, आनंद सपकाळ, विजय बनसोडे, सतनाम बावरी, उदय भालेराव, हर्षल इंगळे, निलेश तायडे, उज्वला बेंडाळे, संगीता पाटील, तारा पटेल, राजश्री सोनवणे, दर्शना सपकाळे, वसंत पाटील, रितेश माळी, क्षितिज भालेराव, अक्षय सोनवणे, तुषार सूर्यवंशी, रोहित सोनवणे, संजय शिंपी, आनंद सपकाळे, रेखा वर्मा, महेश जोशी, किरण भोई, सुरेश सोनवणे, अतुल बारी, सतीश महाजन, राजू डोंगरे, हरिओम सूर्यवंशी, कमलेश डांबरे, अभिजीत रंधे उपस्थित होते.

# क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या कार्याचे स्मरण

## शहरात विविध सामाजिक संघटना, राजकीय पक्ष, शाळांतर्फे अभिवादन

**जळगाव : स्त्री शिक्षणाचा पाया रोवणारे, थोर समाजसुधारक क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी शहरातील विविध सामाजिक संघटना, राजकीय पक्ष, शाळा महाविद्यालयात विविध कार्यक्रम घेऊन त्यांच्या कार्याचे स्मरण करण्यात आले.**



### डॉ. उल्हास पाटील कॉलेज ऑफ फिजीओथेरेपी

**जळगाव** : क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त डॉ. उल्हास पाटील कॉलेज ऑफ फिजिओथेरपी येथे अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. जयवंत नागुलकर तसेच प्रशासक राहुल गिरी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला. महाविद्यालयातील सर्व अध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.यावेळी उपस्थित मान्यवरांनी महात्मा फुले यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

### शासकीय वैद्यकीय महाविद्यालय

येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात ''महात्मा ज्योतिबा फुले'' यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली,

यावेळी प्रभारी अधिष्ठाता, डॉ. किशोर इंगोले यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन वंदन केले. या प्रसंगी डॉ.कुणाल देवरे, मंगेश जोशी, अनिल कापुरे, निलेश बारी,



डी.एस. पाटील, प्रदीप पाडवी, माहेन पाटील, प्रकाश पाटील, आर.व्ही. कोळी, गणेश इखे हे उपस्थित होते.



### राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्यावतीने जिल्हा राष्ट्रवादी कार्यालयात थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेला जिल्हा कार्यालय सरचिटणीस वाय एस महाजन यांच्या हस्ते माल्यार्पण करून जंयती साजरी करण्यात आली. यावेळी महानगर अध्यक्ष ईजाज मलिक, जिल्हा समन्वयक विकास पवार, माजी महानगर अध्यक्ष अशोक लाडवंजारी, युवक महानगर अध्यक्ष विनायक पाटील, अल्पसंख्याक जिल्हा अध्यक्ष मजहर पठाण, जिल्हा जेष्ठ आघाडीचे अध्यक्ष एस डी पाटील, सरचिटणीस सुनिल माळी, प्रा. महाडिक, गौरव वाणी, अकिल पटेल उपस्थित होते. आभार जिल्हा सरचिटणीस वाघ एस महाजन यांनी मानले




### राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी

क्रांतीज्योती सूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या १९९ व्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जिल्हा मध्यवर्ती कार्यालय येथे सत्यशोधक समाजाचे संस्थापक क्रांतीज्योती सूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती उत्साहात साजरा करण्यात आली.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राज्य प्रवक्ता प्रतिभा शिंदे यांच्या हस्ते प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच शहरातील फुले मार्केट येथील क्रांतीज्योती महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्याला जळगाव जिल्हा बँकेचे चेअरमन तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष संजय पवार यांच्या हस्ते पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमाप्रसंगी धनराज माळी प्रस्तावना सादर केली. नदीम मलिक, बरकत आली, गणेश चव्हाण, गोकुळ चव्हाण, संजय चव्हाण, नाटेश्वर पवार, युवराज बिऱ्हाडे, अरविंद देवरे, श्यामकांत पाटील, कल्पना अहिरे, रिता बाविस्कर, नीता पाटील, नामदेव चौधरी, दिनकर माळी, धवल पाटील, अमोल देशमुख, किरण सपकाळे, मोनालिका पवार, अनिल पाटील, भाऊसाहेब पाटील, पंकज तानपुरे आदी उपस्थित होते.जळगांव तालुका अध्यक्ष भूषण पवार यांनी आभार मानले.



### डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय

क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंतीनिमित्त डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय संस्थेत अभिवादन करण्यात आले.

यावेळी माजी खा. डॉ. उल्हास पाटील, पूजा गेरे डॉ. वैभव पाटील, डॉ. रश्मी संघवी, डॉ.तेजस सोनवणे, डॉ.ऐश्वर्या चलवडे, डॉ.संस्कृती भिरूड, डॉ रूषीकेश साखरे, डॉ. रुचा गौर, डॉ.साक्षी पटवारी, डॉ दिक्षा मुंडे, डॉ. सिद्धी संखे तसेच स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र विभागातील कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांनी महात्मा फुले यांच्या विचारांचा अंगीकार करून समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्याचा संकल्प करण्यात आला.

### खुबचंद सागरमल विद्यालय

येथील खूबचंद सागरमल विद्यालयात महात्मा फुले जयंती साजरी डॉ नीलेश चांडक यांच्या हस्ते प्रतिमेस मालार्पण करण्यात आले.

याप्रसंगी नगरसेवक विजय बांदल, नगरसेविका जयश्री पाटील पूजा जगताप, संस्थेचे उपाध्यक्ष सुभाष सांगोरे, डॉ अर्चना सूर्यवंशी, गटशिक्षणाधिकारी भावना भोसले, मुख्याध्यापिका योगिनी बेंडाळे, निखिल जोगी, प्रा शिवराज पाटील,



लक्ष्मीकांत महाजन, योगेंद्र पवार प्रवीण पाटील, कल्पना देवरे, उज्वला गोहिल व विद्यार्थी उपस्थित होते.



### बहिणाबाई विद्यालयात

बहिणाबाई माध्यमिक विद्यालयात समन्वयक प्रतिभा खडके यांच्या उपस्थितीत विद्यालयाचे मुख्याध्यापक डॉ. विलास नारखेडे यांनी महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून महात्मा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी महात्मा फुले यांच्या जीवन प्रसंगांवर आधारित पुस्तकांचे वाचन केले. यावेळेस विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



### कंजरभाट समाज युवा फाउंडेशन

कंजरभाट समाज युवा फाउंडेशन तर्फे महात्मा ज्योतिराव फुले जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

शहरातील फुले मार्केट येथील महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष योगेश बागडे, मुख्य सल्लागार मोहन गारुंगे, सचिव राहुल नेतलेकर, नरेश बागडे, खजिनदार वीर दहियेकर, सदस्य पंकज गागडे आदी मान्यवर उपस्थित होते.

### ललित कला भवन



महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ ललित कला भवन जळगाव येथे महात्मा ज्योतिबा फुले जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी एस.टी. महामंडळाचे वरीष्ठ लिपिक प्रशांत लाड यांच्या हस्ते महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला यावेळी एस.टी.महामंडळाचे रविंद्र नेटके यांनी महात्मा फुले यांच्या जीवन कार्याची माहिती दिली. कार्यक्रमास कल्याण निरीक्षक भानुदास जोशी, प्रशांत देवरे, शोभा बडगुजर, रती कुलकर्णी आदी उपस्थित होते.

# ‘कॉर्पोरेट जिहाद’: आता आणखी किती जिहाद?

**‘लव्ह जिहाद’! हा एक जिहाद घडवण्यासाठी, जिहादी ‘लॅण्ड जिहाद’ ते ‘ड्रग्ज जिहाद’ ते आता ‘कॉर्पोरेट जिहाद’चाही वापर करत आहेत. पण, हे कॉर्पोरेट स्तरावरच होते का? तर तसे नाही. एखाद्या विषारी किड्याने जिथून मार्ग मिळेल तिथून आत जावे आणि सगळा परिसर उद्ध्वस्त करावा तसेच हे आहे. हे जिहादी जिथे असतील तिथून प्रत्येक स्तरावरील सर्व शक्यतांचा वापर करत, ‘लव्ह जिहाद’ करत आहेत. नुकताच उघडकीस आलेला नाशिकचा ‘कॉर्पोरेट जिहाद’ हे त्याचेच उदाहरण. या घटनेच्या पार्श्वभूमीवर ‘कॉर्पोरेट जिहाद’चा घेतलेला मागोवा...**

वास्तव
योगिता साळवी

आपली उगीच समज असतो की, गरीब, अज्ञानी आणि जगओळख नसलेले मुस्लीमच धर्मांध असतात आणि ते ‘जिहाद’ वगैरेसाठी काहीही करतात. शिकलेले लोक, सुधारलेले असल्याने असे काही करत नाहीत. पण, नाशिकच्या ‘कॉर्पोरेट जिहाद’ने ही सगळी अफवा असल्याचे सिद्ध केले आहे.

ते सगळे इंजिनिअर आणि अगदी कॉर्पोरेट स्तरावरचे आधुनिक राहणीमान असणारेच होते. पण, त्यांनाही नुकतेच पोलिसांनी अटक केली. त्यांनी त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्या हिंदू महिला-पुरुष कर्मचाऱ्यांना ‘नमाज’ पढायला लावणे, हिंदू देव-देवतांची टिंगल करणे, निंदा करणे, अपमानास्पद बोलणे, मुद्दाम धार्मिक भावना दुखावणे, विनयभंग करणे आणि धर्मांतरणासाठी दडपण आणणे असे गुन्हे केले होते. ते सगळे टीम लीडर होते, वरिष्ठ अधिकारीही होते. दानिश शेख, तौसिफ अख्तार, निदा खान, शफी शेख, रझा मेमन, शाहरुख कुरेशी वगैरे हे ते आरोपी, शिकलेले आणि बहुराष्ट्रीय कंपनीत काम करणारे गुन्हेगार ठरले. त्यांना पाहून कुणालाही वाटेल की, अरे हे असे कसे करू शकतात? पण, सत्यपरिस्थिती हीच आहे की, धर्मांध समाजविघातकांनी सुशिक्षित आणि ज्यांच्यावर संशय येणार नाही, अशा लोकांनाच कटकारस्थानात सहभागी करण्याचे षड्यंत्र रचले आहे. मागे दिल्लीत आत्मघातकी हल्ला झाला, त्यातले गुन्हेगार तर डॉक्टर होते. आताही नाशिकच्या बहुराष्ट्रीय कंपनीतील जे आठ टीम लीडर आणि वरिष्ठ कर्मचाऱ्यांना अटक करण्यात आली आहे, हे सगळेच इंजिनिअर आहेत.

गेली अनेक वर्षे त्यांचे ‘लव्ह जिहाद’चे कटकारस्थान ‘सुखेनैव’ सुरू होते. गरीब घरच्या मुलींना नोकरीचे आमिष द्यायचे, त्यांची गरिबी आणि गरिबीतून आलेली लाचारी असाहाय्यता हेरायची आणि त्यांना नोकरी द्यायची. आपण तिचे हितचिंतक आहोत, तसेच तिच्या कामामध्ये काही चुका झाल्यास तिला सांभाळून घेऊ, अधिकचा ओव्हरटाईम देऊन तिला जास्त पगार कसा मिळेल हे बघू, असे सांगत ते त्या मुलींशी जवळीक साधायचे. गरीबच काय; पण सधन घरच्या मुलींनाही वाटायचे की, ‘‘अरे वा, आपल्याला नोकरी दिली. आता आपली कमाई वाढवण्यासाठीही हा टीम लीडर आपल्याला मदतदेखील करतो. आपल्याला विशेष आणि जवळचे मानतो.’’ त्यातूनच मुलींची त्यांच्याशी जवळीक व्हायची. मग मानसिक आणि शारीरिक शोषण करण्यासाठी हे राक्षस पुढे सरसवायचे. त्या टीम लीडरची एकी तर पाहा. ते सगळे मुस्लीम होते आणि मिळूनच तिथल्या हिंदू मुली-महिलांच्या धार्मिक भावना दुखावायचे. त्या टीम लीडर्सपैकी कुणाच्याही मनात आले नाही की, आपण या महिलांच्या आर्थिक परिस्थितीचा गैरफायदा घेत आहोत, त्यांना त्रास देत आहोत. उलट, त्यांच्यासाठी ते पुण्याचेच काम असणार!

या हिंदू कर्मचाऱ्यांचे धर्मांतरण केले की, कयामतच्या रात्री आपल्यासकट आपण सांगू त्याचे पाप धुतले जाईल आणि आपल्याला जन्नत मिळेल, याच विचारात ते धुंद होते. ना कसली भीती, ना कसले बंधन! या मुली-महिलांनी या कंपनीच्या ‘एचआर’कडेही याबाबत तक्रार केली होती. पण, या कर्मचाऱ्यांना न्याय दिला गेला नाही. ही घटना उघडकीस कशी आली, तर अतिशय आधुनिक असलेली ती युवती त्या कंपनीत कामाला लागली. काही महिन्यांतच तिचा पेहरावच बदलला. जीन्स-मिडी-शॉर्ट टॉप घालणारी ती मुलगी आता सलवार-कुर्ता, तसेच मुस्लीम महिला ज्या पद्धतीने पेहराव करतात त्या पद्धतीने पेहराव करू लागली. घरातल्यांना वाटले, मुलगी मल्टी-नॅशनल कंपनीमध्ये कामाला आहे, त्यामुळे तिच्या पोशाखात बदल झाला असेल. पण, तिने कट्टर धार्मिक मुसलमानांसारखे, एक महिना ‘रोजा’चे उपवास पकडले आणि घरातल्यांच्या पायाखालची वाळू सरकली. हिंदू घरातील हिंदू-संस्कार झालेली आपली मुलगी, मुसलमान रूढी-प्रथा कशा पाळू लागली? घरातल्यांनी तिला विश्वासात घेतले. प्रेमाने; पण कसून चौकशी केली, तेव्हा सत्य उघडकीस आले की, कंपनीतल्या टीम लीडर्सनी त्या कामाच्या ठिकाणाला ‘लव्ह जिहाद’चा अड्डा केला होता, जणू कटच केला होता.

हिंदू कर्मचाऱ्यांनी मुस्लीम पद्धतीने तिथे वावरावे, जगावे, मुस्लीम श्रद्धा बाळगाव्यात, यासाठी त्यांच्यावर दडपण आणले जाई. पुढे हे प्रकरण पोलिसात दाखल झाले आणि पोलिसांनी नियोजन केले. महिला पोलिसांनी पाळत ठेवली. ४० ‘सीसीटीव्ही’ फुटेज तपासल्यानंतर, मुंबई नाका पोलीस ठाण्यात धार्मिक भावना दुखावल्याचा एक, विनयभंगाचे चार, धार्मिक भावना दुखावत विनयभंगाचे तीन असे एकूण आठ गुन्हे नोंदवण्यात आले. याप्रकरणी आठ महिला, तर एक पुरुष तक्रारदार आहे. बळजबरीने धर्मांतराचा प्रयत्न केल्याचा आरोप त्याने केला आहे. बळजबरी धर्मांतर केलेल्या संबंधित तरुणाचे, संशयित आरोपीसोबतचे डोक्यावर गोल टोपी घातलेले फोटोही सोशल मीडियात व्हायरल झाले आहेत.



असो, ही घटना उघडकीस आली म्हणून! पण, जरा डोळे उघडून पाहिले तर काय दिसते? कॉल सेंटर, आजूबाजूची गारमेंट किंवा पॅकिंग किंवा इतर कंपन्या पाहा, मॉल किंवा शॉपिंग सेंटर पाहा, तिथे वरिष्ठ स्तरावर टीम लीडर कोण आहे ते पाहा आणि त्याच्या हाताखाली काम करणारे कोण आहेत ते देखील पाहा. शाहरुख-सलमान-सैफ सारखे हातवारे करत, डोळ्यांची हालचाल करत चांगली हिंदी बोलता येते किंवा वरिष्ठांची मज राखत, त्याच्यासाठी वाटेल ते करण्याची तयारी दाखवण्याचे कसब असते म्हणून किंवा येणाऱ्या ग्राहकांशी मधाळ आणि ‘जी-जी’ करून बोलण्याची पद्धत असते म्हणून तिथे असतात. यामध्ये टीम लीडर म्हणून जास्तीत-जास्तपणे कोण व्यक्ती असतात? दुसरीकडे त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्या मुली-महिला, खरेच अतिशय गरीब घरच्या आणि परिस्थितीने गांजलेल्या असतात. (अपवाद वगळता)त्यांच्याशी कसे वागले जात असेल? धर्मांध लोकच का टीम लीडर्स होतात? किंवा हाताखाली गोरगरीब हिंदू असतील तिथे ते वरिष्ठ म्हणून कसे पोहोचतात? तर त्या स्तरावर पोहोचलेच पाहिजे आणि का पोहोचले पाहिजे? याबाबतचा त्यांचा हेतू स्पष्ट आणि ठाम असतो. तिथेपर्यंत ते पोहोचावेत म्हणून, त्यांना मदत करणारी एक सपोर्ट सिस्टम असते. अर्थातच, पुरोगामी स्वतःच्या हिंदू धर्माची ओळख विसरलेले आणि छोट्या-मोठ्या आमिषाने खूश होणाऱ्या, काही स्वार्थ हिंदूंची यात मोलाची भूमिका असते. ‘‘आम्ही धर्म मानत नाही, आम्हाला कामाशी काम. जो आम्हाला काही देईल आम्ही त्याचेच ऐकू. आमचा फायदा झाला आणि दुसऱ्याचे नुकसान झाले, तर आम्हाला काही देणेघेणे नाही,’’ अशी भूमिका असलेल्या काही हिंदूंमुळेच, हिंदू समाजाचे नुकसान होत आहे.

विषयांतर होईल; पण लिहायलाच हवे की, ‘‘राधा ने कान्हा से प्यार किया तो राधा ने पुछा की, कान्हा तू हिंदू हे, या मुसलमान?’’ तसेच, ‘‘मी एकटीने थोडीच मुसलमान व्यक्तीशी लग्न केले, करीनाने सोनाक्षी सिन्हाने पण मुसलमान पुरुषांशी लग्न केले. मग मी केले तर काय झाले,’’ असे म्हणणारी मोनालिसा अल्पवयीन आहे, असे तपासाअंती स्पष्ट झाले आहे. खरेतर तिने फरमान खानशी केलेला विवाह म्हणजे, ‘लव्ह जिहाद’ला सपोर्ट सिस्टम कसे काम करते याचे उत्तम उदाहरण ठरावे. ती अल्पवयीन असूनही ती सज्ञान आहे असा दावा करणे, तिच्या तोंडून हिंदूंच्या देव-देवतांचा उच्चार करवून घेणे, सुंदर, अतिश्रीमंत, मोठमोठ्या घरच्या अभिनेत्रीही मुस्लिमांशी विवाह करतात, म्हणजे तसे करणे चांगलेच आहे असे मोनालिसाच्या तोंडून वदवणे, केरळमच्या कम्युनिस्ट सरकारच्या मंत्र्यांनी तिच्या विवाहाला हजर राहणे, या सगळ्या गोष्टी एकमेकांशी जोडलेल्या आहेत. या गोष्टष्टे अगदी तशाच जोडलेल्या आहेत, जसे ‘लव्ह जिहाद’, ‘लॅण्ड जिहाद’, ‘ड्रग्ज जिहाद’ ते ‘कॉर्पोरेट जिहाद’ एकमेकांशी जोडलेले आहेत. तलवारीच्या आणि शस्त्राच्या धाकदपटशाच्या माध्यमातून हिंदूंना या देशात अल्पसंख्याक करता येणार नाही, म्हणून त्यांनी रचलेल्या या असंख्य षड्यंत्रांना आपण कसे थांबवणार आहोत? ‘आपल्या घराबाहेर काहीही होवो, आम्हाला काय करायचे; मरू दे तिकडे’ ही वृत्ती जोपर्यंत आपण सोडत नाही आणि सकल हिंदू म्हणून जोपर्यंत संघटित होत नाही, तोपर्यंत अशाप्रकारचे हजारो ‘जिहाद’ दररोज उघड होतच राहणार! हिंदू तेज जागा रे!

-९५९४९६९६३८

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संवैधानिक चिंतन

**‘विवेक पुस्तक प्रकाशन’तर्फे ‘भारतरत्न’ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून, ‘पद्मश्री’ रमेश पतंगे लिखित ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संवैधानिक चिंतन’ हे पुस्तक उद्या, दि. १३ एप्रिल रोजी चंचल स्मृती, रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, वडाळा, मुंबई येथे सायंकाळी ५ वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत प्रकाशित होत आहे. त्यानिमित्ताने पुस्तकातील एक प्रकरण प्रसिद्ध करीत आहोत.**




पुस्तक परिचय
रमेश पतंगे

१९४६ साली जी संविधान सभा अस्तित्वात आली, ती अखंड भारताची संविधान सभा होती. या संविधान सभेत ‘मुस्लीम लीग’ आणि काँग्रेसचे सभासद होते. ‘मुस्लीम लीग’चे ७३ सभासद होते. त्यांनी संविधान सभेवर बहिष्कार घातला. ‘मुस्लीम लीग’ने पाकिस्तानची मागणी केली होती. मुसलमानांसाठी स्वतंत्र देश निर्माण करून त्या देशाचे स्वतंत्र संविधान आम्ही बनवू, भारताबरोबर आम्हाला राहायचे नाही, असे त्यांनी ठरविले होते.

१९४६ साली जी संविधान सभा अस्तित्वात आली, त्या संविधान सभेत ३८९ सभासद होते. त्यातील २९२ विविध प्रांतांतून निवडून आले होते आणि ९३ जण संस्थानिकांचे प्रतिनिधित्व करीत होते आणि चार जण ‘चीफ कमिशनर’च्या अधिकाराखाली, प्रदेशातून निवडले गेले होते. १९४६ साली झालेल्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला २०८ जागा मिळाल्या आणि ‘मुस्लीम लीग’ला ७३ जागा मिळाल्या. ‘मुस्लीम लीग’ने बहिष्कार घातला, तरी संविधान सभेच्या बैठका सुरू करण्याचे वेळापत्रक ठरले. दिल्ली येथे दि. ९ डिसेंबर १९४६ ला संविधान सभेची पहिली बैठक झाली. या बैठकीची अध्यक्षता डॉ. सच्चिदानंद सिन्हा यांनी केली. संविधान सभेचे हंगामी अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली होती. नंतर कायमस्वरूपी अध्यक्ष म्हणून डॉ. राजेंद्र प्रसाद यांची निवड झाली. डॉ. राजेंद्र प्रसाद संपूर्ण संविधान सभेचे अध्यक्ष होते. १९४६ साली ‘मसुदा समिती’ची रचना झालेली नव्हती. ती जेव्हा झाली, तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर ‘मसुदा समिती’चे अध्यक्ष झाले. संविधान सभेचे अध्यक्ष आणि ‘मसुदा समिती’चे अध्यक्ष यांच्यात गल्लत करता कामा नये.

भारतीय संविधान सभा ही अनेक कारणांसाठी, अन्य देशांतील संविधान सभांपेक्षा फार वेगळी होती. या संविधान सभेत १५ महिला होत्या. या सर्व महिला स्वातंत्र्य-चळवळीत सक्रिय भाग घेणाऱ्या होत्या, कायद्याचे चांगले ज्ञान असणाऱ्या होत्या. अमेरिकेच्या संविधान सभेत एकदेखील महिला नव्हती. संविधान सभेचे दुसरे वैशिष्ट्य असे होते की, हीच संविधान सभा देशाची संसददेखील होती. म्हणजेच कायदे मंडळ होते. १९४६ साली हंगामी सरकारची स्थापना झाली होती.

मंत्रिमंडळाचे अनेक सदस्य संविधान सभेचे सदस्य होते. संविधान सभा म्हणून या सभासदांना संविधानाची निर्मिती करायची होती, शासन चालवायचे होते आणि शासन चालवण्यासाठी आवश्यक ते कायदेही करायचे होते. तीन प्रकारची कामे संविधान सभेकडे आली. इंग्रजीत याला ‘थ्री इन वन’ असे म्हटले जाते.

संविधान सभेच्या निर्मितीचादेखील एक स्वतंत्र इतिहास आहे. महात्मा गांधीजी यांनी १९२३ सालीच म्हटले की, भारताचे संविधान भारतीय लोक तयार करतील. ब्रिटिश पार्लमेंटने केलेला कायदा आम्हाला नको. आपण आपल्या भाषेत ‘संविधान’ हा शब्दप्रयोग वापरतो. ब्रिटिश भाषेत त्याला ‘ॲक्ट ऑफ पार्लमेंट’ असे म्हणतात. १९१९चा कायदा हे संविधान आहे आणि १९३५चा कायदादेखील संविधानच आहे. परंतु, त्याला ‘गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट’ असे संबोधिले गेले आहे. भारतीय ‘कम्युनिस्ट’ चळवळीतील एक अग्रगण्य नेते एम. एन. रॉय यांनी, १९३४ साली प्रथम संविधान सभेची मागणी केली. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने १९३५ साली ही मागणी उचलून धरली. १९३६च्या एप्रिल महिन्यात लखनऊ येथे काँग्रेस पक्षाचे अधिवेशन झाले. पंडित जवाहरलाल नेहरू या अधिवेशनाचे अध्यक्ष होते. त्यांनी संविधान सभेची मागणी केली.

१९३५ सालचा कायदा झाला होता. हा कायदा म्हणजे, ब्रिटिश पार्लमेंटने भारतासाठी दिलेले संविधान होते. या संविधानात अनेक त्रुटी असल्यामुळे, ते राष्ट्रीय चळवळीने स्वीकारले नाही. स्वतंत्र संविधान सभेची मागणी लावून धरली. सत्तांतराचा आराखडा तयार करण्यासाठी १९४६ साली ‘कॅबिनेट मिशन’ भारतात आले, त्याचे तीन सभासद होते. त्यांची नावे लॉर्ड पेथिक-लॉरेन्स, सर स्टॅफोर्ड क्रिप्स, ए. व्ही. अलेक्झांडर अशी. ‘कॅबिनेट मिशन’ने संविधान सभेची मागणी मान्य केली, आणि प्रांतिक विधिमंडळातून संविधान सभेचे सभासद निवडले गेले. आजच्या प्रमाणे तेव्हा सार्वत्रिक मतदानाचा अधिकार नव्हता. शिक्षण, संपत्ती या आधारावरच मतदार ठरविले जात. म्हणून, काहीजण संविधान सभेच्या निवडीवर आजही प्रश्नचिन्ह उपस्थित करीत असतात. संविधान सभा ही संपूर्ण जनतेचे प्रतिनिधित्व करणारी नव्हती, मर्यादित मतदारांचे प्रतिनिधित्व करणारी होती, असा आक्षेप काहीजण घेतात.

या आक्षेपाला तसा अर्थ नाही. अमेरिकेतील संविधान सभा सार्वत्रिक मतदानाने निवडली गेली नव्हती. हीच गोष्ट फ्रान्सच्या संविधान सभेचीदेखील आहे. अनेक विषयांचा विचार त्या-त्या काळाच्या संदर्भात करावा लागतो. आजच्या कसोट्या भूतकाळाला लावून चालत नाहीत. जी संविधान सभा गठित झाली, तिचे कामकाज सुरू झाले. दि. १३ डिसेंबरला पंडित जवाहरलाल नेहरू यांनी संविधान सभेपुढे उद्देशक ठराव मांडला. या ठरावावर अनेक दिवस चर्चा होऊन तो स्वीकृत झाला. या ठरावाची ठळक वैशिष्ट्ये अशी होती : १ ) सर्व सत्तेचा उगम भारतीय जनता राहील. २) सर्व नागरिकांना समता आणि स्वतंत्र्याचे अधिकार राहतील. ३) घटक राज्यांना स्वायत्तता असेल.

४) केंद्र सत्तेकडे मर्यादित विषय असतील. या ठरावावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान सभेपुढील पहिले भाषण झाले. हे भाषण आपण पुढील प्रकरणात पाहणार आहोत.

संविधान सभेने कामकाज सुरळीत चालण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या समित्यांचे गठन केले. त्यातील महत्त्वाच्या समित्यांची नावे आणि अध्यक्षांची नावे अशी :

१) प्रक्रिया संबंधी नियम समिती - डॉ. राजेंद्र प्रसाद २) संचालन समिती - डॉ. राजेंद्र प्रसाद ३) वित्त आणि कर्मचारी समिती - डॉ. राजेंद्र प्रसाद ४) क्रेडेंशियल समिती - अल्लादी कृष्णस्वामी अय्यर ५) हाऊस कमिटी - बी पट्टाभि सीतारामय्या ६) व्यापार समितीचा आदेश - के. एम. मुन्शी ७) राष्ट्रीय ध्वज पर तदर्थ समिती - डॉ. राजेंद्र प्रसाद ८) संविधान सभेची कार्य समिती - जी. व्ही. मावळणकर. या समित्यांमध्ये ‘मसुदा समिती’ नाही, हे वाचकांच्या लक्षात येईल. ‘मसुदा समिती’ची निर्मिती एक वर्षानंतर झालेली आहे. भारत सरकारच्या अधिकृत साईटवर ही माहिती आहे. या साईटचे नाव आहे. ://. दि. ३१ डिसेंबर १९४७ रोजी, संविधान सभेची सदस्यसंख्या राज्यवार २२९ दिलेली आहे आणि संस्थानिकांची संख्या ७३ दिलेली आहे. ही शासकीय आकडेवारी असल्यामुळे ती अधिकृत समजली पाहिजे.

संविधान सभेने कायदेतज्ज्ञ बेनेगल नरसिंग राऊ यांना ‘संविधान सल्लागार’ म्हणून नेमले. संविधान सभेने ज्या वेगवेगळ्या समित्या गठित केल्या, त्यांनी आपले अहवाल संविधान सभेला सादर केले. या अहवालाच्या आधारे बी. एन. राऊ यांनी, संविधानाचा एक मसुदा तयार केला. त्याला ‘ ’ असे म्हणतात. ती २४२ कलमांची आहे. संविधान सभेत या मसुद्यावर चर्चा झाली. हा संविधान मसुदा, ‘मसुदा समिती’ची स्थापना झाल्यानंतर त्या समितीकडे सोपवण्यात आला.

१९४७ ला ब्रिटिशांनी भारताची फाळणी करण्याचा निर्णय घेतला. यामुळे पाकिस्तानात गेलेल्या प्रदेशाचे प्रतिनिधित्व समाप्त झाले. संविधान सभेची सदस्यसंख्या कमी झाली. संसदेच्या वेबसाईट अनुसार वेगवेगळ्या प्रांतांतून २२९ सभासद राहिले. त्यात संस्थानांचे ७० प्रतिनिधी यांची भर पडली. अशी एकूण संख्या २९९ झाली. म्हणजे आपल्या संविधान सभेची एकूण सदस्यसंख्या २९९ होती. संविधानावरील अनेक पुस्तकांत हे आकडे वेगवेगळे वाचायला मिळतात. परंतु, हे आकडे शासकीय वेबसाईटवरचे असल्यामुळे ते अधिकृत समजले पाहिजेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संविधान सभेत फेरनिवड कशी झाली, हे आपण मागील प्रकरणात बघितले आहे. ते दि. २९ ऑगस्ट १९४७ रोजी ‘मसुदा समिती’चे अध्यक्ष झाले. बी. एन. राऊ यांनी केलेल्या मसुद्यामध्ये या समितीने काही सुधारणा केल्या आणि खऱ्या अर्थाने, संविधाननिर्मितीचा कालखंड सुरू झाला. जी ‘मसुदा समिती’ निवडली गेली, त्या सभासदांची नावे अशी होती :

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर २) डॉ. के. एम. मुन्शी ३) सय्यद मोहम्मद सादुल्ला ४) अल्लादी कृष्णस्वामी अय्यर ५) एन. गोपालास्वामी अय्यंगार ६) एन. माधव राव ७) टी. टी. कृष्णमाचारी. दि. १६ जुलै १९४८ ला हरेंद्र कुमार मुखज यांची संविधान सभेचे उपाध्यक्ष म्हणून निवड झाली.

यापूर्व, १९४६ साली जी ‘घटना समिती’ अस्तित्वात आली, तिने नेमलेल्या उपसमित्यांची नावे दिली आहेत. नंतर उपसमित्यांची संख्या वाढली आणि एकूण समित्यांची संख्या १३ झाली. १३ समित्यांची नावे अशी :

१) फंडामेंटल राईट्स सब कमिटी - अध्यक्ष जे. बी. कृपलानी. २) मायनॉरिटीज सब कमिटी - अध्यक्ष हरेंद्र कुमार मुखज ३) नॉर्थ-ईस्ट फ्रंटियर ट्रायबल एरियाज ॲण्ड आसाम, एक्स्लुडेड एरियाज सब कमिटी - अध्यक्ष गोपीनाथ बारदोलोई ४) एक्स्लुडेड ॲण्ड पार्टली एक्स्लुडेड एरियाज सब कमिटी - अध्यक्ष ए. व्ही. ठक्कर ५) रूल्स ऑफ प्रोसिजर कमिटी - अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद ६) युनियन पॉवर कमिटी - अध्यक्ष जवाहरलाल नेहरू ७) स्टेट्स कमिटी - अध्यक्ष जवाहरलाल नेहरू ८) स्टिअरिंग कमिटी - अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद ९) राष्ट्रीय ध्वज समिती - अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद १०) कमिटी फॉर दि फंक्शन ऑफ दि कॉन्स्टिट्युएंट असेम्ब्ली - अध्यक्ष जी. व्ही. मावळणकर ११) हाऊस कमिटी - अध्यक्ष बी. पाट्टाभि सितारामय्या १२) लँग्वेज कमिटी - अध्यक्ष मोतुरी सत्यनारायण १३) ऑर्डर ऑफ बिझनेस कमिटी - अध्यक्ष के. एम. मुन्शी

फाळणीनंतर २९९ सभासदांची संविधान सभा अस्तित्वात आली. या सभेतील निवडक महत्त्वाच्या सदस्यांची नावे अशी :

१) डॉ. राजेंद्र प्रसाद (अध्यक्ष) २) डॉ. भीमराव आंबेडकर (‘मसुदा समिती’चे अध्यक्ष) ३) सर एन. माधवराव (म्हैसूरचे दिवाण) ४) दीप नारायण सिंह (बिहारचे मंत्री) ५) गोपीनाथ बारदोलोई (आसामचे मुख्यमंत्री) ६) डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन (भारताचे उपराष्ट्राध्यक्ष) ७) फ्रँक ॲन्थनी ८) दुर्गाबाई देशमुख ९) हंसा मेहता १०) के. एम. मुन्शी ११) के. कामराज (तामिळनाडू मुख्यमंत्री) १२) जयपाल सिंह मुंडा १३) रणबीर सिंग मुंडा १४) अम्मू स्वामीनाथन १५) दक्षिणायनी वेलायुधन. या संविधान सभेचे कामकाज दोन वर्षे, ११ महिने आणि १७ (काही ठिकाणी १८ दिवस असे आहे.) दिवस चालले. या काळात संविधानाच्या विविध कलमांवर गहन चर्चा झाल्या. नंतर या चर्चांचे १२ खंड प्रकाशित झाले. हे खंड नुसतेच चाळले, तरी दोन-तीन गोष्टी ठळकपणे लक्षात येतात. त्या अशा की, चर्चेचा स्तर अतिशय उंच असून, पक्षीय भांडणे तिथे नाहीत. एकमेकांवर कुरघोडी करण्याचा प्रयत्नदेखील कोणी केलेला नाही. आपले मत मांडण्याचे पूर्ण स्वातंत्र्य प्रत्येकाला देण्यात आले होते. साधकबाधक चर्चा झालेली आहे. साधकबाधक चर्चेनंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी, घटनेच्या प्रत्येक कलमाला संविधानाच्या कायद्याच्या भाषेत कलमबद्ध केले आणि सर्वसंमतीने घटना स्वीकृत करण्यात आली.

प्राचीन काळापासूनच आपला भारतीय स्वभाव, वेगवेगळ्या विषयांवर चर्चा आणि संवाद करण्याचा आहे. ‘प्रश्नोपनिषद’ नावाचे उपनिषद आहे. या उपनिषदात पिप्पलपाद या नावाचे ऋषी होते. या ऋषींकडे अन्य सहा ऋषी गेले. तेथे ते राहिले. त्यांनी पिप्पलपाद यांना प्रश्न विचारले, या प्रश्नांची उत्तरे म्हणजे उपनिषद आहे. ज्ञानी लोकांनी एकत्र यावे, आपल्या समाजापुढील प्रश्नांची चर्चा करावी, अशीच आपली थोर परंपरा आहे. २०व्या शतकात या परंपरेला संविधान सभा असे नाव पडले. संविधान सभेतील बहुतेक सभासद, आपआपल्या विषयातील प्रकांडपंडित होते. हजारो वर्षे आपला देश पारतंत्र्यात राहिला, तेव्हा ही चर्चेची परंपरा खंडित झाली. परंतु, प्रज्ञा खंडित झाली नाही. आपली संविधान सभा राष्ट्रीय प्रज्ञेचे प्रतिनिधित्व करणारी सभा मानायला पाहिजे. या संविधान सभेपुढे कोणते जटिल प्रश्न होते आणि प्रकांडपंडित डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे त्या बाबतीतले चिंतन काय होते, हे या पुस्तकात वाचायला मिळेल.

**(पुस्तक नोंदणीसाठी संपर्क : ९५९४९६१८५८/ ७५०६७३२९०५)**

# संघविरोधाची अविवेकी भाषा...

**भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी रा. स्व. संघाविषयी आसाममधील प्रचारसभेमध्ये गरळ ओकली. रा.स्व.संघावर काँग्रेसचा राग हा काही नवा नाही. काँग्रेसी उन्मादाला आजवर संघ नुसताच पुरुन उरला नाही, तर गेली १०० वर्षे देशामध्ये राष्ट्रभावनेचा प्रसार करत व्यक्तिनिर्माणाचे कार्य अखंडित करत आला आहे. आजवर रा. स्व. संघावर याच काँग्रेसने बंदी घालण्याचे केलेले प्रयत्न फसल्यावरही, आजही काँग्रेसी नेत्यांना पुन्हा पुन्हा तोच मार्ग चोखंदळावासा वाटतो, यातच त्यांच्या मर्यादा स्पष्ट होतात. मल्लिकार्जुन खर्गे यांनी व्यक्त केलेल्या मताच्या पार्श्वभूमीवर रा. स्व. संघ आणि काँग्रेस यांच्यातील संबंधांचा घेतलेला मागोवा...**

प्रासंगिक
आचार्य पवन त्रिपाठी

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेच्या नवव्या वष, म्हणजे १९३४ मध्ये वर्धा येथे भरवण्यात आलेल्या संघाच्या शिबिराला, महात्मा गांधी यांनी भेट दिली होती. त्यावेळी शिबिरातील शिस्त पाहून गांधीजी समाधान पावले होतेच, तसेच तेथे असलेल्या व्यवस्थेनेही ते आश्चर्यचकित झाले होते. विशेषतः त्या शिबिरातील जातिभेदविरहित वातावरण त्यांना विशेष भावले. त्यावेळी त्या शिबिरात अनेक स्वयंसेवक एकत्र रांगेत बसून भोजन करत होते आणि त्यापैकी कोणालाही, एकमेकांच्या जातीची कल्पना नव्हती. या अनुभवाचा उल्लेख गांधीजींनी नंतर दिल्लीमध्ये संघाच्या स्वयंसेवकांना संबोधित करतानाही केला होता. स्वातंत्र्यानंतर दिल्लीतील एका संघ कार्यक्रमात सहभागी होताना त्यांनी हा संदर्भ दिला. त्यावेळी स्वयंसेवकांना संबोधित करताना गांधीजी म्हणाले होते की, ‘‘अनेक वर्षांपूर्वी मी वर्धा येथे संघाच्या एका शिबिरात गेलो होतो. तेथील स्वयंसेवकांची कडक शिस्त, साधेपणा आणि अस्पृश्यतेचे झालेले पूर्ण उच्चाटन पाहून अत्यंत प्रभावित झालो.’’

यावरूनच असे स्पष्ट होते की, महात्मा गांधी त्याकाळातही संघाला एक शिस्तबद्ध संस्था मानत होते. मात्र, मल्लिकार्जुन खर्गे यांना आजही संघामध्ये ‘साप’ अर्थात, धोका दिसतो आहे. विशेष म्हणजे, सध्या संघ आपले शताब्दी वर्ष साजरे करत असून, संघाच्या विचारधारेवर चालणाऱ्या विविध संघटना सामाजिक जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात राष्ट्रहितासाठी अहोरात्र कार्यरत आहेत. संघपरिवार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या ४०हून अधिक संघटना सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि आर्थिक क्षेत्रात अहोरात्र कार्य करीत आहेत. राजकारणाच्या परिप्रेक्ष्यात विचार केल्यास, खर्गे यांच्या नेतृत्वाखाली असलेला भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष, आज अस्तित्वाच्या शोधात चाचपडताना दिसतो आहे. उलटपक्षी, भारतीय जनता पक्ष हा संघाच्या वैचारिक मार्गावर चालणारा पक्ष पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, तसेच महाराष्ट्रामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली देशाला सातत्याने प्रगती आणि समृद्धीकडे नेण्याचे कार्य करीत आहे.

आज इराणबरोबर सुरू असलेल्या अमेरिका-इस्रायल संघर्षाच्या पार्श्वभूमीवर जगातील अनेक देश इंधनटंचाईचा सामना करत असताना, भारतावर त्याचा परिणाम नाममात्र स्वरूपाचा जाणवतो आहे. तरीही, मणिशंकर अय्यर, दिग्विजय सिंह आणि सॅम पित्रोदा यांसारख्या काँग्रेस नेत्यांना, संघ अजूनही धोकादायकच वाटत आहे. यामागे कारण असे की, संघाच्या प्रभावामुळेच आज काँग्रेस सत्तेबाहेर आहे आणि निकटच्या भविष्यात सत्तेत पुनरागमनाची काँग्रेसची शक्यताही अत्यंत क्षीण झालेली दिसत आहे. कदाचित, याच कारणामुळे या नेत्यांमध्ये अस्वस्थता कायम असल्याचे दिसते.

मल्लिकार्जुन खर्गे यांसारखे नेते का कोण जाणे ही बाब लक्षात घ्यायला तयार नाहीत की, त्यांच्या पूर्वसूरी काँग्रेस नेत्यांनी संघावर तीनवेळा बंदी घालत, त्याला नष्ट करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, प्रत्येक वेळी संघ अधिक सक्षम होऊनच पुढे आला. पहिल्यांदा ही बंदी महात्मा गांधी यांच्या हत्येनंतर लादण्यात आली होती. स्वातंत्र्यानंतर अवघ्या एका महिन्यातच दि. १६ सप्टेंबर १९४७ रोजी दिल्लीतील संघ शिबिराला भेट देऊन, गांधीजींनी संघाचे कौतुक केले होते. तथापि, महात्मा गांधी यांच्या हत्येचा लावलेला घृणास्पद आरोप संघावर टिकू शकला नाही कारण, त्यांचे मारेकरी नथूराम गोडसे यांचा संबंध हिंदू महासभेशी होता, संघाशी नव्हे. त्याकाळातील काँग्रेस नेते ही वस्तुस्थिती मान्य करण्यासच तयार नव्हते तरीही, न्यायालयाने या आरोपातून संघाची निर्दोष मुक्तता केली आणि अखेर सरकारला बंदी उठवावी लागली. राष्ट्रसेवेत सातत्याने रत राहण्याचेच फलित म्हणून, १९६२च्या भारत-चीन युद्धकाळातील संघ स्वयंसेवकांची उल्लेखनीय सेवा पाहून, तत्कालीन पंतप्रधान आणि संघाचे कट्टरविरोधक समजले जाणाऱ्या जवाहरलाल नेहरू यांनाही संघाबद्दलचा त्यांचा दृष्टिकोन बदलावा लागला होता.निवडणूक विश्लेषण



त्यानंतर दि. २६ जानेवारी १९६३च्या प्रजासत्ताक दिनाच्या संचलनामध्ये सहभागी होण्यासाठी संघाच्या स्वयंसेवकांना आमंत्रित करण्यात आले. त्या संचलनात संघाचे तीन हजारांहून अधिक गणवेशधारी स्वयंसेवक, आपल्या बॅण्डसह सहभागी झाले होते. त्यांच्या या सहभागामुळे देशातील इतर नेत्यांचाही संघाकडे बघण्यचा दृष्टिकोन बदलला होता. त्यावेळी मल्लिकार्जुन खर्गे यांचे वय सुमारे २१ वर्षे असावे. त्यांनी त्याकाळातील वृत्तपत्रांतून या घटनेविषयी निश्चितच वाचले असेल. तरीही, काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष झाल्यानंतर त्यांना संघ जर धोकादायक वाटत असेल, तर त्यांनीच याचा विचार करावा; ते योग्य आहेत की, जवाहरलाल नेहरू योग्य होते.

१९४८ नंतरही संघावर आणखी दोन वेळा बंदी घालण्यात आली. एकदा आणीबाणीच्या काळात, तर दुसऱ्यांदा अयोध्येतील बाबरी मशीद पाडल्याच्या घटनेनंतर. आणीबाणीच्या काळात पाठीचा कणा ताठ असलेल्या प्रत्येकानेच, तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या आणीबाणी लावण्याच्या भूमिकेचा कडाडून विरोध केला होता. विरोध करणाऱ्या अशा सर्वांनाच विरोधक ठरवून, त्यावेळी इंदिरा गांधी यांच्या सरकारने तुरुंगात टाकले. या दडपशाहीचेच फलित म्हणजे, १९७७च्या सार्वत्रिक निवडणुकीत इंदिरा गांधींना पराभव पत्करावा लागला आणि देशात प्रथमच बिगरकाँग्रेस सरकार सत्तेवर आले. यावेळी घातलेल्या बंदीनंतरही, संघ अधिकच सक्षम होऊन पुढे आला आणि १९८० साली त्याच्याच पोटी भारतीय जनता पक्षाची स्थापना झाली, जी मागील १२ वर्षांपासून देशाचे नेतृत्व करत आहे.

संघावर तिसरी बंदी पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव यांनी, १९९२ मध्ये अयोध्येतील बाबरी पाडण्याच्या घटनेनंतर घातली. या बंदीमुळे संघाच्या वैचारिक पायाला अधिकच विस्तार मिळाला, तर काँग्रेसला देशाच्या राजकारणामध्ये कुबड्यांची आवश्यकता भासू लागली.

आजही कुबड्यांच्या आधारावरच प्रवास करणाऱ्या काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांना संघ धोकादायक वाटत असून, त्याला चिरडण्याची भाषा अनेकवेळा केली जात आहे. मात्र, भूतकाळातील अनुभव लक्षात घेता, संघ आणि भाजपला ‘अच्छे दिन’ येण्याची शक्यताही व्यक्त केली जात आहे, तर ज्या आसाममध्ये खर्गे यांनी संघाला ‘साप’ म्हणून जी चिरडण्याची भाषा केली, तेथेच काँग्रेसला सलग तिसऱ्यांदा पराभव पत्करावा लागण्याची चिन्हे दिसत आहेत. जर काँग्रेस नेतृत्वाची भूमिका अशीच कायम राहिली, तर ‘काँग्रेसमुक्त भारत’ हा नारा स्वतः काँग्रेसचेच विद्यमान नेतृत्व साकार करेल, असे चित्र सध्या आहे.

**- (लेखक श्री सिद्धिविनायक मंदिर, मुंबईचे कोषाध्यक्ष आणि मुंबई भाजपचे महामंत्री आहेत.)**



## बोरकर गुरुजींची भविष्यवाणी

**दिनांक** : १३/४/२०२६ **वार** : सोमवार **शके** : १९४८
**अयन** : उत्तर **ऋतू** : वसंत **मास** : चैत्र **पक्ष** : कृष्ण **महिना** : एप्रिल
**संवत** : २०८२ **अयनांश** : २३-३१-३३ **तिथी** : एकादशी **नक्षत्र** : पूर्वाषाढा
**योग** : शुभ **करण** : बव **सूर्योदय** : ६.२४ **सूर्यास्त** : १८-५३
**चंद्रराशी प्रवेश** : कुंभ **शुभाशुभ** : उत्तम दिवस

**दैनिक राशीभविष्य**

**मेष** : शत्रुपक्ष बळकट राहील.
**वृषभ** : वडिलांचे सहाय्य प्राप्त होईल.
**मिथून** : अविवाहितांना स्थळे येतील.
**कर्क** : मनाविरूध्द नातेवाईक वागतील.
**सिंह** : घराकडे अधिक लक्ष द्यावे लागेल.
**कन्या** : व्यापारी वर्गास उत्तम दिवस.
**तुला** : संततीकडून उतम वार्ता येईल.
**वृश्चिक** : मातृ आशीर्वाद भरपूर मिळतील.
**धनू** : आज मन लावून कार्य करावे.
**मकर** : नवीन कार्यातून आर्थिक लाभ मिळेल.
**कुंभ** : नवीन साधन सामुग्री खरेदी कराल.
**मीन** : मनाचा विचार करून कार्यात बदल करा.

पंडित सुरेशराव बोरकर गुरुजी, मु.पो. रावेर, जि. जळगाव, मोबा. ९८५००१५५५८

## थोडक्यात महत्वाचे.....



### करण धनगरची पोलीस दलात निवड; महाविद्यालयाने केला सत्कार

**यावल** : येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील एसवायबीएचा विद्यार्थी करण विनोद धनगर याची पोलीस दलात निवड झाल्याबद्दल महाविद्यालयातर्फे त्याचा सत्कार करण्यात आला. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.एस.आर. गायकवाड यांच्याहस्ते करण याचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी उपप्राचार्य एम.डी. खैरनार, उपप्राचार्य डॉ. एच.जी. भंगाळे, मिलिंद बोरघडे, डॉ.पी.व्ही. पावरा, प्रा.नरेंद्र पाटील उपस्थित होते. मान्यवरांनी करण यांच्या यशाचे कौतुक करत त्याला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### आदिवासी कोळी समाजाचा ११ मे रोजी सामुहिक विवाह सोहळा

**फैजपूर** : येथील कोळी समाज बहुउद्देशीय संस्थेच्यावतीने सालाबादाप्रमाणे यावर्षीही आदिवासी कोळी समाजाचा सामुहिक विवाह सोहळा ११ मे रोजी दुपारी १२.३० वाजता जळगावातील सरदार वल्लभभाई पटेल सभागृह येथे करण्यात आला आहे. ९ हजार ८७० विवाहच्छुंक मुला-मुलींसाठी हा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. सोहळ्यासाठी नाव नोंदणी सुरु असून ३० एप्रिलपर्यंत नाव नोंदणी करता येणार आहे. या विवाह सोहळ्यात समाज बांधवांनी मोठया संख्येने सहभागी होवून हा सोहळा यशस्वी करावा, असे आवाहन आदिवासी कोळी समाज मोफत सामूहिक सोहळ्याचे यावल तालुकाध्यक्ष दिलीप कोळी यांनी केले आहे.

### सातपुडा सहकारी पतसंस्थेस ६२ लाखांचा नफा चेअरमन नरेंद्र नारखेडे यांची माहिती

**फैजपूर** : येथील सातपुडा अर्बन क्रेडिट सहकारी पतसंस्थेस नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात ६२ लाख रुपयांचा नफा झाल्याची माहिती चेअरमन



नरेंद्र नारखेडे यांनी दिली. संस्थेने सभासदांना अल्प व्याजदारात कर्ज पुरवठा करून शेतकरी व साधारण व्यक्तींना जीवनात उभे करण्याचे मोठे कार्य केले आहे. सभासदांना प्रतिवर्षी डिव्हिडंड दिला जातो. कर्मचाऱ्यांना नियमितपणे पगार, सानुग्रह अनुदान, बोनस दिला जातो. सभासदांचा प्रचंड आर्थिक विश्वास, काटकसर व संचालक मंडळाचा एक विचार, यामुळे संस्था प्रगतीपथावर कार्य करीत असल्याचेही नरेंद्र नारखेडे यांनी यावेळी सांगितले. संस्थेचे कामकाज नरेंद्र नारखेडे यांचे नेतृत्वाखाली सुरू असून व्हा.चेअरमन नितीन चौधरी, संचालक प्रा.एस.जे. पाटील, चंद्रशेखर चौधरी, हेमराज चौधरी, प्रा.पदमाकर पाटील, पांडुरंग सराफ, गिरीश पाटील, सुनील वाढे, नयना चौधरी, सुनीता चौधरी, डॉ.उमेश चौधरी, व्यवस्थापक काशिनाथ वारके, किशोर नेहते कामकाज पाहत आहेत.



### प्रभाग क्र १ मधील पाईप लाईन बदलली

**फैजपूर** : शहरातील तहानगर भागात पाईप लाईन लिकेज झाल्यामुळे गेल्या काही दिवसांपासून दुषित पाणी पुरवठा होत होता. दरम्यान, या समस्येची तात्काळ दखल घेत ही पाईप लाईन बदलण्यात आली. नगराध्यक्ष दामिनी सराफ, पवन सराफ, नगरसेवक हकीम तडवी, सोमय्या शेख कुर्बान यांच्या मार्गदर्शनाखाली तात्काळ हे काम करण्यात आले.

### अट्रावल येथे आज नेत्र तपासणी शिबीर

**अट्रावल** : येथील श्री राम मंदिरात १३ एप्रिल रोजी पार्षव नेत्रालयातर्फे नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन आले आहे. शिबिरात अत्याधुनिक मशिनद्वारे डोळ्यांची तपासणी करण्यात येणार आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजनकांकडून करण्यात आले आहे.

### निमड्या येथे पतीकडून पत्नीचा खून

**रावेर** : शरीर संबंधास नकार दिल्याच्या कारणावरून पतीने गरोदर पत्नीचा गळा दाबून खुन केल्याची घटना रावेर तालुक्यातील निमड्या येथे घडली. याप्रकरणी रावेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, निमड्या येथील २५ वर्षीय महिला ४ मार्च रोजी घरातून बाहेर गेली होती. ५ मार्च रोजी दुपारी १२ वाजेच्या सुमारास तिचा मृतदेह सातपुडा पर्वत भागातील दरीत गळफास घेतलेल्या स्थितीत आढळून आला होता. ही महिला आठ महिन्याची गरोदर असल्यामुळे तिच्या मृतदेहाचे जळगाव येथे शवविच्छेदन करण्यात आले. दरम्यान, पोलीस उपनिरीक्षक मनोज महाजन, पोलीस हेडकॉन्स्टेबल ईश्वर चव्हाण, जगदीश पाटील, कल्पेश आमोदकर व इस्माईल तडवी आदींचे पथक या घटनेचा तपास करीत असतांना त्यांना या महिलेचा पती शरद मिरलाल पावरा (रा.निमड्या) याने या महिलेचा खुन केल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्याची पत्नी आठ महिन्याची गरोदर असताना त्याने पत्नीकडे शरीर संबंधाची मागणी केली होती. पत्नीने नकार दिल्यामुळे त्याला राग येवून त्याने पत्नीचा गळा दाबून खून केल्याचे तपासात निष्पन्न झाले. याप्रकरणी अंधारमळी येथील पोलीस पाटील रमजान तडवी यांनी रावेर पोलिसात दिलेल्या फिर्यादीवरून शरद पावरा याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास उपनिरीक्षक मनोज महाजन करीत आहेत.

# हिंदूंनी भगव्या ध्वजाखाली एकत्र येण्याची गरज!

## यावल येथील हिंदू समेंलनात डॉ.गौतम खट्टर यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**
**यावल, १२ एप्रिल**

वेगवेगळ्या पंथाच्या वेगवेगळ्या झेंड्यांमुळे सकल हिंदू समाजामध्ये फूट पडण्याचे काम सुरू आहे. त्यासाठी सकल हिंदू धर्माच्या सर्व हिंदूंनी भगवा ध्वजाखाली एकत्र येण्याची गरज आहे. आपण सनातनी आहोत याचे भान सर्वांनी ठेवावे, असे प्रतिपादन सनातन महासंघाचे संस्थापक डॉ.गौतम खट्टर यांनी केले.

यावल-भुसावळ रस्त्यावरील श्री बालाजी मंदिरासमोरील मैदानात हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ते बोलत



होते. याप्रसंगी श्री दत्त गिरणारी मठचे स्वामी ब्रह्मानंद, रा.स्व. संघाचे कार्यवाहक स्वप्निल चौधरी, स्वामी स्वरूपानंद महाराज, यावल तालुका सकल हिंदू समाज अध्यक्ष निलेश बारी आदी उपस्थित होते.

पुढे बोलतांना डॉ.गौतम खट्टर म्हणाले की, वेगवेगळ्या जातीपंथाच्या व वेगवेगळ्या पक्षाच्या लोकांनी सनातन धर्मामध्ये फूट पाडण्याचे काम सुरू केलेले आहे. सनातन धर्म भयमुक्त होण्यासाठी जातीयवाद, प्रांतवाद, क्षेत्रवाद, भाषावाद, परिवारवाद, धनवाद आणि उचनीचवाद दूर सारून सर्व हिंदूंनी एका झेंड्याखाली यावे. दुसऱ्याची आई बहीण ही आपली स्वतःची आई बहीण आहे असे विचार आचरणात आणावे, गो-मातेचे रक्षण करावे, नदी, वृक्ष, जल, वायू, अग्नी, आकाश, पर्वत, पशु यांना देवता म्हणायला हवे. आज सर्व विरुद्ध होत आहे. पर्यावरणाचा असमतोल बिघडत आहे. सनातनी होण्यासाठी पूर्वजांच्या सिद्धांतांवर चालले गेले पाहिजे. रामनिती आचरणात आणायला हवी. पूर्वी पूर्वजांनी मंदिर का निर्माण केले? कारण त्या मंदिरात सर्वजण एका ठिकाणी थांबून संदेश दिले जात होते. ते आचरणात आणले जात होते. त्यासाठी मंदिरात सर्व हिंदूंनी येणे गरजेचे असून आपल्या देवी देवतांची स्मरण करणे गरजेचे आहे. श्रीलंका देशात गोहत्या बंदीवर कडक कायदा आहे. मात्र, आपल्या देशात कायदा असूनही त्याचे पालन केले जात नाही, असेही ते यावेळी म्हणाले. यावेळी ब्रम्हानंद गिरणारी महाराज, स्वप्नील चौधरी यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रतिभा रावते यांनी केले.

# मुक्ताईनगरात बिबट्याचा थरार


## दोन तासांच्या प्रयत्नानंतर केले जेरबंद

**तभा वृत्तसेवा**
**मुक्ताईनगर, १२ एप्रिल**

येथील शासकीय विश्रामगृह परिसरात बिबट्या आढळून आल्याची घटना १२ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजेच्या सुमारास घडली. यामुळे शहरात मोठी खळबळ उडाली होती. मात्र, वनविभागाने शिताफीने मोहीम राबवत दोन तासांच्या प्रयत्नानंतर बिबट्याला जेरबंद केले.

शहरातील शासकीय विश्रामगृह परिसरात १२ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजेच्या सुमारास बिबट्या आढळून आल्याने शहरात एकच खळबळ उडाली. सुरुवातीला वाघ घुसल्याची चर्चा शहरात वाऱ्यासारखी पसरली. प्रत्यक्षात तो बिबट्या असल्याचे आ.चंद्रकांत पाटील यांचे स्वीय सहाय्यक प्रवीण चौधरी व कार्यकर्त्यांना दिसून आले. त्यानंतर आ.चंद्रकांत पाटील यांनी ही माहिती वनविभागाला दिली. त्यानंतर वनपरिक्षेत्र अधिकारी कृपाली शिंदे,





वनपरिक्षेत्र अधिकारी परिमल साळुंखे, वडोदा वनपाल गणेश गवळी, रुईखेडा वनपाल दीपश्री जाधव यांच्यासह पथकाने घटनास्थळी धाव घेतली. वनपाल गणेश गवळी यांनी रायफलद्वारे बिबट्याला दोन डॉट मारले. पिंजऱ्याजवळ आल्यानंतरही बिबट्याने चकवा देण्याचा प्रयत्न केला. तब्बल २ तासाच्या प्रयत्नानंतर बिबट्याला जेरबंद करण्यात आले.

जळगाव वनविभागाचे उपवनसंरक्षक राम धोत्रे, सहाय्यक वनसंरक्षक अमोल चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिक्षेत्र अधिकारी कृपाली शिंदे, वनपरिक्षेत्र अधिकारी परिमल साळुंखे, वडोदा वनपाल गणेश गवळी, रुईखेडा वनपाल दीपश्री जाधव, मानद वन्यजीव रक्षक विवेक देसाई, सुरज बोराखडे, पशुसंवर्धन विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. प्रशांत लोंढे यांच्यासह मुक्ताईनगर व वडोदा रेंजमधील सर्व वनरक्षक व कर्मचाऱ्यांनी ही कारवाई केली. दरम्यान, मुक्ताईनगर परिसरातील सारोळा रस्ता तसेच मलकापूर रस्त्यावरील शेत शिवारात काही दिवसाआधी आढळलेल्या प्राण्याचे मॉनिटरिंग सुरु असल्याचे उपवनसंरक्षक राम धोत्रे यांनी सांगितले.

# एसटीच्या स्वच्छतेसाठी प्रवाशांना मोजावे लागणार जादा पैसे

## तिकिटावर दोन रुपये 'स्वच्छता अधिभार'; १५ एप्रिलपासून अंमलबजावणी

**भुसावळ, १२ एप्रिल**

राज्य परिवहन मंडळाच्या बस आणि बसस्थानकांच्या अस्वच्छतेबाबत नेहमीच ओरड होत असते. आता ही अस्वच्छता दूर करण्यासाठी महामंडळाने कंबर कसली असली, तरी त्याचा आर्थिक भार मात्र प्रवाशांच्या खिशावर टाकला आहे. येत्या १५ एप्रिलच्या मध्यरात्रीपासून प्रत्येक बस तिकिटामागे दोन रुपये 'स्वच्छता अधिभार' आकारण्याचा निर्णय महामंडळाने घेतला आहे.

सध्या बस आणि बस स्थानकामधील धुळीने माखलेल्या जागा, पानाच्या पिचकाऱ्यांनी रंगलेले कोपरे आणि कचऱ्याचे ढीग हे चित्र सर्वसामान्य झाले आहे. स्थानिक पातळीवर कंत्राटी पद्धतीने स्वच्छता करून घेतली जाते, मात्र ती समाधानकारक नसल्याच्या तक्रारी प्रवाशांकडून वारंवार होतात. आता थेट प्रवाशांकडूनच पैसे वसूल केले जाणार असल्याने, किमान यापुढे तरी बस आणि स्थानके चकाचक दिसणार का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

दरम्यान, या संदर्भात भुसावळ एसटी आगाराचे प्रमुख राकेश शिवदे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांनी प्रतिसाद दिला नाही. एसटी आगारातीलच काही कर्मचाऱ्यांकडून या संदर्भात विचारणा केली असता ही बातमी खरी असल्याची त्यांनी सांगितले.

**पासधारकांकडून आकारणार ५ रुपये**

१५ एप्रिलच्या मध्यरात्रीपासून प्रतितिकीट २ रुपये 'स्वच्छता अधिभार' आकारण्यात येणार आहे. प्रासंगिक करारासाठी बुक केलेल्या बससाठी ५० रुपये तर पासधारकांकडून प्रत्येकी ५ रुपये आकारले जाणार आहेत. ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांगांना यातून वगळण्यात येणार आहे. यातून प्राप्त होणारा निधी राज्यातील बसस्थानकांच्या स्वच्छतेसाठी केला जाईल, असा दावा प्रशासनाकडून करण्यात आला आहे.

# आजच्या पिढीला थोर विचारवंत समजणे गरजेचे!

## राजेंद्र माळी वाघळीकर यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**
**यावल, १२ एप्रिल**

प्रत्येक माणसाने माणसाशी माणसासारखे वागले पाहिजे. शिक्षणाने क्रांती होऊ शकते. समाज एकत्र होऊ शकतो. आपले स्वतःचे मत मांडण्याचा अधिकार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिला तर माणसाने माणसाशी कसे जगावे याचा संदेश महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांनी आपल्या कार्यातून दिला. या महान समाज सुधारकांच्या आदर्श घेण्याची गरज असून आजच्या पिढीला थोर विचारवंत समजणे गरजेचे आहे, असे मत राजेंद्र माळी वाघळीकर यांनी दिले.

साकळी (ता.यावल) येथे ११ रोजी समस्त माळी समाज साकळी प्रेरित क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंती उत्सव समितीच्यावतीने क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त मी ज्योतिराव फुले बोलतोय या एकपात्री व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माळी समाजाचे अध्यक्ष सुभाष महाजन हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून साकळीचे सरपंच दीपक पाटील, प्रगतिशील शेतकरी रमेश महाजन, जितेंद्र महाजन, जि.प.चे माजी सभापती



रविंद्र पाटील, माळी महासंघाच्या माजी जिल्हाध्यक्षा संध्या माळी, माजी उपसरपंच किरण महाजन, भाजपा वैद्यकीय आघाडीचे जिल्हा संयोजक डॉ.सुनील पाटील, माजी ग्रा.पं.सदस्य दिनकर माळी, निर्मला माळी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील महाजन यांनी केले तर आभार उत्सव समितीचे अध्यक्ष गणेश माळी यांनी मानले.

# ऐनपूर, फैजपूर येथील प्राध्यापकांचे मोठे यश

## स्मार्ट अल्गल बायोमास प्रोडक्शन अँड हार्वेस्टिंग डिव्हाइस उपकरणाचे डिझाइन पेटंट मंजूर

**तभा वृत्तसेवा**
**फैजपूर, १२ एप्रिल**

ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळाचे सरदार वल्लभभाई पटेल कला आणि विज्ञान महाविद्यालय व तापी परिसर विद्या मंडळ संचालित धनाजी नाना महाविद्यालयातील प्राध्यापकांनी एकत्रितपणे विकसित केलेल्या 'स्मार्ट अल्गल बायोमास प्रोडक्शन अँड हार्वेस्टिंग डिव्हाइस' या उपकरणाला भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून अधिकृत मान्यता मिळाली आहे.

या संशोधनात डॉ.सतीश पाटील, प्रा. शिवाजी मगर, डॉ.संजय भागवत पाटील आणि डॉ.जयश्री पाटील यांचा सहभाग आहे. स्मार्ट अल्गल बायोमास प्रोडक्शन अँड हार्वेस्टिंग डिव्हाइस स्मार्ट शैवाल जैवभार उत्पादन व संकलन यंत्र हे एक अत्याधुनिक, कॉम्पॅक्ट आणि औद्योगिक दर्जाचे उपकरण असून, यात आडव्या



डॉ. सतीश पाटील | प्रा. शिवाजी मगर | डॉ. संजय पाटील | डॉ. जयश्री पाटील

सिलिंड्रिकल फोटोबायोरिॲक्टरमध्ये मायक्रोअल्गीची नियंत्रित पद्धतीने वाढ केली जाते. प्रकाश, तापमान, ऑक्सिजन व पोषक द्रव्ये यांचे नियमन सेन्सर्स आणि कंट्रोल युनिटद्वारे स्वयंचलितपणे केले जाते. अंतर्गत रोटरी इम्पेलरद्वारे जैवभार सुरक्षितपणे संकलित केला जातो, तर फिल्ट्रेशन प्रणालीमुळे पोषक द्रव्यांचा पुनर्वापर शक्य होतो. हे यंत्र सतत व बॅच मोडमध्ये कार्यरत राहून बायोफ्युएल, न्यूट्रास्युटिकल्स आणि सांडपाणी प्रक्रियेसाठी पर्यावरणपूरक उपाय ठरते. हे उपकरण प्रामुख्याने शैवाल उत्पादनासाठी आणि त्याच्या काढणीसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. सौर ऊर्जेचा वापर किंवा आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने 'बायोमास' तयार करण्यासाठी हे एक 'स्मार्ट' साधन म्हणून विकसित करण्यात आले आहे. वाढते प्रदूषण आणि इंधन टंचाईच्या काळात, शैवालापासून मिळणारे बायोमास हे भविष्यातील ऊर्जेचा एक महत्त्वाचा स्त्रोत मानले जाते. या उपकरणामुळे कृषी आणि ऊर्जा क्षेत्रात नवीन संशोधनाला मोठी चालना मिळण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. या यशामुळे खान्देशातील दोन्ही महाविद्यालयांच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

# जनगणना २०२७ : कच्चे-पक्के घर, गॅस-सरपण, टीव्ही-फ्रीज; सर्व काही विचारले जाणार!

**उत्तम काळे**
**भुसावळ, १२ एप्रिल**

घर पक्के, स्वयंपाकासाठी गॅस की सरपण, घरात टीव्ही-फ्रीज-इंटरनेटची सुविधा आहे का, अशा तब्बल ३३ प्रश्नांची सरबत्ती लवकरच नागरिकांवर होणार आहे. 'जनगणना २०२७' च्या निमित्ताने माहिती संकलनाची मोठी मोहीम राबवली जाणार असून, यंदाची जनगणना पूर्णपणे डिजिटल पद्धतीने होणार ही विशेष बाब ठरणार आहे. जिल्ह्यात जनगणनेसाठी प्रशासनाची तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली असून, फिल्ड ट्रेनरचे प्रशिक्षण सुरू आहे.

दोन टप्प्यांत ही जनगणना होणार असून पहिला टप्पा (मे/जून २०२६) १ मे ते १४ जूनपर्यंत राबवण्यात येणार आहे. यात घरयादी आणि घरगणना केली जाईल. घरांची स्थिती, उपलब्ध सुविधा आणि मालमत्ता यांची नोंद या काळात घेतली जाईल. दुसरा टप्पा (फेब्रुवारी/मार्च २०२७) त काळात प्रत्यक्ष लोकसंख्या गणना केली जाईल. यात प्रत्येक



व्यक्तीची वैयक्तिक माहिती संकलित करण्यात येईल.

**किमान ४५०० प्रगणक करणार सर्वे!**

जळगाव जिल्ह्यात अद्याप जनगणनेसाठी कर्मचाऱ्यांची अद्याप नियुक्त करण्यात आलेले नाही. सध्या 'फिल्ड ट्रेनर' चे प्रशिक्षण सुरू आहे. त्यानंतर प्रगणक व पर्यवेक्षकांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. जिल्ह्यात जनगणनेसाठी १२० क्षत्रिय प्रशिक्षक नेमले आहेत. तर मनपासाठी १७ अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे जिल्ह्यासाठी १५ तहसीलदार व १९ नगरपालिकांचे मुख्याधिकारी यांची यांच्यावर ही जबाबदारी देण्यात आली आहे. जनगणनेचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे 'स्व-गणना'. कुटुंबांना आता प्रगणकाची वाट न पाहता स्वतःची माहिती पोर्टलवर ऑनलाइन भरता येणार आहे. १ ते १५ मेपर्यंत स्व-गणना करता येईल. मोबाइल क्रमांक आणि ओटीपीचा वापर करून सुरक्षित वेब पोर्टलद्वारे ही माहिती भरता येईल.

माहिती सादर केल्यानंतर एक 'युनिक आयडी' मिळेल, जो नंतर घरी येणाऱ्या प्रगणकाला दाखवावा लागेल. प्रगणक पडताळणी करूनच स्व-गणनेची अंतिम नोंद ॲपमध्ये घेणार आहेत.

**घराची कुंडली ऑनलाइन!**

जनगणनेत घराची स्थिती, इमारत व घर क्रमांक, घराच्या भिंती व छतासाठी वापरलेले साहित्य (सिमेंट, विटा की माती), घराचा वापर आणि सध्याची स्थिती, कुटुंबाची माहिती, प्रमुखाचे नाव, लिंग, जात/प्रवर्ग, कुटुंबातील एकूण सदस्य आणि विवाहित जोडप्यांची संख्या, मूलभूत सुविधा, पिण्याच्या पाण्याचा स्रोत, पाण्यासाठी करावी लागणारी पायपीट, प्रकाशाचे साधन (वीज की अन्य), शौचालयाचा प्रकार आणि सांडपाणी निचरा व्यवस्था, जीवनशैली, स्वयंपाकघर, गॅस कनेक्शन (एलपीजी, पीएनजी), धान्य, मालमत्ता व संप्रेषण, रेडिओ, टीव्ही, लॅपटॉप, संगणक, इंटरनेट, मोबाईल, वाहने, सायकल, मोटारसायकल, मोपेड, कार, स्कूटर, जीप किंवा व्हॅन. या सर्व बाबींचा उल्लेख या नोंदीमध्ये करण्यात येणार आहे. या सर्व बाबीमुळे या वर्षाची जनगणना ही विशेष ठरणार आहे.

**१६ मे ते १४ जून पर्यंत होणार जनगणना!**

१६ मे ते १४ जूनपर्यंत प्रगणक हे घरोघरी फिरून मोबाइल ॲप्सद्वारे जनगणनेचे काम करणार आहेत. प्रगणक हे घरोघरी जाऊन 'एचएलओ' (हाऊस लिस्टिंग ऑपरेशन) ॲप्सद्वारे माहिती संकलित करतील. त्यांना १८० ते २०० घरे किंवा ७०० ते ८०० लोकसंख्येचे सर्वेक्षण करण्याचे उद्दिष्ट देण्यात येणार आहे. मोबाइल ॲप्समध्ये १६ भाषांचा पर्याय आहे. प्रांतानुसार भाषेचा वापर होणार आहे.



# डॉ.सुरेश जी. पाटील महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी प्रा.डॉ.संध्या सोनवणे

**तभा वृत्तसेवा**
**चोपडा, १२ एप्रिल**

येथील महात्मा गांधी शिक्षण मंडळ संचलित दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी प्रा.डॉ. संध्या महेंद्र सोनवणे यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी नुकताच आपल्या पदाचा पदभार स्वीकारला. त्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष ॲड.संदीप पाटील, सचिव डॉ.स्मिता पाटील यांच्याहस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

प्राचार्य डॉ.संध्या सोनवणे या प्राणीशास्त्र विषयातील तज्ज्ञ प्राध्यापिका असून त्यांचे शिक्षण एम.एस्सी, पीएचडी पर्यंत झाले आहे. त्यांच्याकडे तब्बल ३६ वर्षांचा प्रदीर्घ अध्यापनाचा अनुभव असून त्यांनी ६ वर्षे ७ महिने प्रभारी प्राचार्य म्हणून यशस्वीरित्या जबाबदारी सांभाळली आहे. यापूर्वी जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक संस्थेच्या यावल येथील महाविद्यालयात त्यांनी दिलेले योगदान अत्यंत मोलाचे ठरले आहे. त्यांचे अनेक संशोधनपर निबंध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामांकित जर्नल्समध्ये प्रसिद्ध झाले आहेत. तसेच, त्यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अधिसभेवर (सिनेट) सदस्य म्हणूनही कार्य केले आहे. त्यांच्या या निवडीबद्दल उपप्राचार्य प्रा.डॉ. के.एन. सोनवणे, उपप्राचार्य प्रा.डॉ. आर.एम. बागुल, उपप्राचार्य प्रा.डॉ. ए.बी. सुर्यवंशी, समन्वयक डॉ.शैलेशकुमार वाघ, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य पी.एस. पाडवी, पर्यवेक्षक ए.एन. बोरसे, रजिस्ट्रार डी.एम. पाटील आदींनी अभिनंदन केले आहे.